मंगळवार, ३० जानेवारी २०२४
किमत ५ रुपये | छत्रपती संभाजीनगर (महाराष्ट्र)
मराठी दैनिक
वर्ष - ०३ अंक - १६३
आरएनआय : एमएएचएमएआर/२०२१/८२५६६

# आधुनिक केसरी

विश्वव्यापी मराठी दैनिक

MARATHI • DAINIK • CHHATRAPATI SAMBHAJINAGAR (MAHARASHTRA) TUESDAY 30 JANUARY 2024 | adhunikkesari.com | Adhunik Kesari | YEAR-03 • ISSUE-163 • RNI : MAHMAR/2021/82566 • PAGE-16 • PRICE-05

## पीक विम्यासाठी कृषी अधिकाऱ्याची खुर्ची उलटी

### उबाठा शिवसेना गट आक्रमक : पावसाने ताण दिल्यामुळे पिकांचे नुकसान

आधुनिक केसरी न्यूज

**हिंगोली : शेतकऱ्यांच्या पीक विम्यासाठी उबाठा शिवसेना गटाने सोमवारी आक्रमक आंदोलन केले. जिल्हा कृषी अधिकारी यांच्या दालनात जाऊन त्यांची खुर्ची उलटी करत निषेध व्यक्त केला. या प्रकरणी तत्काळ लक्ष घालून शेतकऱ्यांना पीक विमा मिळावा यासाठी जिल्हाधिकारी यांना निवेदन देण्यात आले आहे. या आंदोलनात उबाठा शिवसेना गटाचे शिवसेना जिल्हाप्रमुख संदेश देशमुख, माजी आमदार संतोष टारफे, गोपू पाटील आदी कार्यकर्ते मोठ्या संख्येने यामध्ये सहभागी झाले होते.**



जिल्ह्यात यावर्षी खरीप हंगामामध्ये ५ लाख १२ हजार शेतकऱ्यांनी पिकविमा मिळावा यासाठी अर्ज केला. राज्य शासनाच्या वतीने केवळ एक रुपयांमध्ये पिक विमा योजना शेतकऱ्यांसाठी सुरू केली. या योजनेला मोठ्या प्रमाणावर शेतकऱ्यांकडून प्रतिसाद मिळाला. यात ३ लाख २६ हजार हेक्टरवरील पिकाचा विमा यावर्षी शेतकऱ्यांनी काढला. तर यासाठी १७२१ कोटी रुपयांचा संरक्षण विमा शेतकऱ्यांना मिळणार होता. पावसाने ताण दिल्यामुळे पिकांचे मोठ्या प्रमाणात नुकसान झाले. उत्पादनात देखील मोठी घट झाली, त्यातच सोयाबीन पिकाला येलो मोझॅक आदी रोगाने ग्रासले. पाऊस न पडल्याने पिकांची वाढ झाली नव्हती, म्हणून मोठ्या प्रमाणावर उत्पादनात घट झाली. शेतकऱ्यांना अपेक्षा होती ती पिकविमा कंपनीकडून शेतकऱ्यांना अग्रीम रक्कम देण्यात येईल. विमा कंपनीने नुकसान कमी झाल्याचा दावा करुन विभागीय आयुक्त राज्य शासनाकडे अपील केली होती. त्यानंतर तडजोड करण्याची तयारी सुद्धा विमा कंपनी दर्शवली होती. मात्र, पीक पाहणी अहवालानंतर परत कंपनीने ५० टक्के नुकसानीच्या अटीवर भरपाईसाठी तयारी दर्शवली. कृषी विभाग यांच्याकडून ५९ टक्के नुकसानी पोटी १७१ कोटी भरपाई देण्याची मागणी करण्यात आली. यामध्ये जिल्हाधिकारी यांनी मध्यस्थी केली. यात ५४ टक्के नुकसान भरपाई देण्याचे कंपनीला सांगितले होते. परंतु कृषी विभागाने यामध्ये हलगर्जीपणा करत या प्रकरणांमध्ये तडजोड केली नाही. परिणामी उडीद, मूग, सोयाबीन या तीनही पिकांमध्ये हिंगोली जिल्ह्यातील उत्पादकता सर्वसाधारण असल्याचा निर्वाळा देत पिक विमा फेटाळला गेला.शेतकऱ्यांना केंद्र सरकार व राज्य सरकार यांनी एक रुपयात पीक विमा योजना अमलात आणली आणि शेतकऱ्यांनी मोठ्या प्रमाणावर पिक विमा भरला होता. शेतकऱ्यांना विमा मिळणार यामुळे शेतकऱ्यांच्या आशा पल्लवीत झालेल्या होत्या. यात शेतकऱ्यांना मोठा आर्थिक फटका देखील बसला. जिल्ह्यातील लोकप्रतिनिधी यांनी देखील उदासीनता दाखवली. एकीकडे शेतकऱ्यांनी पीकविमा मिळावा यासाठी आंदोलनाचा सपाटा लावला आहे. सेनगाव तालुक्यातील तपोवन परिसरातील शेतकऱ्यांनी तर 'रक्त घ्या आणि आम्हाला जगण्यासाठी अन्नधान्य द्या', काही शेतकऱ्यांनी लिव्हर, डोळे, किडनी शरीरातील अवयव विक्री काढले आहे. विमा कंपनीने आमचा आम्हाला परतावा द्यावा, अशी मागणी शेतकरी करत आहेत.

## महत्त्वाची बातमी

### शेतकरी कंपनीचा माल अमेझॉन, फ्लिपकार्टवरून मोठ्या बाजारपेठेत

आधुनिक केसरी न्यूज

**मुंबई :** शेतकऱ्यांनी शेती विषयक विचार बदलले पाहिजेत, शेतीला उद्योग म्हणून पाहिले पाहिजे त्यादृष्टीने शेती केली पाहिजे तरच शेती व शेतकऱ्यांचे प्रश्न सुटू शकतील, असे प्रतिपादन कृषीमंत्री धनंजय मुंडे यांनी केले. दरम्यान शेतकरी कंपनीचा शेतमाल आता अमेझॉ , फ्लिपकार्ट, हिंदुस्तान युनीलिव्हर, टाटा यांसारख्या मोठ्या बाजारपेठेत थेट जाणार आहे. महाराष्ट्र इन्स्टिट्यूट फॉर ट्रान्सफॉर्मेशन, कृषी विभाग, मा.बाळासाहेब ठाकरे कृषी व्यवसाय व ग्रामीण परिवर्तन प्रकल्प आणि ग्राम सामाजिक परिवर्तन फाऊंडेशन यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित कृषीमूल्य साखळी भागीदारी बैठक -२०२४ सह्याद्री अतिथीगृह येथे आयोजित केली होती. यावेळी कृषीविभागाचे अपर मुख्य सचिव अनुप कुमार, महाराष्ट्र इन्स्टिट्यूट फॉर ट्रान्सफॉर्मेशनचे मुख्य कार्यकारी अधिकारी प्रविण परदेशी, ग्रामविकास विभागाचे प्रधान सचिव एकनाथ डवले, कृषीआयुक्त प्रवीण गेडाम यांच्यासह विविध आंतरराष्ट्रीय व राष्ट्रीय पातळीवरील कंपन्यांचे प्रतिनिधी आणि शेतकरी उत्पादक कंपन्यांचे प्रतिनिधी आदी उपस्थित होते. यावेळी धनंजय मुंडे यांनी, स्मार्ट प्रकल्पातंर्गत सहभागी शेतकरी उत्पादक कंपन्यांच्या कृषी उत्पादनास बाजारपेठ मिळवून देण्यासाठी आंतरराष्ट्रीय व देशातील महत्त्वपूर्ण कंपन्यां सोबत करार करण्यात येत आहे. यामुळे शेतकऱ्यांच्या शेतीमालाला रास्त भाव मिळेल. कृषी विभागामार्फत कृषी उत्पादनांची मूल्य साखळी निर्माण करण्यासाठी कंपनी व शेतकरी उत्पादक कंपन्यांना सर्व मदत देण्यात येईल, असे स्पष्ट केले.

## लोणार तालुक्यात हागणदारी मुक्ती मोहीम कागदावरच

### शौचालय दारात पण गाव जाते रस्त्यावर : गुड मॉर्निंग पथक गायब

आधुनिक केसरी न्यूज

**लोणार :** तालुक्यात स्वच्छ भारत मिशन अंतर्गत पाच वर्षापुर्वी हागणदारी मुक्त गाव करण्यासाठी शासनाने शौचालयासाठी अनुदान देऊन पाणंद मुक्त गाव करण्यासाठी प्रबोधन, जनजागृती केली. गुड मॉर्निंग पथक नेमुन टमरेल प्रेमीवर कडक मोहिम राबविण्यात आली. त्यानंतर घरोघरी दारात शौचालय झाले. काही नागरिकांनी शौचालयाचा वापर सुरु केला होता. त्यामुळे गाव हागणदारी मुक्त होऊन गाव, वाडी, वस्ती पाणंद मुक्त झालेले पाहायला मिळाले. परंतू प्रशासनाने या योजनेकडे दुर्लक्ष करताच ग्रामीण भागात उघड्यावर शौचाला जाणाऱ्यांची संख्या वाढत आहे. शौचालय दारात असतानाही गाव मात्र पांदीला, रस्त्यावार जात असल्याचे दिसून येत आहे. ग्रामीण भागात बहुतेक नागरीक हे शौचास उघड्यावर तर महिला भगिनी पांदिचा वापर करत असायचा. पांदीच्या रहदारीमुळे महिलांची मोठी कुचंबना तर व्हायचीच पण गावभर दुर्गंधी पसरून गावात रोगराईचे प्रमाण वाढत होते. दुर्गंधी गावाच्या आरोग्यासाठी धोकादायक आहे.

## शेतकऱ्याचा भूमिअभिलेख कार्यालयात आत्मदहनाचा प्रयत्न

आधुनिक केसरी न्यूज

**खामगाव :** भूमि अभिलेख कार्यालयाकडून त्रास दिल्या जात असल्याचा आरोप करीत खामगाव तालुक्यातील ज्ञानेश्वर लांडे या शेतकऱ्याने सोमवारी दुपारी डिझेल अंगावर ओतून घेतले. आत्मदहनाचा प्रयत्न करणाऱ्या शेतकऱ्याला शहर पोलीसांनी ताब्यात घेतले.

खामगाव तालुक्यातील आवार येथील ज्ञानेश्वर पांडुरंग लांडे यांच्या मालकीची पिंप्री गवळी येथील गट क्रमांक 290 मध्ये शेती आहे. या शेताच्या सरकारी मोजणीबाबत लांडे यांनी हरकत घेतली. त्या मोजणीत 10 फूट रूंद आणि 80 फूट लांब शेती गेल्याची तक्रार करीत भूमिअभिलेख कार्यालयात ते चकरा मारत आहेत. मात्र, कार्यालयातील संबंधितांकडून प्रतिसाद नसल्याने, शेतकऱ्याने भूमिअभिलेख कार्यालयातच अंगावर डिझेल ओतून घेतले. या प्रकारामुळे भूमि अभिलेख कार्यालयात एकच गोंधळ उडाला. शेतकरी आणि त्याच्या कुटुंबियांचा आक्रोश सुरू असतानाच शहर पोलीस घटनास्थळी दाखल झाले. तत्पूर्वी उपस्थितांनी शेतकऱ्याला पुढील गोष्टीपासून परावृत्त करण्याचा प्रयत्न केला. शेतकऱ्याला ताब्यात घेऊन शहर पोलीस स्टेशनमध्ये नेण्यात आले.



## रिसोड ग्रामीण भागातील रस्ते बनले चिंतेचा विषय

### रस्त्यांच्या दयनीय अवस्थेकडे प्रशासनासह लोकप्रतिनिधींचे दुर्लक्ष


आधुनिक केसरी न्यूज

विनोद पाटील बोडखे

रिसोड : तालुक्यातील ग्रामीण भागातून तालुक्याला जोडणारे तसेच दोन गावांना जोडणाऱ्या लहान रस्त्यांची अत्यंत बिकट अवस्था झालेली आहे. परिणामी संबंधीत गावातली नागरिकांना तालुक्याच्या ठिकाणी येण्यासाठी खडतर प्रवसाचा सामना करून जीव मुठीत घालून प्रवास करावा लागत आहे. मात्र सध्यस्थितीत रिसोड विधानसभा मतदार संघात सभामंडप व ईतर काही कामांचे भूमिपूजन सोहळे सुरू असले, तरी दळणवळण हा ही तितकाच महत्वाचा विषय असल्याने ग्रामीण भागातील रस्त्यांचा विकास कधी होणार? असा सुर ग्रामीण भगातील नागरिकांमधून जाहीररीत्या चर्चेचा विषय ठरत असल्याने ग्रामीण भागातील रस्ते हा महत्वाचा कळीचा विषय बनला आहे. अनेक गावं खेड्यात जाणारे रस्त्याची दुरवस्था झाल्याने नागरिकांमध्ये संतापाचे वातावरण पसरले आहे. तालुक्यातील मांगवाडीहून पाचंब्याकडे जाणारा रस्ता, मोप ते बोरखेडी, शेलुखडसे, वाकद ते गोहोगावं हाडे, रिसोड ते घोंसर, पवार वाडी आदी अनेक गाव, खेड्यांना तालुक्याच्या ठिकाणी जोडणाऱ्या मुख्य रस्त्यांची अत्यंत दयनीय अवस्था झालेली आहे. अनेक रस्त्यांवरील डांबर उखडून गेले आहे. त्यामुळे रस्तावर मोठ मोठे खड्डे पडले आहेत. तर काही रस्त्यांची अक्षरशः चाळण झाली आहे. अशा रस्त्यावरून दररोज प्रवास करणारे संबंधीत ग्रामस्थ हैराण झाले आहेत. काही रस्त्यांची संबंधीत विभागाने तात्पुरती डागडुजी केली असली तरी पुन्हा सदर रस्ते जैसे थे स्थितीत झाले आहेत. शेलुखडसे ते बोरखेडी या रस्त्याचे एकादा डांबरीकरण करण्यात आले असून, जवळपास दहा ते बारा वर्षांपासून संबंधीत विभागाने आणि स्थानिक लोकप्रतिनिधींनी सुद्धा साधे ढुकुनही पाहिले नाही. त्यामुळे मोप पर्यंत जाणाऱ्या या ग्रामीण रस्त्याची दयनीय अवस्था झाली आहे. परिसरातील गणेशपुर, पाचंबा, शेलूखडसे,आसोला लोणी खु, पिंपरखेड, बोरखेडी आदी गावे मोप येथील प्राथमिक आरोग्य केंद्राशी जोडलेले असल्यामूळे संबंधीत गावातली नागरिकांसाठी हा रस्ता खुप महत्त्वपूर्ण रस्ता आहे. शासनाकडून गोरगरिबांना पुरविल्या जाणाऱ्या आरोग्य विषयी मोफत सुविधा बहुतांश प्राथमिक आरोग्य केंद्राशी निगडीत असतात परंतू रस्त्याची दैनावस्था झालेली असल्यामूळे गोरगरिबांना मोफत आरोग्य सुविधांचा लाभ घेणे दुरापास्त झाले आहे. शेलुखडसे, बोरखेडी रस्त्यावर माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालय असुन सदर शाळेत आस पासच्या गावातली अनेक विद्यार्थी सायकल वरून ये जा करत असतात तर शाळेच्या विद्यार्थी वाहनांच्या चालकांना तारेवरची कसरत करत आपले वाहन चालवावे लागत आहे. वारंवार तक्रारी, मागणी निवेदन देऊन सुद्धा सार्वजनिक बांधकाम विभाग तसेच स्थानिक लोकप्रतिनिधी दुर्लक्ष करत असल्यामूळे त्रस्त ग्रामस्थांकडून शासन, प्रशासन आणि लोकप्रतिनिधी यांच्या प्रति प्रचंड रोष व्यक्त केला जात आहे.



**शेकडो कोटीचा निधी पण, विकास कधी :** सध्यस्थितीत तालुक्यामधे जवळपास ग्रामीण भागामधील सर्वच रस्त्यांची चाळनी झाली आहे . रस्त्यावर पैदल चालणेही कठीण झाले असून दुचाकी स्वारांना तारेवरची कसरत करावी लागत आहे . मात्र या मूलभूत सुविधेकडे शासन प्रशासनासह लोक प्रतिनिधींनी लक्ष देण्याची मागणी तालुक्यातील नागरिकांमधून होत आहे .





विश्वास देशपांडे
संपर्क क्र. 9403749932

आधुनिक केसरी

मंदिराच्या आवारात एका खांबावर केलेल्या कोरीव कामात राष्ट्रकूट काळातील राजांची नावे कोरली आहेत. त्यावर कानडी भाषेत १०१९ या वर्षाचा उल्लेख असून त्या काळी युद्धात पराक्रम गाजवलेल्या राष्ट्रकूट घराण्यातील राजा भीमदेव याच्या सैनिकांच्या स्मृतिप्रीत्यर्थ या स्तंभाची निर्मिती करण्यात आली. सकाळी या मंदिरातील देवीला जेव्हा स्नान, पंचोपचार आणि अभिषेक इ. नित्यपूजा केली जाते, तेव्हा आपल्याला अतिशय सुंदर अशा शाकंभरी मातेच्या सिंहारूढ भव्य मूर्तीचे दर्शन घडते. देवी अष्टभुजा असून मूर्ती सालंकृत आहे. देवीच्या उजव्या हातामध्ये खड्ग, डमरू आहे. गळ्यामध्ये हार असून अंगाखांद्यावर विविध अलंकार आहेत. मस्तकावर नावरत्नांचा मुकुट भगवतीने परिधान केला आहे. मुद्रा अत्यंत प्रसन्न आहे. गाभाऱ्यासमोर कासव आहे. शाकंभरी मातेची ही मूर्ती काळ्या पाषाणातून घडवली आहे. मूर्ती इतकी सुंदर आहे की त्यावरून नजर हटत नाही. या नित्यपूजेच्या वेळी मंत्रोच्चाराच्या गजरात पुजारी देवीला उष्णोदकाचे जे स्नान घालतात ते पाहण्यासारखे असते. त्यानंतर मूर्तीला चंदनाचा लेप लावला जातो. सर्व भाविकांनी भक्तिभावाने आणलेल्या साड्या देवीला अशा कौशल्याने पुजारी नेसवतात की आपण बघतच राहतो. देवीच्या मंदिराभोवती विशाल असे आवार आहे. या आवारात उभ्या असलेल्या दोन भव्य दगडी दीपमाळा आपले लक्ष वेधून घेतात. मंदिराभोवती तटबंदी आहे. आतील बाजूला ओवऱ्या आहेत तसेच प्रदक्षिणा आणि पालखी सेवेसाठी मोकळी जागा आहे. प्रदक्षिणेच्या मार्गावर केदारेश्वर, हनुमान, सहदेव, श्रीचक्र ही मंदिरे आहेत. मंदिराच्या बाहेरच्या बाजूला भक्तांच्या निवासासाठी खोल्या बांधलेल्या आहेत. मंदिराभोवतीचा परिसर अतिशय निसर्गरम्य असून नारळ, केळी, सुपारी, नागवेली, चिंच आदी झाडांनी वेढलेला आहे.



## आनंदी पहाट

### अध्यात्माचे विविध प्रकार

आधुनिक केसरी

आध्यात्मिक वाढ जीवनातील चढ-उतारांना सामोरे जाण्याची आणि त्या कठीण अनुभवातून परत येण्याची आपली क्षमता वाढवते. आध्यात्मिक विकासामध्ये मुलांना करुणा, औदार्य आणि त्याग यांसारख्या गुणांची कदर करण्यास शिकवणे समाविष्ट आहे. जेव्हा पालक आणि इतर प्रौढ किंवा काळजीवाहक प्रामाणिकपणा, विश्वासार्हता आणि दयाळूपणाचे मार्गदर्शक ठरतात, त्यामुळेच मुले देखील लहानपणापासून दयाळू बनतात. आध्यात्माचे विविध पाच प्रकार असल्याचे मानले जातेः



विद्यावाचस्पती विद्यानंद
संपर्क क्र. 7709612655

१. गूढ आध्यात्म
२. अधिकारवादी आध्यात्म
३. बौद्धिक आध्यात्म
४. सेवा आध्यात्म
५. सामाजिक आध्यात्म

आध्यात्म्यांच्या पाच वैशिष्ट्यांचा वरील प्रत्येक प्रकारात समावेश होत असतो. अर्थ, मूल्य, अतिक्रमण, स्वतःशी, इतरांशी, देव, सर्वोच्च शक्ती आणि पर्यावरण याच्याशी जोडणे, आणि जीवनातील वाढ करणे आणि प्रगती करणे ही ती वैशिष्ट्ये होत. आध्यात्म म्हणजे आपल्यापेक्षा मोठ्या गोष्टीशी अर्थपूर्ण संबंध शोधणे, ज्याचा परिणाम शांतता, विस्मय, समाधान, कृतज्ञता आणि स्वीकृती यासारख्या सकारात्मक भावनांमध्ये होऊ शकतो. आध्यात्मिक कल्याण हे आपल्या जीवनाच्या अर्थाशी आणि उद्देशाशी संबंधित असते. यामध्ये संस्कृती, समुदाय, अध्यात्म किंवा धार्मिकता यांच्याशी आपला संबंध समाविष्ट केलेला असू शकतो आणि आम्ही धरत असलेल्या श्रद्धा, मूल्ये, मानसिक धारणा आणि नैतिकता समाविष्ट करू शकतो. आध्यात्मिक व्यक्ती असणे ही बाब व्यक्ती असण्याचे समानार्थी आहे, ज्याचे सर्वोच्च ध्येय स्वतःवर आणि इतरांवर प्रेम करणे आहे. आपण सर्व एक आहोत ही त्याची खात्री, त्याला सर्वांच्या  ल्याणासाठी कार्य करण्यास आणि कोणत्याही हानिकारक क्रियाकलापांपासून दूर राहण्यास प्रवृत्त करते.



आधुनिक केसरी

### संत सद्गुणांची | गोडी लागो ||

जगराहटीला | टाळु कैसे देवा ||
घालमेल जीवा | सोसवेना ||१||
तमगुण जेव्हा | होतो सत्ताधिश ||
कलयुगी त्रास | सज्जनांसी ||२||
सत्वगुणी राजा | लोपला का जगी ? ||
दांभिक हा भोगी | राज सुख ||३||
प्रेमावीना जिणे | असे बंदिवास ||
स्वार्थाचाच दास जो तो झाला ||४||
जगणेच झाले | भार आता माथी ||
दैवा तुझी गती | आकळेना ||५||
जळो देवा चिंता | त्रिगुण तापाची ||
संत सद्गुणांची | गोडी लागो ||६||



प्रा.ज्ञानेश्वर कुलकर्णी (वतनी)
संपर्क क्र. ९४०३०२९१७८

## निरूपण


आधुनिक केसरी

विष्टा मूत्र आणि बळस ।भोवता वमनें केला नास ।
दुरून जातां कोंडे स्वास ।विश्वजनाचा ॥४४॥
नाना दुःखें नाना व्याधी ।वृद्धपणीं चळे बुद्धी ।
तऱ्हीं पुरेना आवधी ।आयुष्याची ॥४५॥
पापण्या भवयाचे केंश ।पिकोन झडले निःशेष ।
सर्वांगीं लोंबलें मांस ।चिरकुटासारिखें ॥४६॥

## घराघरात स्वर्वेद, मनामनांत स्वर्वेद, जनमनांत स्वर्वेद !

कालरुप परमातमा,
लयकारी गुण आय ।
आपसे गुण मैं लेत हुँ, मन वच आतम
पाय ।।१७।।(स्वर्वेद षष्ठ मण्डल
प्रथम अध्याय) ०६/०१/१७)

मूळ भाष्याचा मराठी अनुवाद : हे परमात्मन् ! आपण कालरुप आहात. आपण सृष्टीकर्ता, पालन कर्ता तसेच लयकर्ता आहात. आपल्याकडून मी आपल्या गुणांना मन, वचन आणि आत्म्यामध्ये ग्रहण करीत आहे. परमात्म्याच्या ज्या ज्या गुणांचे योग विधानाने साधक स्मरण करतो, ते सर्व गुण त्याच्या आत्म्यात प्रगट होतात. हे विज्ञान ब्रह्मविद्या विहंगम योगात आहे आणि ते सद्गुरूशरणात राहून शिकता येते.


स्वर्वेद रचनाकार अनन्त श्री सद्गुरू सदाफल देवजी महाराज

संदर्भ : हा ग्रंथ तुम्हाला हवा असल्यास वॉट्सअॅप करा ८५५४८८३१६६.

## निसंदेहनिरूपण

आधुनिक केसरी

थोर मनुष्याचे कर्तृत्व ज्ञानी माणसाला लगेच कळते पण त्यांच्या कर्तृत्वाची दखल न घेणारे त्यांच्यावर विनाकारण आगपाखड करतात. अशी माणसं कितीही भुंकली तरी  त्यांच्या कडे लक्ष देऊ नये.पण आपण हाती घेतलेलं सत्कर्माची कार्य कधीच सोडून नये. अशी वैचारिक बैठक तयार होणे हे परमार्थाच्या मार्गात जरूरीचे आहे. ज्ञानी पुरूषांच्या थोरपणा कळला तर मनाचे समाधान होते. तो न समजणारे हीन लोक जगात असतात. त्यांच्या कडे दुर्लक्ष करणे आपल्या हाती आहे. आत्मज्ञानी पुरूष परमात्मस्वरूप असतो. पण अज्ञानी माणूस त्याला सामान्य पुरूष समजतात. जसा भाव तसा देव. साधुसंत आत्मज्ञानी असतात. त्यांच्याकडे पुरेपूर समाधान असते. ते देहाने वावरत असले तरी अंतरीच्या प्रचीतीने परमात्मस्वरूप असतो. सततच्या निदिध्यासाने अनन्य होऊन तो आत्मस्वरूपात होतो.




सौ. उज्ज्वला धर्माधिकारी
संपर्क क्र. 7588235646

## सर्व दुःखांचे मूळ देहबुद्धी आहे

आधुनिक केसरी

परमार्थाचा विषय तसा खरोखरच कठीण आहे, आणि सर्वांना नडणारा आहे. ज्याला हा विषय जाणून घ्यायचा असेल त्याला, मी कोण हे जाणण्यापेक्षा, मी कोण नव्हे हे जाणणे महत्त्वाचे आहे. एखाद्या पाऊलवाटेने जात असताना ती वाट चुकलो आणि आपण भलत्या मार्गाला लागलो तर त्यापुढला सर्व व्यवहार चुकत जाणार. एखादे गणित सोडविताना एखाद्या आकड्याची चूक झाली की त्यापुढले सर्व गणित चुकत जाते, किंवा, एखाद्या रोगाचे निदान बरोबर झाले नाही तर मग त्या रोगावर केलेली औषधयोजना फुकट जाते, त्याप्रमाणे, मनुष्याच्या सर्वसामान्य गुणधर्मांचे आकलन जर बरोबर झाले नाही, तर या गुणधर्मावर आधारलेला परमार्थाचा मार्गही जाणणे फार कठीण गोष्ट होईल. आपण आनंदी असावे, नेहमी आनंदात रहावे, असे सर्वांनाच वाटते; हा झाला पहिला गुणधर्म. या आनंदात चिरंतन असावे, निदान आनंदाच्या अपेक्षेत तरी चिरंतन राहावे, असेही आपल्याला वाटते. खरे म्हणजे मरण कुणालाच आवडत नाही; जगण्याची हाव



किंवा चिरंतन राहण्याची आवड आपल्याला सर्वांनाच असते. परमेश्वर आनंदरूप आहे, तो चिरंतन आहे; आपल्या ठिकाणी तो अंशरूपाने असल्याने आपल्यालाही तसे राहणे साहजिकच आवडते. पण आपली मुळात वाट चुकली, आणि म्हणून त्यापुढले सर्व व्यवहारही चुकत गेले. एखाद्याच्या परसातले झाड पडल्यावर तो ‘ माझे झाड पडले ’ असे म्हणतो, परंतु त्याचा देह पडल्यावर ‘ त्याचे शरीर पडले ’ असे नाही आपण म्हणत, ‘ तो मेला ’ असे म्हणतो. म्हणजेच मुळात चूक ही की, आपण स्वतःला देह समजूनच राहतो. देह माझाच समजून त्याच्यावर प्रेम करतो, ही पहिली चूक. नंतर, या देहाचे गुणधर्म म्हणजे विकार आपल्याला चिकटल्यावर, त्यांचीच जोपासना करतो, ही दुसरी चूक. एकदा हे विकार चिकटल्यावर, त्यांची वाढ न थांबविता, ते नेतील तिकडे त्यांच्या पाठीमागे जाणे, आणि त्याकरिता वेळप्रसंगी आपली बुद्धीही गहाण टाकणे, ही तिसरी चूक. अशा रीतीने चुकांनी चुका वाढत जाऊन आयुष्याचे गणित मग साफ चुकते. एखादे झाड तोडायचे असेल तर प्रथम त्याच्या फांद्या तोडाव्या लागतात, आणि नंतर बुंधा तोडतात; तसे, नीतिधर्माने वागणे म्हणजे देहाला लागलेल्या विकाराच्या फांद्या तोडण्याप्रमाणेच आहे. दुसरी योजना म्हणजे सगुणभक्तीची. सगुणभक्ती करताना माणूस क्षणभर का होईना स्वतःला विसरतो, आणि ‘ मी तुझा आहे ’ असे म्हणतो. या भगवंताचा सतत सहवास जर कशाने लाभत असेल तर त्याच्या नामानेच. या नामाच्या सहवासात राहिल्याने देहावरचे प्रेम आपोआप नष्ट होईल, आणि मग देहाने मांडलेल्या प्रपंचावरचेही प्रेम कमी होईल. पुढे त्याला सर्वत्र परमेश्वरच दिसेल. तेव्हा आत्तापासून, मी राहीन तर नामातच राहीन असा निश्चय करा. मला खात्री आहे, राम तुमच्यावर कृपा करील.

## कान्होपात्रा

आधुनिक केसरी

कान्होपात्रा रूपवती होती. तितकीच बुद्धीमानही होती. ती मेनका-अप्सरेचा अवतार असल्याचं लोककथांमधून मांडलं गेलंय. गायन आणि नृत्यात तिने अगदी लहान वयात प्रावीण्य मिळवलं होतं. हळूहळू तिचं कलानैपुण्य आणि सौंदर्याची कीतीर् दूरवर पसरली. तिची आई अत्यंत धनवान गणिका होती. महालासारखा त्यांचा भव्य प्रासाद होता. अनेक दासी तिच्या सेवेला तत्पर होत्या. शामाने कान्होपात्रेच्या शिक्षणाची चोख व्यवस्था केली होती. कान्होपात्रेने आपला गणिका व्यवसाय पुढे चालू ठेवावा. राजदरबारी रूजू व्हावं असं शामाला वाटत होतं. तर कान्होपात्रेला त्याची किळस वाटत होती.



आधुनिक केसरी
विश्वव्यापी मराठी दैनिक
मंगळवार, ३० जानेवारी २०२४


# काँग्रेसची 'न्याय यात्रा' राजकीय सोंग

आपण धन्य झालो! अश्या भावना भाविकांनी व्यक्त केल्या आहेत. पण काँग्रेससह विरोधी पक्ष व औवेसी-सारखे कट्टर मुस्लिम नेते मात्र दुःखी झालेले आहेत. औवेसी म्हणाले 'मी हे दुः ख विसरु शकत नाहीत. ते बॅरिस्टर आहेत. त्यांना घटना व न्यायालयापेक्षा धर्म महत्वाचा वाटतो. मुस्लिम राष्ट्राची संघटनेने ( ओआयसी) अयोध्याच्या सोहळ्यावर निषेध नोंदविला आहे. पण ही मंडळी भारतातील धार्मिक अत्याचाराचा इतिहास लपवित आहेत.धर्मांध राजांनी मंदिरे उध्वस्त केली,हा इतिहास आहे. तेंव्हा हिंदूच्या पूर्वजांना दुःख झाले नाही काय? मोगल बादशहा जहीर- उद- दीन मुहम्मद बाबर हा हिदू व्देष्टा होता.त्याने तर केवळ एक अयोध्या राम मंदिर उध्वस्त केले नाही असे नाही,आणखी दोन प्राचीन मंदिरे उध्वस्त केली.त्याने १५२७ मध्ये पानीपत ( हरियाणा) युध्दात सुलतान इब्राहिम लोधीचा पराभव केला. तेथील प्राचीन मंदिर तोडून मस्जिद बांधले व पत्नी काबूल बेगम हिचे नाव दिले.दुसरे म्हणजे,कलियुगात विष्णू भगवान कल्कि अवतार घेणार असल्याने उत्तर प्रदेशातील संबल येथे एक हजार वर्षापूर्वी मंदिर उभारले.या मंदिराचा जीर्णोव्दार इंदोरची महाराणी अहिल्याबाई होळकर यांनी केला होता.बाबरने मंदिर तोडून तेथे शाही जामा मस्जिद उभारली.तेथे आजही तेथे मंदिराचे अवशेष आढळतात.या प्रवेशव्दारावर राजचिन्ह व शिलालेखही आहेत, रामांची प्राणप्रतिष्ठा झाली आता राष्ट्राची प्रतिष्ठा उंचविण्यासाठी सर्वांची साथ हवी आहे.अयोध्येच्या सोहळ्यानंतर हिंदूनी इतर धर्माला हिणवणे, अथवा अवमान होणार याची काळजी घेतली पाहिजे.



कमलाकर जोशी
ज्येष्ठ पत्रकार, नांदेड
संपर्क क्र. 9422170850

अयोध्याप्रमाणे मथूरा व काशी ( वाराणशी) ज्ञानवापी मंदिराच्या अतिक्रमणाचा वाद सुरु आहे.भारतीय पुरातन विभागामार्फेत सर्वेक्षण करण्यात आले.त्यांच्या मंदिराचे अवशेष व देत व देवता आहेत,असे म्हंटले आहे.यावरुन प्राचीन मंदिरावर मस्जिद बांधली गेली.हा वाद न्यायालयापेक्षा दोन समाजाच्या चर्चेतून सोडविता येतो.तेंव्हा भारतीय मुस्लिमांनी 'भाईचारा' निर्माण करण्यासाठी या प्रकरणात एक पाऊल मागे घ्यावे व ती अतिक्रमण जागा सन्मानपूर्वक हिंदूना सुपूर्द करावी.भारतात हिंदू व मुस्लिम बांधव एकत्रपणे राहतात,हे जगाला दाखवून द्यावे. देशात मुस्लिम समाजाच्या शैक्षणिक,आर्थिक प्रगतीसाठी प्रयत्न गरज आहे. भारताचा इतिहास हिंदूवर अत्याचार झाले,धर्मांतर मोठ्या प्रमाणात केले गेले.हिंदू संस्कृती नष्ट करण्याचे प्रयत्न झाले. हेसर्व हिंदू बांधव हजारो वर्षापासून सहन करत आहे.हिंदू बांधव हा कधीही आक्रमक होत नाही अथवा धार्मिक अतिक्रमण करणारा नाही.समाजावर झालेल्या अन्याय व अत्याचाराचा मुस्लिम समाजाने विचार करावा,अशी अपेक्षा आहे.स्वातंत्र्यानंतर हिंदू समाजाला न्याय मिळेल,अशी अपेक्षा होती.पण काँग्रेसच्या तुष्टीकरण नीतीमुळे हिंदू मस्लिम समाजात दरी वाढत गेली काँग्रेस सरकारने आजपर्यंत क्रूर राजांच्या गौरवाचा इतिहास शिकवला. देशाचे पहिले शिक्षणमंत्री मौलाना अब्दुल कलाम हे शाळेत गेले नाहीत. ते मक्काच्या मदरश्यात इस्लामिक शिक्षण घेतले आहे.त्यांचे खरे नाव सय्यद गुलाम मुहियुद्दीन अहमद बीन खैरुद्दीन अल हुसेनी,असे आहे. त्यांना मौलाना अब्दुल कलाम हे नाव कोणी दिले? अश्या व्यक्तीकडून चांगल्या शैक्षणिक धोरणाची अपेक्षा तरी कशी करणार? तेंव्हा आज इतिहासाचे पुनर्लेखन करण्याची गरज आहे.केंद्रातील भाजपा व मोदी सरकारने केवळ धार्मिक महत्व देते असे नाही.मोदी हे लोकनेते आहेत. देशात विज्ञान तंत्रज्ञान,आर्थिक व विकासाला गती देण्याचे धोरण प्रभावीपणे राबवित आहे.भाजपाने २०१४ निवडणुकीपूर्वी घोषणापत्रात ३७६ आश्वासने दिली होती.त्यातील ११७ पूर्ण केली तर १९० वर काम चालू असून १९ अपूर्ण आहेत.यात काश्मीरचे ३७० कलम हटविणे व अयोध्यात राम मंदिराची उभारणी केली.पंतप्रधान मोदी हे हिंदूच्या भावनाचा विचार करतात,असे नाही.त्यांनी आंबेडकर विचारांचा आदर केला.लंडनमध्ये डॉ.बाबासाहेब आंबेडकर राहत ते निवास खरेदी करून ते स्मारक बनविले.तसेच म. बसेश्वरांच्या पुतळा अनावरण मोदींनी केले. मोदी हे भारतात,नव्हे!विदेशात राष्ट्रीय महापुरुंषांचा सन्मान करतात.ते इतर धर्माबद्दल अनादार अथवा व्देष करत नाहीत.मोदी विदेशातील ऑगस्ट२०१५ शेख जायद मस्जिद युएई, फेब्रु.२०१८ सुलतान कबूस ओमान,मे-२०१८ मध्ये इस्तिकलाल मस्जिद इंडोनेशिया,जून- २०१८ चूलिया मस्जिद सिंगापूर येथे भेटी दिलेली आहे दिवंगत नेते पंडित दीनदयाळ उपाध्याय यांचे समाजातील शेवटच्या माणसापर्यंत न्याय देता आले पाहिजे,असे ध्येय होते.त्याप्रमाणे आज मोदी सरकार शेतकरी, गरीब!महिलांसाठी योजना आणल्या नाहीत तर त्या प्रत्यक्षात अमंलात आणलेल्या आहेत,भाजपाचे सरकार म्हणून देशात योजना राबवितांना भेदभाव केला जात नाही.देशात सर्वांनाच धार्मिक स्वातंत्र्य आहे.पण कट्टरपंथीय नेत्यांना कायदे धर्मावर आधारित कायदे हवे आहेत,ते घटनेवर नको आहेत.त्यामुळे भाजपाच्या प्रत्येक धोरणाचा विरोध केला जातोय.काँग्रेसने लोकशाही व घटनेची पायमल्ली केली.या पक्षाने आणीबाणी लादली,तसेच मुळ घटनेत धर्मनिरपेक्ष व समाजवाद हे शब्द घुसविले. गांधी विचारांच्या पक्षाने ब्राह्मण, शीख,व साधूंचे हत्यांकाड घडविले.काँग्रेस नेत्यांच्या जीभेवर नथूरामचे नाव येते पण चौफेकर बंधू व इतर क्रांतीवीरांचे नाव येत

---

आधुनिक केसरी

**अयोध्यात प्रभू राम प्राणप्रतिष्ठा सोहळा होत असताना गांधी परिवार न्याय यात्रेत मग्न होता.काँग्रसने सत्तेत असाताना हुकूमशाही, हिंसाचार, भ्रष्टाचाराला बळ दिले. हा पक्ष समाजावर अन्याय करत आलेला आहे. आता सत्तेसाठी न्याय यात्रा काढत आहे. २०२४ लोकसभा निवडणूक डोळ्यासमोर ही यात्रा काढली जात आहे,यातून पक्षाला फायदा होईल, याचे स्पप्न पाहिले जात आहे. पण पक्षाला फारसा फायदा होणार नाही. काँग्रेसची ही यात्रा 'सौ चूहे खा के बिल्ली हज चली' असे म्हणावे लागेल. भारतात पाचशे वर्षाच्या प्रदीर्घ प्रतीक्षेनंतर अयोध्येत राम मंदिर उभारले गेले. दि.२२ जानेवारीला प्रभूरामांच्या मूर्तीची प्राणप्रतिष्ठा पंतप्रधान नरेंद्र मोदी यांची हस्ते करण्यात आली. राम आणि त्यांचे रामराज्य हे बंधूभावची प्रेरणा देणारे आहे. भारतात नव्हे, विदेशात राम मंदिराचा सोहळ्याचा आंनदोत्सव साजरा झाला.हा सोहळा पाहताना अनेकांच्या डोळ्यात अश्रू आले. या जन्मात आपणाला प्रभूरामचंद्र विराजमान झाल्याचे पाहण्याचे भाग्य लाभले!**

---



नाही.गांधी परिवाराला कोणता न्याय अपेक्षित आहे.गांधी परिवाराने सत्तेतून अमाप संपत्ती कमविली आहे. पक्षाचा 'रिमोट कंट्रोल' या परिवार आहे. राहूल गांधी हे नेहमी राष्ट्रीय स्वयसेवक संघावर आगपाखड करत असतात.पण संघ ही राष्ट्रप्रेम, सेवाभाव त्याग,चारित्र्य व संस्काराची भट्टी आहे.ही जगातील सर्वात मोठी संघटना आहे.संघाने पंतप्रधान मोदीसारखे नेते घडवले आहेत.हे नेते भारत मातेची,निः स्वार्थ भावनेने सेवा काम करत असतात.भाजपा हा व्देषाचे राजकारण करता असा गांधी यांचा आरोप निराधार आहे.या काँग्रेसने १९९१ मध्ये प्रार्थनास्थळाचा कायदा आणला यास व्देष भावना म्हणतात.हिंदू समाजाला भावनेचा विचार न करता अनेक कायदे लादले. काँग्रेस पक्षाचे नेते महात्मा गांधी नाव घेत असतात पण आचारण मात्र कसाबाचे आहे.देशात भ्रष्टाचार हा संपला पाहिजे,पण आम्हाला सोडून, ही काँग्रेसची वृत्ती आहे.मोदीमुळे परिवारवादी व भ्रष्ट पक्षांचे अस्तित्व धोक्यात आले आहे.इंडी आघाडीत जागा वाटपावरुन रस्सीखेच सुरु झाली आहे.यातून ममता व केजरीवाल आघाडीतून बाहेर पडण्याची शक्यता आहे.लोकशाहीत विरोधी पक्ष सक्षम असला पाहिजे.काँग्रेससह विरोधी पक्ष हा सकारात्मकपेक्षा नकारात्मक राजकारण करत आलेला आहे. मोदींनी स्वच्छ भारत अभियान,डिजिटल इंडिया,मेक इन इंडिया सारखे कार्यक्रम राबविले,याची गांधीनी थट्टा केली.

राहूल गांधीची लोकसभा निवडणुकीच्या तोंडावर न्याय काढली आहे.ती ज्या राज्याच्या रस्त्याने जाईल,तेथे काँग्रेस पक्षाला फायदा होईल,असे त्यांना वाटते. यात्रेत मोदी सरकारच्या धोरणातील त्रुटी व चुकीवर टीका करत नाहीत केवळ भाजपा,मोदी व आरएस.एस.ला शिव्या देणे हाच त्रिसूत्री कार्यक्रम चालू आहे.या यात्रेला इंडी आघाडीचे घटक पक्ष तृणमूल काँग्रेस व आम आदमीचा विरोध होत आहे.न्याय हे समाजाचे मुख्य व अविभाज्य अंग आहे.न्याय कसा असावा, या विषयी अनेक मत प्रवाह आहेत,परंतु त्यातील नैतिक दृष्टीकोनातील बहुतेक मते जूळतात, त्यामुळे प्रत्येक संस्कृतीतील न्यायाचा वापर वेगळा असतो.प्राचीन ग्रीक तत्वज्ञ प्लेटो यांच्या मते 'जो लोकांना त्यांचे हक्क मिळवून देतो,याची खात्री करू शकतो.तो म्हणजे योग्य न्याय आहे'.या न्यायात राजकीय व सामाजिक आर्थिक न्याय असे तीन प्रकार आहेत.तो न्याय कायदेशीर, निष्पक्षता,जलद गतीने,स्वस्त व वस्तुनिष्ठ असला पाहिजे. नागरिकांना समान आणि राजनैतिक अधिकार व सरकारमध्ये सामान आवाजाची आवश्यकता आहे. भारतीय घटनेने प्रत्येक नागरिकाला समान अधिकार दिले आहेत.मोदी सररकाने तपास संस्थाना स्वायत्तता दिली.देशात प्रथम भ्रष्ट राजकीय नेत्या विरोधात प्रथम कारवाई होत आहे.यात विरोधी पक्षातील ९५ टक्के नेत्यांकडे अवैध संपत्ती व कोट्यवधी रुपये सापडत आहे.या कारवाईचे सामान्य माणसाचा विरोध नाही.यात गांधी परिवार अडकला आहे.मोदी हे गुजरात असल्याने या राज्याच्या घटनांकडे लक्ष्य केले जात आहे.पण दुसरीकडे पश्चिम बंगालचा हिंसाचार व भ्रष्टाचार! दहशदवाद आणि केंद्र सरकारच्या अधिकाऱ्यावर हल्ले होतात.या राज्यात कायदा व सुव्यवस्था पूर्णपणे उध्वस्त झाली असताना गांधी परिवार मौन पाळतो? गांधी यांनी यात्रा मणिपूर सुरुवात केली.पण काश्मिर अनेक वर्षे जळत असताना व हिंदू पंडितावर अत्याचार झाले. त्यांना न्याय देण्याची सुद्बुध्दी पक्षाला सूचली नाही.काँग्रेसचे २०२० च्या गुजरात दंगल प्रकरणाचे अजूनही राजकारण करत आहे. बिल्किस बानो प्रकरणात आरोपींना शिक्षेत सूट देण्याचा प्रस्ताव होता.तो सर्वोच्च न्यायालयाने रद्द केला आहे.ते योग्य झाले.वास्तविक कोणत्याही राज्य सरकारला गंभीर आरोपाखाली शिक्षा झालेल्या आरोपीला शिक्षेत सूट देण्याचे कायद्याने अधिकार असता कामा नये.पण न्यायालयाने तसा निकाल दिलेला नाही.याबाबत प्रियंका वाड्रा व राहुल गांधींनीश लगेचच प्रतिक्रिया दिली.या निकालामुळे सर्वांनाच न्याय मिळाला व न्यायाची हत्या केली होती,असे ते म्हणाले.गुन्हेगाराला जात व धर्म नसतो! हे ज्ञात असताना गुजरात सरकारवर लक्ष्य केले जात आहे.या निकालाकडे धार्मिक चष्मातून पाहिले जात आहे.अश्या घटनेतूनही केवळ मुस्लिम समाजाची सहानूभूती मिळावी,या मागचा उद्देश आहे. देशातील अनेक हिंसाचारात गांधीवादी विचाराचे नेते होते,यात किती जणांना शिक्षा झाली. देशाच्या राजधानीत१९९५ युवक काँग्रेसच्या नेत्याने तर पत्नीला तेंदूर भट्टीत टाकून जाळले .तसेच दिल्लीत २०१२ मध्ये निर्भयाकांड घडले.तर महाराष्ट्रात तरुणीवर बलात्काराच्या घटना घडल्या राजस्थान- मध्ये काँग्रेस सरकार असताना हे राज्य महिला अत्याचारात आघाडीवर होते,राजस्थानमध्ये काँग्रेस सरकार असताना महिलेला विवस्त्र करुन धिंड काढली गेली.इतकेच नव्हे,'सीर तनसे जूदा' म्हणत गळा कापला गेला.गांधी परिवार याला न्याय म्हणणार काय? तेंव्हा काँग्रेस पक्ष चूप होता.तत्कालिन पंतप्रधान यांनी १९८६ मध्ये शहाबानो पोटगीबाबत प्रकरणात सर्वोच्च न्यायालयाने निकाल दिला असताना न्यायालयाच्या विरोधात जाऊन कायदा केला.तसेच २०१७ मध्ये शायरा बानो महिलेला पतीने तीन तलाक दिला होता.तो न्यायालयाने घटना- बाह्य ठरविला.त्या मुस्लिम महिला नाहीत काय? तीन तलाक हा कायदा सामाजिक न्याय देणारा असताना काँग्रेसने विरोध का केला ? काँग्रेसच्या राजवटीत अनेक दंगली झालेल्या आहेत. दंगल माणूसकीला कलंकच असते.याचे समर्थन होवू शकत नाही. गुजरात दंगलीत तर दोन्ही समाजाचे लोक मारले गेले. गोधरा येथे रेल्वेडब्याला आग लागून ५७ रामभक्तांना जीवंत जाळले गेले यात काँग्रेसचा नेते होते.या आरोपीना फाशी झाली पाहिजे, अशी मागणी काँग्रेस करत नाही.गुजरात दंगली प्रकरणात भाजपा नेते मोदी व शहा व ६५ वरिष्ठ पोलिस अधिकाऱ्यांना अडकविण्याचा कट तथाकथित सामाजिक कार्यकर्त्या तिस्ता सितलवाड हिने रचला होता. तीस या गांधी परिवाराने आर्थिक पाठबळ दिले,पद्मश्री पुरस्कार दिला. बिल्किस बानो यांचेप्रकरणात मोदी विरोधी व राजकीय शक्तींचे पाठबळ होते.यात एका महिलेला न्याय देणे मिळवून देणे ही भावना मुळी नाही. या प्रकरणात मोदी व्देषाची भावना आहे. सामान्य माणूस सर्वोच्च' न्यायालयाच्या पायऱ्याही चढू शकत नाही.सर्वोच्च न्यायालयाने अनेक निकाल व केंद्र व राज्याच्या विरोधात दिले आहेत!बिल्किस बानो प्रकरणात ११ आरोपींनी २००८ मध्ये जन्मठेपेठीची शिक्षा झाली.यात आरोपींनी चौदा वर्षे शिक्षा भोगली. यात गुजरात सरकारने शिक्षा माफ केलेली नाही.घटना गुजरातमध्ये घडली व न्यायालयाच्या आदेशानुसार तो खटला मुबंईत चालविला गेला.घटनेतील कलम ७२ नुसार राष्ट्रपतींना शिक्षा माफ अथवा कमी करण्याचा अधिकार आहेत.तसेच घटनेतील कलम, ४३२ व ४३३ अनुसार राज्य सरकारला दोषी आरोपींच्या शिक्षेत सूट देण्याचे अधिकार आहेत.काँग्रेस इतर राज्यांनी या अधिकाराचा वापर करत आला आहे.काँग्रेस सरकारने १९७८ मध्ये या कायद्याच्या कलम ४३३ (अ )मध्ये संशोधन जन्मठेपेच्या शिक्षा ही चौदा वर्षे केली होती. यात न्यायालयाने गुजरात सरकारला यात शिक्षा माफी नीतीनुसार निर्णय घेण्याचे आदेश दिले होते,त्यानुसार गुजरात सरकारने गोधरा जिल्ह्याचे जिल्हाधिकारी यांचे अध्यक्षतेखाली समितीचे गठण केले गेले होते. कारागृह नियमानुसार त्याचे वय,शिक्षेच्या काळातील त्यांचे वर्तन व भोगलेली शिक्षा लक्षात घेवून गुजरात सरकारने प्रस्ताव पाठविला होता, त्यात राज्यपालांनी कलम १६१ नुसार शिक्षेत सुट दिली.या प्रक्रियेला सर्वोच्च न्यायालयात आव्हान दिले गेले,आरोपींना शिक्षेत दिलेली सुट रद्द केली गेली.एका विव्दानाने या विषयावर दैनिकात 'एक न्याय' असा लेख लिहिला. गुजरातचे भाजपा सरकार हे मुस्लिम विरोधी आहे,असा प्रयत्न केला आहे.कांही विव्दान व पत्रकार मंडळी काँग्रेसचा अजेंडा इमान इतबारे चालवित आहेत,यात शंका नाही.पण हे विव्दान लेखक काँग्रेस राज्यात महिलेवर अत्याचार घडला तर तर लिहिणार नाहीत. माजी पंतप्रधान राजीव गांधी यांची १९९१ हत्या झाली.यात तामीळनाडू सरकारने विधानसभेत हत्येतील आरोपींना सोडून देण्याचा ठराव केला व न्यायालयात शपथपत्र दिले होते.यात सर्वोच्च न्यायालयाने १७ नोव्हें. २०२२ मध्ये आरोपींना मुक्त करण्याचे आदेश दिले होते. यातील एक आरोपी नलिनीला २००८ मध्ये प्रियंका भेटावयास गेलेल्या होत्या.आज काँग्रेसचे नेते त्या पक्षाच्या रांगेत बसतात!न्यायालयाने याकूब मेनन, अफजलगुरु यांना फाशीची शिक्षा दिली जाऊ नये,यासाठी विद्वान मंडळी रात्री न्यायालयात गेली होती. देशात देशद्रोही व अतिरेक्यांना सुध्दा फाशीची शिक्षा दिली जाऊ नये, तेंव्हा मानवतेचा धर्म शिकविला जातो! देशात माणसाला शिक्षेसाठी कायदा नसावेत ते सुधारण्यासाठी असावेत,असे ज्ञान देणारी मंडळी हीच! देशात अतिरेकी,देशद्रोही, बलात्कार,माणसाला फाशीची शिक्षा झाली पाहिजे,यास दुमत नाही.पण यात तथाकथित समाजसेवक व विव्दान मंडळीच्या दुप्पटीपणाला विरोध आहे. काँग्रेसच्या नेत्या व माजी राष्ट्रपती प्रतिभा पाटील यांनी तर ३७ फाशीची शिक्षा झालेल्या याचिका कार्यकर्त्यांना दया दाखवत,त्यांची फाशीच्या शिक्षेचे जन्मठेपेत रूपांतर केले. देशातील विक्रमी नोंद आहे मध्यप्रदेशातील भोपाळ येथे १९८४ मध्ये गॅस दुर्घटनेत ३७८७ लोक तडफडून मेले,तर ५ लाख ७४ हजार ३६६ माणसे कायमचे अपंग झाले. मृत्यू संख्या ८ हजाराच्यावर गेली.याला वॉरेन एडसन जबाबदार होता. तत्कालिन पंतप्रधान राजीव गांधीच्या तोंडी आदेशानुसार त्याला सोडले गेले,तो अमेरिकेत पळून गेला.हे काँग्रेस पक्षाचे नेते अरुण नेहरू यांनी पुस्तकात नमूद केले आहे.तसेच बोफार्स घोटाळ्याचा प्रमुख ईटलीचा दलाल ओतिवियो क्वात्रो यांचेशी गांधी परिवाराशी संबध होते.त्याला पळविले गेले.काँग्रेस पक्ष देशात लोकशाही व घटना,धोक्यात आहे, अश्या वावड्या उठवत असतो.मग न्याय कसा द्यावयाचा ? कोणी द्यावयाचा गांधी परिवार ठरविणार काय?या गांधीनी ओबीसी,जातीय गणनेची मागणी केली. यातून जातीयव्देष पसविण्याचे कारस्थान आहे. याच काँग्रेसने सत्तेत असताना जातीयगणना करण्यास विरोध केला.या पक्षाने ओबीसी समाजाला आरक्षण अथवा न्याय देऊ शकलेला नाही.या गांधी परिवाराशिवाय दुसरा नेता पंतप्रधान झालेला चालत नाही.याचे उदाहरण म्हणजे,काँग्रेस पक्षाचे राष्ट्रीय अध्यक्ष व ओबीसी नेते सीताराम केसरी यांना बाथरुममध्ये कोंडले गेले,त्यांचे धोतर ओढत पक्षाच्या बाहेर काढले गेले.शेवटी १९९८ मध्ये त्यांनी राजीनामा दिला.भारतात दलित नेता बाबू जगजीवनराम यांना प्रथम पंतप्रधान होण्याची १९७७ व १९७९ मध्ये संधी होती.पण काँग्रसने त्यांना पंतप्रधान केलेनाही,उलट त्यांना अपमानीत केले.आज राहुल गांधी हे दलित,ओबीसी समाजाच्या न्यायाची भाषा करत आहेत. इतकेच नव्हे, माजी पंतप्रधान पक्षाचे नेते पी. व्ही.नरसिंहराव यांचा पार्थिवदेह पक्ष कार्यायात ठेवण्यास विरोध केला गेला.गांधी परिवारिने मोरारजी देसाई,चौधरी चरणसिंह,चंद्रशेखर, नरसिंहराव, वाजपयी, देवगौडा,गुजराल हे बिगर काँग्रेसचे असल्याने त्यांचे सरकार पाडण्याचे कारस्थान केले.आज लोकशाही व विरोधी फक्षाच्या सन्मानाची भाषा केली जातेय? तेंव्हा कोठे गेला होता.यांचा राजधर्म? गांधी परिवाराने देशासाठी बलिदान असे सांगितले जाते,पण स्वातंत्र्याच्या लढ्यात या पक्षाचा एकही नेता फासावर अथवा जेलमध्ये गेलेला नाही.स्वातंत्र्यानंतर गांधी परिवारात दोघांची हत्या झाली,याचे कारण चुकीचे धोरण आहे.भारताच्या स्वातंत्र्यासाठी अनेकांनी बलिदान दिले,त्याचे स्मरण होत नाही.नेताजी सुभाषचंद्र बोस यांनी २१ ऑक्टोबर १९४३ रोजी आजाद भारत सरकार स्थापन केले. त्यास सात राष्ट्रांनी मान्यता दिली होती.ते पहिले पंतप्रधान आहेत.त्यांनी आजाद भारताचा ध्वज फडविला होता.आज गांधी परिवार सत्तेसाठी भारत जोडो न्याय यात्रा काढत आहे,ते राजकीय सोंग आहे,हे म्हणजे 'चोराच्या उलट्या बोंबा' चा'प्रकार आहे.

# अजित पवारांचे स्पष्टीकरण

आधुनिक केसरी

गेल्या काही दिवसांपासून मराठा आरक्षणाचा मुद्दा चांगलाच तापला होता. अखेर २७ जानेवारी रोजी मराठा आरक्षणासंदर्भातला अध्यादेश मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी स्वत: मनोज जरांगे पाटील यांच्या हातात सोपला. मात्र, यानंतर ओबीसी समाजामध्ये तीव्र विरोधाची भावना निर्माण झाली आहे. ओबीसी नेते व राज्यातील सत्ताधारी अजित पवार गटातील मंत्री छगन भुजबळ यांनी आपल्याच सरकारविरोधात दंड थोपटले असून मुख्यमंत्र्यांचा निर्णय आपल्याला मान्य नसल्याची भूमिका जाहीर केली आहे. यासंदर्भात आता अजित पवार यांनी आपली भूमिका स्पष्ट केली आहे. ते कोल्हापूरमध्ये पत्रकारांशी बोलत होते. छगन भुजबळ यांनी २८ जानेवारी रोजी माध्यमांशी बोलताना ओबीसी समाजातील व्यक्तींना मराठा आरक्षणासंदर्भातल्या शासकीय अध्यादेशावर अधिकाधिक हरकती सादर करण्याचे आवाहन केले. तसेच, येत्या ३ फेब्रुवारी रोजी ओबीसी एल्गार मेळाव्याचेही आयोजन करण्यात आल्याची घोषणा त्यांनी केली आहे. छगन भुजबळ आक्रमक होत असताना अजित पवार यांची त्यावर नेमकी भूमिका काय? याबाबत पत्रकारांनी विचारणा केली असता अजित पवारांनी त्यावर स्पष्टीकरण दिले. प्रफुल्ल पटेलांनी यासंदर्भात पक्षाची भूमिका स्पष्ट केली आहे. पक्षाकडून किंवा सरकारमध्ये काम करत असताना सर्व घटकांना न्याय देता आला पाहिजे. कोणत्याही घटकाला नाराज ठेवून चालत नाही. राज्याच्य प्रमुखांनी छत्रपती शिवाजी महाराजांची शपथ घेऊन मराठा आरक्षण देणार असे सांगितले होते. गेल्या दोन दिवसांतल्या घडामोडी महाराष्ट्रातल्या सर्व जनतेने पाहिले आहे. कोणत्याही निर्णयाबाबत वेगवेगळ्या सहकाऱ्यांची वेगवेगळी मते असतात. मुंबईला गेल्यानंतर मी, मुख्यमंत्री, देवेंद्रजी भुजबळांशी बोलू असे अजित पवार म्हणाले. प्रत्येकाचे काही समज-गैरसमज असतात. काहीजण ते बोलून दाखवतात. पण यातून कुणालाही दुखवायचं काही कारण नाही. कुणावरही अन्याय करण्याचं कारण नाही. काल मुख्यमंत्री आणि मी एकत्र शंभूराज देसाईंच्या मुलाच्या लग्नाला होतो. तिथेही आमचे बोलणे झाले. रात्री मी मुंबईला मुक्कामाला जाणार आहे. तिथे त्यांच्याशी बोलेन, अशी माहिती अजित पवार यांनी दिली.



राम कुलकर्णी,
संपर्क 9422742577

# परिवर्तनाच्या युगात एका माणसाने करून दाखवले, कलियुगात प्रभु रामचंद्र स्थापित झाले

आधुनिक केसरी

**परिवर्तनाच्या युगात एक व्यक्ती काय करू शकतो? इतिहासाची पानं चाळुन पाहिल्यानंतर रामाने रावणी राक्षस कुळाचा समुळ नाश केला तर श्रीकृष्णाने कंसाच्या कुळाचं उच्चाटन केलं. हिरण्यकशिपुसारखा पिसाळलेला राक्षस एक प्रल्हाद होता म्हणुन नाश झाला तर हिंदवी स्वराज्याची स्थापना केवळ एका छत्रपती शिवाजी महाराजामुळे झाली.**

प्रेरणा, सामर्थ्य, धाडस असेल तर परिवर्तित युगात देखील एक व्यक्ती काय करू शकतो? जसं की स्वातंत्र्याचा लढा राष्ट्रपिता महात्मा गांधी यांच्याभोवती फिरतो. त्या प्रमाणात आयोध्येत रामलल्ला भव्य दिव्य मंदिरात पुनश्च विराजमान झाले आणि भारत वंशातील वर्षानुवर्षांचे 138 कोटी रामभक्तांचे स्वप्न साकार झाले.

राजा तशी प्रजा असंही म्हटल्या जातं. कारण एक आदर्श माणुस समाज ज्याचं अनुकरण केल्याशिवाय रहात नाही. आयोध्येत राम मंदिर रामलल्ला मुर्ती प्राणप्रतिष्ठा करण्यासोबत पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी सनातन हिंदु धर्माच्या भारतीय संस्कृतीला आलेली मरगळ 22 जानेवारी दुपारी 12.29 मिनिटाला झटकुन टाकली. पुन्हा एकदा हा देश धर्माच्या रूढी परंपरेनुसार कसा चालतो? आणि भारतीय हिंदु देवाधिकांच्या वर श्रद्धा कशी असते? याचे आदर्श दाखवुन दिले. ज्यामुळे देशाच्या कानाकोपऱ्यात नव्हे तर जगाच्या पाठीवर हिंदु धर्म जाग उठा त्याप्रमाणे नव्या जोमाने श्रद्धेचा सुर्य घराघरात प्रत्येकाच्या मनात पसरलेला दिसतो. प्राणप्रतिष्ठा झाल्यानंतर अवघ्या दोन दिवसात चार लाख भाविक भक्तांनी दर्शन घेणे यावरून एक माणुस काय करू शकतो?परिवर्तनाच्या युगात एका माणसाने करून दाखवले, कलियुगात प्रभु रामचंद्र स्थापित झाले.

एक माणुस काय करू शकतो? आणि काय करून दाखवलं? हे सारं जग याचि देहि, याचि डोळा पहातो आहे. मागे वळुन पाहिलं तर प्राचीन संस्कृती इथपासुन भारतीय रूढी-परंपरा ज्याचा आधार धार्मिकतेचा आणि श्रद्धेचा म्हणुन ओळखल्या जातो. रितीरिवाज सण, उत्सव, देवाधिकांची पुजा एवढेच नव्हे आपआपल्या धर्मानुसार मोजल्या जाते. त्रेतायुग, द्वापारयुग, धर्मयुग आणि सद्याचे कलियुग वर्तमानकाळ सुरू आहे. युग कुठलंही घ्या. अगदी राक्षस कुळात देखील देवाधर्माची पुजा कमी नाही. रावण शंकराचा भक्त होता आणि त्याच्या जीवावरच त्याच्या अंगी असलेले सामर्थ्य प्रचंड होते उदाहरणादाखल सांगता येईल. भारतीय संस्कृती सनातन धर्माची जसं की राज्यात वारकरी संप्रदाय म्हणुन ओळखल्या जातो. देवाधिकांचे अनुष्ठान प्रत्येक राज्यात वेगवेगळे आहे ज्याला आज तीर्थक्षेत्र म्हणुन पाहिल्या जाते. मग तामिळनाडूत गोल्डन टेंपल सरस्वती देवीची पुजा तर आंध्रप्रदेशात तिरूपती बालाजी. पंढरपुरचा विठोबा इथपासुन रत्नागिरीचा गणपती, माता वैष्णोदेवी तर मध्यप्रदेशात उज्जैनसारखे तीर्थक्षेत्र. धर्मशास्त्राच्या आधारावर तीर्थक्षेत्राची निर्मिती आणि मानवी जीवनात असलेली त्याची श्रद्धा. पण मागच्या अनेक वर्षापासुन जर पाहिलं तर धार्मिक श्रद्धा कुठेतरी लोप पावत जात आहे की काय? अशा प्रकारचं वातावरण निर्माण होताना दिसु लागलं. ज्यात विधीवत तपश्चर्याचा अभाव निर्माण झाला. एक गोष्ट खरी आहे की धर्मांध शक्तीच्या विरोधात धर्मनिरपेक्ष पुरोगामी विचारवाद्यांनी स्वातंत्र्यानंतर खऱ्या अर्थाने धर्म अनुष्ठानाच्या व्यासपीठावर घाला घालत चुकीच्या मार्गाची दिशा देण्याचा प्रयत्न करताना परमेश्वर आहे का नाही? हा संभ्रम निर्माण केला. मोठे मोठे विचारवंत, वैचारिक लेखक, साहित्यिकसुद्धा अनेकांनी अशाच प्रकारचा सुर आवळुन भारतीय समाजातील नवतरूणांची मानसिकता वेगळ्या दिशेने घेवुन जाण्याचा



केलेला प्रयत्न ज्यामुळे धार्मिक रूढी-परंपरा आणि श्रद्धेला जणुकाही मरगळच येवुन बसली होती. संत तुकाराम महाराज, संत ज्ञानेश्वर महाराज या विभुतींना देखील त्यांच्या अवतार काळामध्ये प्रचंड त्रास झाला. पैठण नगरीत संत एकनाथ महाराज गंगा स्नान करून घरी जाताना विक्रत मनोवृत्तीचे दर्शन एकाने शंभर वेळा केले त्याला उत्तर म्हणुन महाराजांनी शंभर वेळा गंगा स्नान केल्याचा इतिहास अजुनही पुसला नाही. धर्मजागरण तपश्चर्याचा मार्ग अनुकरण करताना प्रत्येक महापुरूषाला ज्याचा त्रास झाला. भारतीय अस्मिता किंवा हिंदु धर्माची निष्ठा पुसुन टाकण्यासाठी अफझलखान जेव्हा कपट नितीचा वापर करत छत्रपती शिवाजी महाराजांना ठार मारण्यासाठी तुळजापुर, पंढरपुर वाईमार्गे पुण्याकडे आला त्यावेळी देखील त्याने हिंदु देवतांची मोडतोड केल्याचा इतिहास आजही जिवंत आहे.

वास्तविक पहाता हिंदवी स्वराज्य स्थापन करणाऱ्या सामर्थ्यवान छत्रपती शिवाजी महाराजांनी अफझलखानाला यमसदनी पाठवून धडा शिकवला.सांगायचं तात्पर्य हे आहे की, अवतारी पुरूष, महापुरूष होवुन गेले नव्हे तर कालानुरूप परिवर्तित बदल बरंच काही घडून जातात. कलियुगात पुरोगाम्याच्या नावाखाली धर्मसंस्था जणुकाही ढग आलेल्या अवस्थेत गुदमरून जात होती. अशा परिस्थितीत आयोध्येत प्रभु रामचंद्राची प्राणप्रतिष्ठा होणं म्हणजे कलियुगात परमेश्वर अवतार स्थापित होण्यासारखं आणि हे सारं होताना प्रत्यक्ष आचरणामधुन ज्याप्रकारे धार्मिक सोहळा एका व्यक्तीच्या हातुन घडला ते म्हणजे पंतप्रधान नरेंद्र मोदी ज्यांनी खरंच भारतीय हिंदु संस्कृतीला आलेली मरगळ झटकुन टाकली असंच म्हणावे लागेल. कारण 22 जानेवारी दुपारी 12.29 मि. हा पवित्र क्षण भारतीय समाज कधीच विसरू शकत नाही. एक हजार वर्षे हा दिवस भव्य दिव्य म्हणुन प्रत्येकाच्या लक्षात राहिल. या निमित्ताने पंतप्रधान म्हणुन अकरा दिवसाचे केलेले उपवास, जमिनीवरचं निद्रासन किंवा इतर पवित्र अनुष्ठान करताना परदेश दौरे देखील त्यांनी केले नाहीत. कारण बाह्य शक्तीचा दोष आपल्या देशात येवु नये म्हणुन.

याउलट देशांतर्गत भ्रमंती करून त्यांनी वेगवेगळ्या तीर्थक्षेत्राला भेटी दिल्या. सांगायचं एवढेच आहे की, पंतप्रधान म्हणुन त्यांनी या संपुर्ण सोहळ्यात सहभाग घेताना दाखवुन दिलेले आदर्श भारतीय संस्कृतीला आणि देशातील नव्या पिढीतल्या तरूणांना घेण्यासारखे म्हणावे लागतील. कारण रामलल्ला मुर्ती भव्य मंदिरात विराजमान होतानाचे क्षण डोळे भरून प्रत्येकाने मुर्ती पाहिल्यानंतर जो भाव ऱ्हदयात आणि मनात टिपल्या गेला याचे साक्षीदार देशाच्या कानाकोपऱ्यातील सुमारे 138 कोटी लोक ज्यांनी परमेश्वराचं अस्तित्व मान्य केलं. मानवी जीवन जगताना देवाशिवाय दुसरा मुक्तीचा मार्ग असु शकत नाही हे आजच्या कलियुगात प्रत्येकाच्या मनाला पटलं. ज्या 22 जानेवारीला रामलल्ला मुर्ती प्राणप्रतिष्ठा झाली तेव्हापासुन अवघ्या दोन दिवसात आयोध्येत चार लाखापेक्षा अधिक रामभक्तांनी जावुन दर्शन घेतले. आज तब्बल दहा हजार पोलीस सुरक्षा व्यवस्था तैनात करावी लागलेली आहे. कारण प्रत्येक भारतीय आयोध्येच्या दिशेने ज्याचे डोळे लागले. किमान पाच वर्षे तरी तिथली गर्दी कमीच होवु शकत नाही. कारण आयोध्या दर्शन म्हणजे प्रत्यक्ष प्रभु चरणी लीन होण्यासारखं म्हणावे लागेल. विविध वर्गसमुदायाचे लोक भाविक भक्त तिथे आलेले दिसतात. एका व्यक्तीमुळे काय घडु शकतं? हा चमत्कार वर्तमान स्थितीत लोकांनी डोळ्यांनी पाहिला. ज्या श्रद्धा, परंपरा, रूढीला मरगळ आली होती अवघ्या काही क्षणात झटकुन टाकली ती केवळ पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्यामुळे. कारण प्रत्येक भारतीय हिंदु आज खऱ्या अर्थाने आहे त्या मंदिरात जावुन यथासांग पुजापाठ, नव्हे तर आपल्याच मंदिर देव्हाऱ्यासमोर बसुन विधिवत पुजा करताना दिसतो आहे. परमेश्वराचे अस्तित्व आहे आणि त्रिकालाबाधित रहाणार हे देखील निमित्ताने पहायला मिळालं. बाकी काही असलं तरी एक माणुस काय करू शकतो? ज्याने 138 कोटी लोकांना धर्माच्या कार्यात  श्रद्धेने आणि आस्थेने कामाला लावले.



गणेश खाडे
संपर्क क्र. 9011634301


# स्वार्थ शिल्लक नसताना प्रकट होईल तेच मूळ रूप असते

आधुनिक केसरी

**मुळ म्हणजे शाश्वत न बदलणार रूप असून बदल हा क्षणिक असतो. कोणत्याही प्रकारचा लाभ ,हित,स्वार्थ हित शिल्लक नसताना देखील जर कोणी आपल्या प्रति सदभावाना ठेवत असेल तर तेच त्या व्यक्तिच मुळ रूप आहे.आणि लाभ हित स्वार्थ संपुष्टात येताच जे रूप दिसेल ते सुद्धा मुळ रूपच होत पण स्वार्थवश ते आपल्याला समजत नाही हे आपलं दुर्दैव असत.व्यक्ति हा कोणीही चांगला वाईट नसतो.मुळ स्वभाव मुळातच मुळ स्वभाव असतो.पण माया रूपी जगात वावरत असताना मायानुरूप व्यक्तिची भुमिका बदलतं राहते असं जरी वरकरणी दिसत असलं तरी तो आपला भ्रम असतो. वास्तविक माणसांचं सत्य रूप आणि असत्य रूप असे दोन वेगवेगळे स्वभाव रूप असतात.**

या दोन्ही स्वभाव रूपाचा संबंध हा स्वार्थ,मोह ,माय या सोबत असतोच एक म्हणजे आपल्या सहवासातील व्यक्तिच्या संदर्भात जो पर्यंत काही स्वार्थ भाव शिल्लक आहे तो पर्यंत कधीचं खरं रूप दिसत नाही.

किंवा प्रकट होत नाही पण स्वार्थ भाव नसताना किंवा संपुष्टात आल्यानंतर जे रूप प्रकट होईल तेच रूप मुळ रूप होतं आणि बाकी सर्व मोह माया होती.खरं आणि वास्तविक रूप हे स्वार्था पलिकडे असतं.आपल्या सहवासातील व्यक्ती कडे आपला कोणताही स्वार्थ शिल्लक नसताना देखील आपली सदभावना टिकुन असणं म्हणजे आपलं खरं रूप प्रकट होण होय.कारण व्यक्तिचा मुळ वास्तविक स्वभाव कसा आहे हे जर जाणुन घेयच असेल तर फक्त स्वार्थ शिल्लक नसताना ची स्थिती आणि मत लक्षात घ्या वास्तविक सत्य रूप दर्शन होईल.स्वार्थाचा चेहरा हा वेगळा असतो.आणि स्वार्थ संपला की चेहरा पण बदलतो मुळात चेहरा बदलतं नाही तोच चेहरा असतो पण तो स्वार्थ ने झाकलेला असतो.महणुन आपल्याला खरया चेहरयाची ओळख दर्शन होऊ देत नाही.जर खरंच आपल्याला एखाद्याचा खरा चेहरा अनुभवायचा असेल तर स्वार्थ शिल्लक नसताना देखील त्याची आपल्या प्रति किती सदभावना टिकुन आहे याच मोजमाप करता आलं पाहिजे आणि हेच मोजमाप खरा चेहरा अनुभवायच माध्यम आहे.जो पर्यंत स्वार्थ शिल्लक आहे तो पर्यंत व्यक्तिचा खरा चेहरा समोर येत नाही हे वास्तव आहे आणि हे वास्तव कोणीही सहजासहजी नाकारू शकत नाही. पण ज्या क्षणी स्वार्थ संपला किंवा संपुष्टात आला



त्या क्षणी मात्र खरा चेहरा कोणत्याही परिस्थितीत मध्ये प्रकट झाल्याशिवाय राहत नाही.आणि हाच चेहरा एकाएकी झालेला नसतो.पहिल्या दिवसापासून असाच चेहरा होता. तो फक्त स्वार्थवश आपल्याला जाणवला नाही. म्हणजे जो पर्यंत एखादया विषयाच्या अनुषंगाने किंवा सहजगत्या एखादा व्यक्तिचा किंवा एखादया क्षेत्रातील आपला सहकारी कसा आहे हे तो आपल्या सोबत असताना आपल्याला समजणं शक्य नाही . परंतु ज्या दिवशी त्याचा स्वार्थ संपुष्टात येईल आणि तदनंतर सुद्धा त्याचा आपल्या प्रति सदभाव कायम रहिला तर तो वास्तविक चांगला व्यक्ती आहे .पण असं आयुष्यात होत का तर खुप कमी वेळा आणि खुप कमी प्रमाणात होत. वास्तविक ज्या क्षणी स्वार्थ तुटतो त्याच क्षणी व्यक्तिचा खरा चेहरा समोर येतो.म्हणून स्वार्थ आणि चेहरा याच खुप जवळच नात आहे.आणी व्यक्तिचा मुळ वास्तविक चेहरा हा सुद्धा स्वार्था नुसारच ठरत असतो . कोणाताही लाभ नसताना सदभावना टिकुन असणं म्हणजे खरा चेहरा समोर येण मुळात या मध्ये संबंध ज्ञान आणि अज्ञानाचा आहे.ज्ञानाच रूप हे कायम असतं आणि अज्ञानाचा रूप वारंवार बदलतं असतं आणि आपण कोणत्या रूपाच्या संपर्कात आहेत त्या नुसार आपलं व्यक्तिमत्त्व ठरत.मुळात कोणाचाही स्वभाव हा एकाएकी बदलतं नसुन स्वभाव हा आत्मस्वरूप असतो.आणि आत्मस्वरूप हे कधीच बदलतं नाही प्रभावीत होत नाही म्हणून आत्मस्वरूपावरून जीवन जगता आलं पाहिजे.वरकरणी नाही तर अंतरयामी आत्म स्वरूप रूप समजून व्यक्तिचित्रण ठरवता आलं पाहिजे पश्चात्ताप होत नाही.

हे पत्र संपादक, मालक, मुद्रक व प्रकाशक डॉ. प्रभू व्यंकटराव गोरे* यांनी सोलापूर तरुण भारत मीडिया लि., प्लॉट नं  ए -३२,  छत्रपती संभाजीनगर इंडस्ट्रीयल को-ऑप., सोसायटी, स्टेशन रोड, छत्रपती संभाजीनगर ४३१ ००५ (महाराष्ट्र) येथे मुद्रित करून प्लॉट नं. २०५, १३ वी योजना, जिजामाता कॉलनी, एन - २, सिडको, जि. छत्रपती संभाजीनगर (महाराष्ट्र) येथून प्रकाशित केले. (* पीआरबी कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी यांची आहे. या अंकात प्रसिद्ध झालेल्या प्रत्येक बातमी, लेख व जाहिरातींशी संपादक सहमत असतीलच असे नाही. सर्व वाद छत्रपती संभाजीनगर न्यायालयाच्या कक्षेत) आरएनआय : एमएएचएमएआर/२०२१/८२५६६, ई-मेल : aadhunikkesari@gmail.com, संपर्क : +९१ ९०७५७ १६७३९

Printed at Solapur Tarun Bharat Media Ltd., Plot No. A-32, Chhatrapati Sambhajinagar Industrial Co-op, Society, Station Road, Chhatrapati Sambhajinagar 431005 (Maharashtra) Plot No. 205, 13th Plan, Jijamata Colony, N - 2, CIDCO, Dist. Chhatrapati Sambhajinagar (Maharashtra) and published by editor, owner, printer, and publisher Dr. Prabhu Venkatrao Gore * (* According to the PRB Act, it is the responsibility of the editor. The editor does not necessarily agree with every news, article, and advertisement published in this issue. All disputes are within the purview of the Chhatrapati Sambhajinagar court.) RNI : MAHMAR/2021/82566, E-mail: aadhunikkesari@gmail.com, Contact : +91 90757 16739

# पैठण येथील संत ज्ञानेश्वर उद्यानातील संगीत कारंजाचे काम प्रगतीपथावर

## पालकमंत्री भुमरे यांनी केली पाहणी

आधुनिक केसरी न्यूज

**पैठण :** गेल्या कित्येक वर्षांपासून पैठण येथील संत ज्ञानेश्वर उद्यान बंद स्थितीत आहे,परंतु पालकमंत्री संदिपान भुमरे यांच्या प्रयत्नामुळे आता उद्यान लवरच संगीत कारंजे,फाऊंटन च्या सह मार्चमध्ये पर्यटासाठी खुले करण्यासाठी विविध कामे प्रगतीपथावर आसल्याने पालकमंत्री संदीपान भूमरे ,उद्यान विकास समिती व अधिकारी यांनी उद्यानात चालु असलेल्या विकास कामाचा शुक्रवारी सायंकाळी पाहणी दौरा केला. या आनुषंगाने 31 मार्चपर्यंत उद्यान सुरु करण्याचा आढावा घेत याठिकाणी म्युझिकल फाऊंटन,लेसर शो सहित उद्यान सुरु होणार आसुन सध्या दोन चॅनल मधील कारंजे काम पुर्ण झाले आहे. संत ज्ञानेश्वर उद्यानात आता आधुनिक पद्धतीचे लेज़र शो व म्युझिकल फाउंटन मुख्य आकर्षण राहणार आसुन यासाठी २१२ कोटी चा उद्यान विकास आराखडा मंजुरी साठी शासनाकडे तयार आहे. उद्यान आहे त्या स्थितीत दुरुस्ती सह मार्च पर्यंत सुरू करावे अशी मागणी यावेळी उदयान विकास समितीच्या सदस्यानी केली असुन याठिकाणचे कामे दर्जेदार करण्याच्या सुचना हि आधिकार्यांना करण्यात आल्या आहेत.

२० फेब्रुवारी पर्यंत म्युझिकल फाउंटन , तयार लॉन ,फुलझाडे,यांचे रोपण करून लवकर चालू करण्यासाठी तातडीचा ५ कोटीचा निधी उपलब्ध होणार असल्याचे पालकमंत्री भुमरे यांनी सांगितले.यासाठी लवकरच एक दक्षता व देखरेख समितीचे गठण करण्यात येवून यात अधिकारी व उद्यान विकास समिती चे सदस्य,यांना प्राधान्य देणार आहे.याठिकाणी स्लाईडवर संत ज्ञानेश्वर उद्यानातील होणार असलेल्या सर्वच बाबी योग्य



पध्दतीने दाखवण्यात आल्या याप्रसंगी पाटबंधारे विभागाचे सबीनवार,प्रशांत जाधव,सातपुते,अंधारे,दुध संघाचे संचालक नंदलाल काळे,दादा बारे,स्विय सहाय्यक नामदेव खरात उद्यान समितीचे प्रा.संतोष गव्हाणे,पवन लोहीया,रमेश लिंबोरे,बाळु आहेर,विजय सुते,सह अधिकारी व नागरिक उपस्थित होते.



**शुक्रवार, दि. दि.26 जानेवारी रोजी ग्रामपंचायत उमरा देशमुख येथे प्रजासत्ताक दिनानिमित्त गावातील ज्येष्ठ नागरिक व आमचे मार्गदर्शक श्री वामनराव नाना देशमुख यांच्या हस्ते तिरंगा ध्वज फडकविण्यात आला.या ठिकाणी उपस्थित उपसरपंच नारायण शेषराव देशमुख .ग्रामपंचायत सदस्य , ग्रामपंचायत सचिव निकम साहेब. जिल्हा परिषद मुख्याध्यापक हिरगुडे सर व शिक्षक वृंद , ग्रामपंचायत कर्मचारी, माजी सरपंच सौ लताताई खंडारे व त्यांचे पती मिलिंद भाऊ खंडारे, बालवाडी शिक्षिका व मदतनीस तसेच गावातील ज्येष्ठ नागरिक साहेबराव साहेबराव बापू देशमुख व तसेच गावातील अनेक मान्यवर उपस्थित होते.**

# व्यवसायात गुंतवणुकीच्या आमिषाने फसवणूक

आधुनिक केसरी न्यूज

**पुणे :** परदेशी चलन व्यवसायात गुंतवणुकीच्या आमिषाने २० जणांची तीन कोटी रुपयांची फसवणूक केल्याचा प्रकार उघडकीस आला आहे. याप्रकरणी भारती विद्यापीठ पोलिसांनी सातजणांविरुद्ध गुन्हा दाखल केला आहे. हनुमंत तुकाराम मोरे (रा. गांधीनगर, सातारा), नामदेव अंकुश गायकवाड, राजश्री रामचंद्र रस्ते , अनिल चव्हाण, रूपाली अनिल चव्हाण (रा. मुनानगर, सातारा), शशिकला मारूती वादगावे, सुरेश गोरख कुंभार अशी गुन्हा दाखल करण्यात आलेल्यांची नावे आहेत. प्राथमिक तपासात आरोपींनी २० जणांची तीन कोटी रुपयांची फसवणूक केल्याचे उघडकीस आले आहेत.

# तारामती बाफना अंध विद्यालय येथे दंत तपासणी शिबिराचे आयोजन

## CSMSS दंत महाविद्यालय आणि रुग्णालयाचा उपक्रम

आधुनिक केसरी न्यूज

**छत्रपती संभाजीनगर :** कांचनवाडी येथील छत्रपती शाहू महाराज शिक्षण संस्था संचलित दंत महाविद्यालय आणि रुग्णालय यांच्याकडून चिकलठाणा औद्योगिक वसाहत मधील तारामती बाफना अंध विद्यालय येथे दंत तपासणी शिबिराचे आयोजन करण्यात आले होते.

या शिबिरामध्ये विद्यालयात शिकत असलेल्या सर्व मुलांची दंत तपासणी करण्यात आली तसेच 3D मॉडेलच्या साहाय्याने मुलांना दात कसे घासावे, दातांची काळजी कशी घ्यायची, किडलेल्या आणि न किडलेल्या दातातील फरक ओळखणे. याबद्दल त्यांना प्रत्यक्ष मार्गदर्शन करून प्रशिक्षित करण्यात आले. तारामती बाफना अंध विद्यालयाचे मुख्याध्यापक श्री. कैलास निकम आणि सहकारी शिक्षक यांनी खूप चांगला प्रतिसाद दिला. या शिबिरास छत्रपती शाहू महाराज शिक्षण संस्था संचलित दंत महाविद्यालय आणि रुग्णालयाचे डॉ. पल्लवी दिवेकर आणि अंतरवसिता गणेश गुरमे, सत्यजीत इंगोले, चंद्रवीर इंगळे, तय्याबा झरीन, फरीहा शेख,



अमोल जाधव, ॠतुजा इंगोले, शामल कामळे, सुमन लाखुले, सिधांतिका गवळी हे डॉक्टर उपस्थित होते. या शिबिरासाठी संस्थेचे अध्यक्ष श्री. रणजित मुळे, सचिव श्री. पद्माकर मुळे, प्रशासकीय अधिकारी डॉ. श्रीकांत देशमुख आणि अधिष्ठाता डॉ. लता काळे यांचे मार्गर्शनाखाली शिबिर घेण्यात आले.

# खेड बुद्रुक -निंबोडी सीमेवरील उघडा मारुती देवस्थानचा सुशोभीकरण शुभारंभ

आधुनिक केसरी न्यूज

**सुशिल गायकवाड**

**लोणंद :** खेड बुद्रुक येथील निंबोडी-खेड बुद्रुक शिवेवर असणाऱ्या उघड्या मारुती देवस्थानला महाराष्ट्र राज्याचे मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या आदेशाने शिवसेना सातारा जिल्हा प्रमुख पुरुषोत्तम जाधव यांच्या शिफारसीने सुशोभिकरण करण्यासाठी निधी मंजूर झाल्याने भूमिपूजन कार्यक्रम पार पडला. कार्यक्रमाच्या सुरुवातीला हनुमानाची महाआरती करण्यात आली

या आरतीचा मान व भूमिपूजनाचा कार्यक्रमाचे प्रमुख पाहुणे म्हणून खेड बुद्रुक गावचे सुपुत्र वारकरी संप्रदायाचे आराध्य दैवत सदाशिव ठोंबरे महाराज उपस्थित होते.या कार्यक्रमाच्या प्रमुख उपस्थितीमध्ये उघडा मारुती देवस्थान सदस्य सचिन दादासो धायगुडे पाटील माजी सरपंच खेड बुद्रुक व शिवसेना खंडाळा तालुका उपाध्यक्ष हे उपस्थित होते.रिपब्लिकन पक्षाचे खंडाळा तालुका अध्यक्ष पवन धायगुडे पाटील,खेड बुद्रुक गावचे आदर्श सरपंच गणेश धायगुडे पाटील,युवा सेनेचे तालुकाप्रमुख अंकुश धायगुडे पाटील, ग्रामपंचायत सदस्य व विकास सेवा सोसायटीचे माजी संचालक दादासाहेब धायगुडे पाटील,सामाजिक कार्यकर्ते विनायक धायगुडे पाटील,सामाजिक कार्यकर्ते ज्ञानेश्वर धायगुडे पाटील,श्रीरंग धायगुडे पाटील, सामाजिक कार्यकर्ते अरविंद धायगुडे पाटील,संदीप शेळके पाटील,ग्रामपंचायत सदस्य सुभाष ठोंबरे, गजानन (बाबा) धायगुडे पाटील,सुनील धायगुडे पाटील, कॉन्ट्रॅक्टर वाघमोडे व ठोंबरे, विकास सेवा सोसायटीचे विद्यमान व्हा.चेअरमन बाळासो रासकर,माजी व्हा. चेअरमन प्रभाकर धायगुडे, विद्यमान संचालक डॉ.श्रीरंग कोळेकर,खेड बुद्रुक तंटामुक्ती अध्यक्ष संतोष धायगुडे पाटील,खेड बुद्रुक विकास सेवा सोसायटीचे तज्ञ संचालक बाबासो माने,खेड बुद्रुक ग्रामपंचायतचे माजी सदस्य गजानन धायगुडे पाटील,माजी सरपंच तानाजी धायगुडे पाटील,युवा संघटक जाफर मुजावर, सुलतान



मुजावर,धनाजी ठोंबरे,राजेंद्र मोरे,किरण ठोंबरे,बाबू धायगुडे पाटील,युवा उद्योजक कैलास साळुंखे आदी उपस्थित होते.उघडा मारुती देवस्थानचे सदस्य कैलास डोईफोडे यांनी उघडा मारुती देवस्थानचे महत्व सांगितले.उघडा मारुती देवस्थानचे सदस्य,माजी सरपंच व शिवसेना खंडाळा तालुका उपाध्यक्ष सचिन धायगुडे पाटील यांनी बोलताना सांगितले की , मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या आदेशानुसार शिवसेना जिल्हाप्रमुख पुरुषोत्तम जाधव यांच्या आशीर्वादाने तसेच उपजिल्हाप्रमुख प्रदीप माने यांच्या ताकतीने व तालुका अध्यक्ष भूषण शिंदे व तालुका संघटक बाळासाहेब जाधव यांच्या मार्गदर्शनाखाली काम करत असताना मला त्यांनी खंडाळा तालुका उपाध्यक्ष पदाची जबाबदारी सोपवली आहे.जबाबदारीला पात्र म्हणून मला खेड बुद्रुक जिल्हा परिषद गट व भादे जिल्हा परिषद गटात शिवसेना संघटण वाढवणे विकास कामांची यादी करणे विकास कामे वरिष्ठाकडून मंजूर करून घेणे तसेच शाखा ओपनिंग करणे विकास कामाचे भूमिपूजन करून कामे पूर्त्वास नेणे ही जबाबदारी मी पूर्ण ताकदीने पार पाडत आहे.सातारा जिल्हा प्रमुख आदरणीय पुरुषोत्तम जाधव यांच्या शिवसेना सातारा जिल्हा प्रमुख शिफारशीने खंडाळा तालुक्यात पहिल्या टप्प्यात व दुसऱ्या टप्प्यात दोन कोटींचा निधी मिळाला असून तालुक्यात विकास कामांचा झंजावात चालू आहे. हे नुकतेच उदाहरण भादे पंचायत समितीच्या भूमिपूजन कार्यक्रमातून दिसून आले आहे.

लवकरात लवकर खेड बुद्रुक गावातील विकास कामांचा अजून जास्तीत जास्त निधी आणून कामे घेणार आहे.तसेच खेड बुद्रुक जिल्हा परिषद गट व भादे जिल्हा परिषद गटातील गावांना लवकरच नवीन निधी विकास कामांना मिळणार आहे.


# महाराष्ट्राचे सांस्कृतिक संचित आणि वर्तमान



प्रा. डॉ. पुरुषोत्तम जुन्ने
संपर्क क्र. ७५८८४२४२५४

आधुनिक केसरी

**महाराष्ट्र राज्य इतरांपेक्षा कोणत्या बाबतीत भिन्न आहे याचे एका वाक्यात उत्तर द्यायचे तर आपणास देता येईल. पण या एका वाक्यात दडलेला गर्भितार्थ शोधण्यात अख्खे आयुष्य निघून जाईल. या सांस्कृतिक संचितात कोणी कोणी भर घातली आणि आपले आजचे वास्तव काय आहे याचा एक संक्षिप्त आढावा घेतला तरी या भूमीचा अभिमान वाटावा अशी भावना झाल्याशिवाय राहणार नाही. अनेक धर्म, पंथ, विचारधारा, दैवते, उपासना पध्दती, जगण्याची रीत या सर्वांना सामावून घेत ही लोकधारा प्रवाहित होत आली आहे. या लोकप्रवाहास अनेक अडथळे, अडचणींना सामोरे जावे लागले, पण त्या त्या काळातील महनीय समाजसुधारकांनी त्यातील अडथळे दूर सारण्याचा यथामती आणि यथाशक्ती प्रामाणिक प्रयत्न केला.**



## क्षितिजापल्याड

मुकूंदराजांच्या विवेकसिंधू पासून भालचंद्र नेमाडे यांच्या हिंदू पर्यंत साहित्याची एक दीर्घ परंपरा आपणास लाभली आहे. वस्तुतः याची सुरुवात गाथाशप्तशतीपासून दाखविता येईल. संत नामदेवांनी तर केवळ महाराष्ट्रच नव्हे तर उत्तर भारत पादाक्रांत करून साहित्याची अमीट छाप हिंदी पट्ट्यातही निर्माण केली. अत्यंत प्रासादिक आणि माधुर्यरसयुक्त शब्दकळा हे नामदेवांच्या लेखनाचे वैशिष्ट्य होते. ज्यांचा उल्लेख संत बहिणाबाईंनी पाया रचला असा केला ते संत ज्ञानेश्वर यांनी मराठी केवळ लोकभाषाच नव्हे तर ही ज्ञानभाषा देखील असल्याचे आपल्या साहित्यातून सिध्द केले. ज्या काळात महिलांवर अत्यंतिक निर्बंध होते. जगात कोठेही स्त्रीला लेखनाची वा व्यक्त होण्याची मनाई होती, त्या काळात संत मुक्ताबाई यांनी आपल्या अभंगातून समाजशिक्षण देण्याचा प्रयत्न केला. महाराष्ट्राच्या बाबतीत मुक्ताबाईंचे आपल्याकडे असणे ही खरेच गौरवाची गोष्ट आहे. समाजातील अत्यंतिक जातीभेदाच्या काळात आपल्याकडील संतमेळा आणि त्यातील सर्व संत अठरापगड जातीतून आल्याचे दिसते. चोखामेळा, कान्होपात्रा, नरहरी सोनार, सावता माळी, सेनान्हावी असे कितीतरी संत महाराष्ट्रातील सांस्कृतिक संचित घडवत होते. संत एकनाथ, संत तुकाराम, रामदास स्वामी, जगन्मित्र नागा, निळोबा, तुकडोजी महाराज, संत गाडगेबाबा अशी कितीतरी नावे आपणास यामध्ये घेता येतील. समाजाचे हृदयपरिवर्तन हे केवळ आर्थिक आणि सामाजिक सक्तीतून होत नसते तर त्याला सांस्कृतिक बदलाची आणि तशा प्रयत्नांची जोड दिली तर निश्चितच फायदा होतो आणि सामाजिक सहिष्णुता वाढण्यास मदत होते याचे मूर्तिमंत उदाहरण म्हणजे महाराष्ट्राची लोकधारा होय. महाराष्ट्र हा पूर्वीपासून सहिष्णू असल्यामुळेच महानुभाव संप्रदायाचे प्रवर्तक चक्रधर स्वामी यांनी आपल्या शिष्यांना महाराष्ट्री असावे असा उपदेश करतात. कर्नाटकात सुरू झालेल्या लिंगायत विचारांची वाढ आणि विकास महाराष्ट्रात होते. वारकरी संप्रदायाच्या शिक्षणातूनच इथल्या दर्ग्याच्या पूजनाचा मान एखाद्या हिंदुकडे असतो तर शेख महंमद यांच्यासारखे असंख्य मुस्लिम संत विठ्ठलाच्या चरणी लीन होतात. हे सामाजिक अभिसरण आपल्या सांस्कृतिक संचितात वाढच करत असते. परराज्यातील केवळ चक्रधर स्वामी, महात्मा बसवेश्वर यांचीच विचारधारा येथे फोफावली असे नव्हे तर अलीकडच्या काळात महात्मा गांधीजी गुजरात सोडून महाराष्ट्रात स्थायिक झाले आणि इथूनच संपूर्ण भारतवर्षात इंग्रजविरोधी वातावरण निर्माण करण्यात यशस्वी झाले हे ढळढळीत सत्य आहे. आर्थिक विकासासाठी सामाजिक स्थैर्य अत्यंत आवश्यक असते. ही सामाजिक स्थिरता महाराष्ट्रात होती म्हणूनच इथे टाटा, बिर्ला, अंबानी इत्यादी उद्योजक यांनी मोठमोठे उद्योग निर्माण करते झाले. महाराष्ट्राच्या क्रांतिकार्य चळवळीस देखील फार मोठी परंपरा लाभली आहे. सातवाहन, वाकाटक, चालुक्य, यादव अशी राजकीय परंपरा आणि पुढे छत्रपती शिवाजी महाराजांनी स्थापन केलेले हिंदवी स्वराज्य इथल्या पराक्रमी, लढवय्या समाजाची ओळख करून देण्यास पुरेशी आहे. आधुनिक काळात महात्मा ज्योतिबा फुले, छत्रपती शाहू महाराज, डॉ. बाबासाहेब आंबेडकर, जगन्नाथ शंकर शेठ, धोंडो केशव कर्वे, र. धो. कर्वे, विनोबा, साने गुरुजी अशी कितीतरी महनीय व्यक्तींनी महाराष्ट्राचे संचित घडवले आहे. साहित्याच्या बाबतीत महाराष्ट्र पूर्वीपासूनच आघाडीवर राहिलेला आहे. विवेकसिंधू, लीळाचरित्र, ज्ञानेश्वरी, नामदेवांचे अभंग, तुकाराम गाथा यासोबतच शिवकाळापासून शाहिरीची परंपरा महाराष्ट्राला लाभलेली आहे. वरून तमाशा आतून कीर्तन अशा प्रकारची एक सांस्कृतिक बैठक या साहित्यामागे होती. एक जनमानस घडविण्याचे महत्त्वाचे काम या शाहिरी वाङ्मयाने केलेले होते. आधुनिक काळातील साहित्याने देखील स्वातंत्र्यपूर्वकाळात स्वातंत्र्याची अभिलाषा प्रदीप्त करण्याचे कार्य केलेले आहे. त्यामुळे स्वातंत्र्यप्राप्तीची एक प्रकारची पार्श्वभूमी तयार होण्यास मदत झाली. समाजातील जातीभेद, धर्मांधता आणि अंधश्रद्धा कमी होऊन समाज एकदिलाने आणि एकोप्याने नांदावा यासाठी समाजचिंतकांनी, समाजसुधारकांनी आपले आयुष्य पणाला लावून सामाजिक सौहार्दाचे वातावरण महाराष्ट्रात निर्माण केले. त्याचीच फलश्रुती म्हणून भारतातील इतर राज्यांपेक्षा महाराष्ट्राची भूमी ही सहिष्णू, परोपकारी आणि एकूण जनता गुण्यागोविंदाने नांदणारी ठरली. परंतु अलीकडच्या काळात मात्र काही प्रमाणात जातीय तणाव, जातीय द्वेष आणि धर्मांधता त्यासोबतच अंधश्रद्धा फोफावत असल्याचे दिसून येत आहे. महाराष्ट्राच्या एकूण सहिष्णू वातावरणाशी हे विसंगत असले तरी आजचे वास्तव हे असे आहे. हे बदलायचे असेल तर सर्वच समाज घटकातील सहिष्णू समाजचिंतकांनी यावर गांभीर्याने बोलले पाहिजे. कोणत्याही व्यक्तीचा, समाजाचा किंवा कोणाचाही द्वेष न करता एकूण राष्ट्र म्हणून जोपर्यंत आपण विचार करणार नाही तोपर्यंत आपले हे राज्य, हा देश पुढे जाणार नाही. आपल्याला सांस्कृतिक बाबतीत फार प्रगल्भ संचित लाभलेले असल्यामुळे त्याच पद्धतीने वर्तन करून हा सांस्कृतिक ठेवा पुढच्या पिढीसाठी हस्तांतरित करणे आणि त्याबरहुकूम आपले वर्तन असणे ही काळाची गरज आहे. अन्यथा हा पूर्वापार ठेवा पुढच्या पिढीस जर आपण देण्यात अयशस्वी झालो, तर मात्र येणारा काळ आपणास माफ करणार नाही. महाराष्ट्र हे देशाला दिशा देण्याचे नेहमीच कार्य करत आलेले आहे. भविष्यातही ते तसेच पुढे जावे असे वाटत असल्यास त्याची सुरुवात आपल्यापासून झाली पाहिजे असे मनोमन प्रत्येकाने ठरवणे अगत्याचे आहे. **(लेखक गोदावरी कला महाविद्यालय, अंबड जि. जालना येथे मराठीचे प्राध्यापक आहेत)**




# महात्मा गांधींच्या शैक्षणिक विचारांची आज गरज..!



प्रा.बरसमवाड विठ्ठल
गोकुळवाडी. ता. मुखेड

आधुनिक केसरी

**आपल्या देशाची खरोखर शैक्षणिक प्रगती करावयची असेल तर प्रगतीचा आत्मा शिक्षण पाहिजे, कारण त्या शिक्षण व्यवस्थेमधून जबाबदार नागरिकांची निर्मिती होते. विद्यार्थ्याला शारीरिक श्रम हे शिक्षण घेते वेळेसच दिले पाहिजेत. विणकाम, सुतकताई, मातीकाम, शेतीकाम, बागकाम, छोटे छोटे लघुउद्योग, व्यावसायिक शिक्षण हे मिळाले पाहिजेत, मातृभाषेतूनच शिक्षण दिले जावे, त्यामुळे त्याला त्याची नैतिकता कळते, आपल्या देशावर निष्ठा राहते, सर्व सामाजिक मूल्यांची जोपासना केली जाते. त्यावेळी राष्ट्रपिता महात्मा गांधीजींनी त्यांचे शिक्षणा बद्दलचे विचार स्पष्ट मांडले होते, त्या शिक्षण पद्धतीची आज खरोखर आपल्याला गरज आहे, त्यासाठी हा शब्द प्रपंच..... पूर्वीच्या काळी गुरुकुल शिक्षण पद्धती होती. प्रत्येक आश्रमामध्ये विद्यार्थी निवासी राहत होते, तिथे सर्व कष्टाची कामे करून शिक्षण घेणे. घरापासून दूर राहिल्यामुळे जबाबदारीची आठवण राहत असे. त्यामुळे विद्यार्थी बौद्धिक कष्टाबरोबर शारीरिक कष्ट करत होते,आणि निरोगी रहात होते.**



आजचे विद्यार्थी आरोग्याने सुदृढ नाहीत, व्यायामाचा अभाव आहे, त्यामुळे त्यांना चालताना दम लागतो डोंगर दर्या ते चढू शकत नाहीत काही विद्यार्थी घरातील वस्तू सुद्धा काढतानी घाबरतात कारण त्यांना श्रम करणे माहीत नाही, लहान मुलांबरोबर प्रौढांना ही शिक्षण द्यावे असे त्यांचे मत होते. त्यांनी भारतात व भारताबाहेर ही अनेक शैक्षणिक प्रयोग केले साबरमती, शांतीनिकेतन येथे त्यांनी शिक्षणाला श्रमाची जोड दिली.आणि कृतीयुक्त शिक्षण चालू केले.विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण सुधारणे साठी शिक्षण महत्त्वाचे आहे ;म्हणून त्यांच्यात आदर्श सृजनशीलता, सहनशीलता निर्माण केली पाहिजे, त्यामुळे त्यांच्यात संयम, सहकार्य, नेतृत्व,समानता ही महत्त्वाची कौशल्ये विकसित होतील ,शिक्षणातून व्यवहारी ज्ञान मिळाले पाहिजे, त्यामुळे ते स्वतःच्या पायावर उभा राहू शकेल, त्याचे आत्मभान जागृत करून दिले पाहिजे, शिक्षणातून त्यांचे विचार व आत्मविश्वास प्रगल्भ व्हावेत, त्यांच्या आवडीतूनच शिक्षण दिले गेले तर सुप्त गुणांचा विकास होईल, त्यातून त्यांचे चारित्र्य घडेल म्हणून त्यांनी बुनियादी, मूलोद्योगी शिक्षण पद्धती सुरू केली. स्त्रियांना शिक्षण द्यावं असा त्यांचा आग्रह होता, कारण त्या शिक्षणातून त्यांचा बौद्धिक, सामाजिक, मानसिक विकास साधला पाहिजे, असे पूर्ण ज्ञान मिळणारे शिक्षण व्यवस्था त्यांना मान्य होते ;म्हणूनच त्यांच्या शिक्षण व्यवस्थेची आज समाजाला गरज आहे, असे मला वाटते ,परंतु आजची आपली शिक्षण पद्धती वेगळी आहे. विद्यार्थी हा परीक्षार्थी झाला आहे; तो ज्ञानार्थी नाही त्याला व्यावसायिक पद्धतीचे काही शिक्षण पदवी नंतर मिळते, त्यामुळे त्यांचा सर्वांगीण विकास म्हणावा तेवढा होत नाही, त्याच्या आवडीनिवडीनुसार विषय घेता येत नाहीत,चाकोरीबद्ध पद्धतीने शिक्षण शिकावे लागते ,न आवडणारे विषय बळजबरीने घ्यावे लागतात, म्हणून विद्यार्थी अनुत्तीर्ण होतात.आम्ही शिक्षण शिकते वेळेस विज्ञान भाग, 1,2,इतिहास -भूगोल , गणित -भूमिती हे 150 गुणांचे विषय होते ते आता कमी कमी होत होत 40 गुणांवर आले आहेत.सांगण्याचा अर्थ असा की आपल्याला विज्ञान विषयाची प्रात्यक्षिक परीक्षा 30 गुणांची होती, बाकी कोणत्याही विषयाला तोंडी गुण नव्हते. आज प्रत्येक विषयाला तोंडी 20 गुण आहेत. त्यामुळे टक्केवारी वाढली परंतु बौद्धिक क्षमता वाढली नाही, आज विद्यार्थ्यांचा फक्त संख्यात्मक विकास झाला असून गुणात्मक विकास झाला नाही, यामुळे स्पर्धा परीक्षेमध्ये हे विद्यार्थी टिकू शकत नाहीत म्हणून आजची शिक्षण पद्धती म्हणावी तेवढी परिणाम कारक नाही. महात्मा ज्योतिबा फुलेंनी हंटर कमिशन समोर पालकांना विद्यार्थी शाळेत नाही पाठवला तर एक रुपया दंड लावला होता. त्यानंतर शिक्षण व्यवस्था बदलली, कोठारी व मुदलियार आयोग आले, आज अशी परिस्थिती निर्माण झाली की शिक्षण क्षेत्रात राजकीय हस्तक्षेप वाढले आहेत,कोणालाही त्याची भीती राहिले नाही, त्यामुळे थोडा शैक्षणिक दर्जा ढासळल्यासारखे परिस्थिती निर्माण झाली काय, पहिली ते आठवीपर्यंतच्या विद्यार्थ्यांना आकारिक आणि संकलित मूल्यमापन करून गुण देऊन श्रेणीमध्ये पास करण्यात येऊ लागले, त्यामुळे आपण अनुत्तीर्ण होणार नाही, याचं भय विद्यार्थ्यांना राहिले नाहीत, तसेच बेरोजगारी भरपूर वाढल्यामुळे शिकून काय नोकरी लागते काय ?असा एक न्यूनगंड विद्यार्थ्यांच्या मनात निर्माण झाला त्यामुळे आपली शिक्षण व्यवस्थेमध्ये सुधारणा करणे आज काळाची गरज आहे.

सर्व शैक्षणिक विद्यापीठाचे कुलगुरू, लेखक,साहित्यिक,कवी, शिक्षणप्रेमी यांनी एकत्रित येऊन शैक्षणिक विचारमंथन मांडून व्यावसायिक शिक्षण सुरू केले.तरच शिक्षणाचा दर्जा सुधारेल आणि जीवनाचा सर्वांगीण विकास देणा-या शिक्षणाचा उपयोग होईल, त्यासाठी काय काय कृती आराखडा तयार करता येईल; तो सर्वांनी केला पाहिजे? तरच आपला देश शिक्षण क्षेत्रात पुढे जाईल ,नाहीतर शिक्षण व्यवस्था ज्या देशाची ढासाळली तो संपूर्ण देश ढासळतो असे काही विचारवंताने म्हटले आहे. कर्मवीर भाऊराव पाटलांनी कमवा आणि शिका हा उपक्रम राबवून अनेक विद्यार्थ्यांना स्वावलंबी शिक्षण देऊन त्यांचे ब्रीद वाक्य खरे करून दाखवले, म्हणूनच राष्ट्रपिता महात्मा गांधीजींच्या शैक्षणिक विचारांची आज आपल्या देशाला खरोखरच आवश्यकता आहे, त्यांनी वापरलेली शिक्षण पद्धती चालू केली तरच बेरोजगारी कमी होईल, विद्यार्थी स्वतःच्या पायावर उभे राहून वेगवेगळे छोटे-मोठे व्यवसाय करू शकतील असे मला वाटते. त्यांच्या स्मृतिदिना निमित्त त्यांना विनम्र अभिवादन.

# तीन फेब्रुवारीपर्यंत मागण्या मान्य करा

## अन्यथा आमरण उपोषण, रास्ता रोको करण्याचा दिला इशारा

आधुनिक केसरी न्यूज

**शंकर सदार**

**डोणगाव :** गावात मोठ्या प्रमाणात अस्वच्छता निर्माण झालेली आहे यामुळे अनेकांना मोठ्या रोगराई तसेच स्त्यावर साचलेल्या कचऱ्याच्या ढीगाऱ्यामुळे अपघात होऊन कित्येक जणांचा किरकोळ जखमी तर झालेल्या आपघातामुळे जीवही गमवावा लागला असल्यामुळे डोणगाव येथील युवकांनी परिसरात होणाऱ्या कचऱ्याची विल्हेवाट लावण्यासाठी व गाव अतिक्रमण मुक्त करण्यासाठी जिल्हाधिकारी व जिल्हा परिषदेच्या मुख्य कार्यकारी अधिकाऱ्यांना दिनांक 25 जानेवारी रोजी मागण्यांचे निवेदन दिले, व वेळेत मागण्या मान्य न झाल्यास आमरण उपोषण, रास्ता रोको व गाव बंद आंदोलनाचाही इशारा दिला.

डोणगाव सर्वे नंबर 123 मधील पडीक ढोर दवाखान्याच्या जवळील कचरा व काही लोकांनी अतिक्रमण केलेले आहे येथील सर्व अतिक्रमण काढण्यात यावे व बाजूचा रस्ता मोकळा करण्यात यावा लोकशाहीर अण्णाभाऊ साठे सभागृह ते सोसायटी कॉम्प्लेक्स डोनगाव पर्यंतच्या जागेत वॉल कंपाऊंड करण्यात यावे. डोणगाव बस स्थानकावरील मोडकळीस आलेल्या स्वच्छतागृहा जागी नवीन स्वच्छतागृह बांधण्यात यावे. जुन्या बैल बाजार परिसरात असलेल्या मटन मार्केटला संरक्षण भिंत उभारण्यात यावी व तेथील स्वच्छता करण्यात यावी जेणेकरून पसरत असलेली दुर्गंधी टळेल. ग्रामपंचायत कार्यालय डोणगावचे अर्धवटपणे बांधलेल्या ग्रामपंचायत कॉम्प्लेक्स मधील राहिलेली कामे पूर्ण करण्यात यावी व तेथील काम पूर्णत्वास नेऊन कॉम्प्लेक्स धारकांना मूलभूत सुविधा उपलब्ध करून देण्यात याव्यात आठवडी बाजारातील भाजीपाला विक्रेत्यांना टिन शेड करून देण्यात यावे. सर्वे नंबर 123 मध्ये झालेले अतिक्रमण पूर्णपणे हटविण्यात यावे. इत्यादी विषयांना अनुसरून जिल्हाधिकारी बुलडाणा व जि. प.बुलडाणा मुख्य कार्यकारी अधिकारी यांना डोणगांव येथील युवकांच्या वतीने आमरण उपोषण, रास्ता रोको आंदोलन व गाव बंद आंदोलन करण्याचा इशारा देण्यात आला आहे. सदर विषय 3 फेब्रुवारी 2024 पर्यंत निकाली काढण्यात यावा अन्यथा दिनांक 5 फेब्रुवारी 2024 पासून डोणगांव येथे आमरण उपोषण, दिनांक 8 फेब्रुवारी रोजी रास्ता रोको आंदोलन तर दिनांक 9 फेब्रुवारी रोजी गाव बंद आंदोलन करण्याचा इशारा डोणगाव येथील युवकांच्या वतीने देण्यात आला.

# ग्रामसभेतच निघाली तलवार, कुऱ्हाड

आधुनिक केसरी न्यूज

**धुळे :** ग्रामसभेत विचारलेल्या प्रश्नांची समाधानकारक उत्तरे न दिल्याच्या कारणावरून धुळे जिल्ह्यातील शिरपूरमधील अजंदे खुर्द येथे तुंबळ हाणामारी झाली. तलवार, कुऱ्हाड आणि सळईचा वापर झाल्याने तीन जण जखमी झाले. याप्रकरणी परस्पर विरोधी २० जणांविरूद्ध शिरपूर शहर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल झाला आहे.

याप्रकरणी राजेंद्र पाटील यांनी दिलेल्या तक्रारीनुसार, अजंदे खुर्द येथील ग्रामसभेच्या बैठकीत विचारलेल्या प्रश्नांच्या उत्तरावर समाधान न झाल्याच्या कारणावरून गणेश माळी, ज्ञानेश्वर माळी, भूषण माळी, शशिकांत माळी, सुनील माळी, चेतन माळी, सुरेश माळी, प्रविण कोळी, किरण कोळी, संगीता माळी, प्रतिभा माळी आणि सकुबाई माळी यांनी उत्तम पाटील, जितेंद्र पाटील, योगेश्वर पाटील या तिघांवर हल्ला चढवला. जमावाने तलवार, कुऱ्हाड व सळईसह हल्ला चढवल्याने तिघेजण जखमी झाले.

# श्री स. भु. वडोद बाजार येथे प्रजासत्ताक दिन साजरा

आधुनिक केसरी न्यूज

**वडोद बाजार :** येथील श्री स. भु. प्रशालेत प्रजासत्ताक दिन उत्साहात साजरा करण्यात आला.आर एस पी व स्काऊट गाईडच्या विद्यार्थ्यांनी उत्कृष्ट संचलन करून मान्यवरांना मानवंदना दिली . संस्था सभासद श्री डॉ मंगेशजी पानट ( श्री स. भु. शिक्षण संस्था छत्रपती संभाजी नगर) याच्या हस्ते राष्ट्रपिता महात्मा गांधी यांच्या प्रतिमेचे पूजन करून ध्वजारोहण करण्यात आले. यावेळी व्यासपीठावर शालेय समितीचे अध्यक्ष तथा उपसरपंच ग्रुप ग्रामपंचायत वडोद बाजार येथील श्री डॉ गोपाळराव पा. वाघ,शाखा अध्यक्ष श्री गणेश पांडेजी, शालेय समिती सदस्य श्री अतुलजी भाले, श्री सिताराम पा. वाघ, श्री पुंडलिकजी राऊत, श्री सुभाष शेठ जैन, श्री पांडुरंग जाधव, श्री रामदास पा. कापसे, श्री डॉ. सुहास वायकोस, श्रीमती पाकीजा साबेर पठाण( सरपंच वडोद बाजार), श्री अरुण भाऊ वायकोस ,ग्रामपंचायत सदस्य, गावातील जेष्ठ नागरिक, मुख्याध्यापक श्री गणेशसिंग गौर सर व पर्यवेक्षक श्री एस जी गायकवाड, क्रीडा शिक्षक श्री सी एस पाटीलआदींची उपस्थिती होती. प्रशालेतर्फे प्रमुख मान्यवरांचे पुष्पगुच्छ देऊन स्वागत करण्यात आले. प्रमुख मान्यवरांच्या हस्ते पाणी फिल्टर चे देखील उद्घाटन करण्यात आले. यावेळी गावात प्रभात फेरी काढून सर्व मान्यवरांनी व विद्यार्थ्यांनी, शिक्षकांनी हातात झाडू घेऊन गावातील वाडी ,वस्ती, मंदिर, विविध धार्मिक स्थळांची, पिण्याच्या पाण्याची टाकी , पानवठे यांची अंतर्गत व बाह्य स्वच्छता करून श्रमदान केले.विद्यार्थ्यांनी देशभक्तीपर घोषणा देऊन सर्व परिसर देशभक्तीच्या वातावरणात दणाणून गेला होता.



# बाजार सावंगी येथे ठिकठिकाणी ध्वजारोहण उत्साहात

आधुनिक केसरी न्यूज

**बाजार सावंगी :** येथे ठिकठिकाणी ध्वजारोहण होऊन प्रजासत्ताक दिन उत्साहात साजरा करण्यात आला येथील ग्रुप ग्रामपंचायत येथे सरपंच आप्पाराव नलावडे यांनी ध्वजारोहण केले येथील पोलीस चौकी ,विविध सेवा सहकारी सोसायटी ,जिल्हा परिषद प्रशाला ,सह्याद्री इंग्लिश स्कूल, गीता बाल विद्या मंदिर,साई पब्लिक स्कूल ,ज्ञान कुंज महाविद्यालय ,रायझिंग स्टार इंग्लिश स्कूल मध्ये व विविध ठिकाणी उत्साहात ध्वजारोहण होऊन प्रजासत्ताक दिन साजरा करण्यात आला यावेळी शालेय विद्यार्थ्यांनी विविध वेशभूषा करून सांस्कृतिक कार्यक्रम सादर केले.

# वडोद बाजार ग्रामपंचायत मध्ये प्रजासत्ताक दिन उत्साहात साजरा



आधुनिक केसरी न्यूज

**वडोद बाजार :** वडोद बाजार ग्रामपंचायत मध्ये प्रजासत्ताक दिन साजरा करण्यात आला ग्रामपंचायत कार्यालयात सरपंच पाकीजा पठाण यांच्या हस्ते ध्वजारोहण करण्यात आले पाकीजा साबेर पठाण ,उपसरपंच गोपाळ वाघ, सोसायटी चेअरमन कडूबा म्हस्के प्राथमिक आरोग्य केंद्राच्या डॉ काथार मॅडम,ग्रामपंचायत सदस्य शिवराम म्हस्के, डॉ सुहास वायकोस, राजीक शेख , शुभम गंगावणे, गोविंद पाडेजी,शेख सलमान अरुण वयकोस, अशोक शिनगारे, पांडुरंग बामणे, शेख जावेद, तजमात श हा, जनार्दन शिनगारे, रेशमजी शिनगारे , कोतवाल शेख सलीम ग्रामविकास अधिकारी रामदास पाथरे, संतोष दाधरे सुनिता मगरे, गंगावणे, काथार, आशा सेविका अंगणवाडी सेविका, ग्रामपंचायत कर्मचारी आदी स ह गावकरी यावेळी उपस्थित होते.

विविध कार्यकारी सोसायटी कार्यालयात चेअरमन कडु व मस्के यांच्या हस्ते ध्वजारोहण करण्यात आले यावेळी सचिव गरसोळे,

प्राथमिक जिल्हा परिषद केंद्रीय प्राथमिक शाळेत शालेय अध्यक्ष नईम सिद्दिकी यांच्या हस्ते गजानन करण्यात आली यावेळी मुख्याध्यापक गाडेकर ,बावस्कर, आधी सहशिक्षक ग्रामस्थ यावेळी उपस्थित होते वडोद बाजार येथील जिनिंग प्रेसिंग कार्यालयात संचालक राजू मस्के यांच्या हस्ते ध्वजारोहण करण्यात आले यावेळी सचिव करपे होते तर वडद वस्ती जिल्हा परिषद शाळेत जावेद शेख यांच्या हस्ते ध्वजारोहण करण्यात आले मुख्याध्यापक चिकटे हजर होते.

# शैक्षणिक सुविधांसाठी व्हॉईस ऑफ मीडियाचा विविध योजनांच्या माध्यमातून पुढाकार

## राज्य सरचिटणीस तथा शैक्षणिक मदत कक्षाचे प्रमुख चेतन कात्रे यांची माहिती

आधुनिक केसरी न्यूज

**विनोद पाटील बोडखे**

**रिसोड :** अल्पावधीतच पत्रकारांचा बुलंद आवाज झालेल्या व्हॉईस ऑफ मीडियाच्या प्रमुख पंचसूत्री पैक शिक्षण या मदत कक्षामार्फत आता शैक्षणिक मदत कक्षाच्या वतीने व्हॉईस ऑफ मीडियाच्या सदस्य पत्रकारांच्या पाल्यांना शैक्षणिक सुविधा पुरवण्यासाठी व्हॉईस ऑफ मीडियाच्या एज्युकेशन विभागाने पुढाकार घेतला आहे. आगामी काळात शहरी व ग्रामीण पत्रकारांच्या पाल्यांना विविध प्रकारच्या शैक्षणिक सुविधा उपलब्ध करून दिल्या जाणार आहेत. अशी माहिती व्हॉईस ऑफ मीडियाचे राज्य सरचिटणीस तथा शैक्षणिक मदत कक्ष प्रमुख चेतन कात्रे यांनी दिली.

एज्युकेशन प्रमुख चेतन कात्रे 25 जानेवारी रोजी वाशीम जिल्हा दौऱ्यावर शैक्षणिक आढावा घेण्यासंदर्भात आले असता वाशीम विश्रामगृह येथे स्थानिक पत्रकारांची चर्चा केली. यावेळी त्यांनी व्हॉईस ऑफ मीडियाच्या इतर विभागा प्रमाणे आता एज्युकेशन विभागाच्या वतीने सुद्धा पत्रकारांच्या पाल्यांसाठी विविध शैक्षणिक सुविधा उपलब्ध करून देण्यासाठी पुढाकार घेण्यात येणार असल्याची माहिती दिली. त्याचबरोबर विविध विंगच्या कार्याबाबत स्थानिक पत्रकार व व्हॉईस ऑफ मीडियाच्या पदाधिकाऱ्यांसोबत चर्चा करून माहिती घेतली. जिल्ह्यातील शहरी व ग्रामीण भागातील पत्रकारांच्या पाल्यांसाठी काय सुविधा आहेत, कोणती सुविधा उपलब्ध करायची आहे. याचबरोबर स्थानिक पातळीवर कोणत्या समस्या आहेत. याची माहिती घेऊन यावर पर्याय काढण्याबाबत स्थानिक पत्रकारांसोबत चर्चा केली. यावेळी व्हॉईस ऑफ मीडियाचे जिल्हाध्यक्ष भागवत मापारी, विदर्भ कार्याध्यक्ष विठ्ठल देशमुख, साप्ताहिक विंगचे



प्रदेश कार्याध्यक्ष गजानन धामणे, इलेक्ट्रॉनिक विंगचे जिल्हाध्यक्ष किशोर गोमाशे, कार्याध्यक्ष सुनील पाटील, व्हॉईस ऑफ मीडिया जिल्हा प्रवक्ते देव इंगोले, सरचिटणीस धनंजय कपाले, रमेश उंडाळ, उपाध्यक्ष आकाश शिंदे,इलेक्ट्रॉनिक विंगचे जिल्हा सरचिटणीस गणेश मोहळे, कार्याध्यक्ष राम धनगर,जिल्हा संघटक पंकज गाडेकर, उपाध्यक्ष गोपाल व्यास, साजन धाबे, जिल्हा कोषाध्यक्ष दिपक मापारी, विक्रम मोरे,वैभव पायघण, प्रदिप पट्टेबहादूर यांच्यासह इतर स्थानिक पत्रकारांची उपस्थिती होती. अल्पोहारानंतर आढावा बैठकीची सांगता करण्यात आली. या बैठकीचे प्रास्ताविक व्हॉईस ऑफ मीडियाचे जिल्हाध्यक्ष भागवत मापारी यांनी केले तर संचालन जिल्हा प्रवक्ते देव इंगोले यांनी केले व आभार जिल्हा सचिव रमेश उंडाळ यांनी मांनले.

# सर्वांगीण विकासातून मूल तालुका अव्वल करणार

## पालकमंत्री सुधीर मुनगंटीवार : नगर परिषद क्षेत्रातील विविध विकासकामांचे लोकार्पण

आधुनिक केसरी न्यूज

**चंद्रपूर :** मुल तालुक्यात विविध लोकोपयोगी विकासकामे हाती घेण्यात आली आहे. मुख्य रस्ता, पाणीपुरवठा योजना, स्टेडियम, डॉ. श्यामाप्रसाद मुखर्जी वाचनालय, तसेच शंभर खाटांचे उपजिल्हा रुग्णालय, कृषी महाविद्यालय, महिलांच्या पंखांना बळ देणारे सर्वोत्कृष्ट शुरवी महाविद्यालय यासारखे मोठे प्रकल्प उभे राहत आहे. मुल तालुक्याचा चेहरा- मोहरा बदलविण्यासाठी सर्वांच्या सहकार्याची आवश्यकता असून सर्वांगिण विकासातूनच हा तालुका महाराष्ट्रात अव्वल करण्याच्या दृष्टीने कार्य करण्यात येत असल्याचे राज्याचे वने, सांस्कृतिक कार्य व मत्स्य व्यवसाय मंत्री तथा जिल्ह्याचे पालकमंत्री सुधीर मुनगंटीवार म्हणाले.

मुल नगरपरिषद क्षेत्रातील विविध विकासकामांच्या लोकार्पण कार्यक्रमाप्रसंगी ते बोलत होते. यावेळी मूलचे उपविभागीय अधिकारी विशालकुमार मेश्राम, तहसीलदार रवींद्र होळी, नगर परिषदेचे मुख्याधिकारी यशवंत पवार, सार्वजनिक बांधकाम विभागाचे उपअभियंता प्रशांत वसुले, हरीश शर्मा, देवराव भोंगळे, संध्या गुरनुले, प्रभाकर भोयर, रत्नमाला भोयर, चंदू मारगोनवार, नंदू रणदिवे आदी उपस्थित होते. देशाला स्वातंत्र्य मिळवून देण्यासाठी हजारो शहिदांनी प्राणाची आहुती दिली, असे सांगून पालकमंत्री श्री. मुनगंटीवार म्हणाले, देशाला संविधान अर्पण होऊन 74 वर्षे पूर्ण झालीत. महामानव डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी दायित्व, कर्तव्य व जबाबदाऱ्या संविधानामध्ये लिखित स्वरूपात दिल्या. त्याची अंमलबजावणी करण्याची जबाबदारी सर्वांची आहे. छत्रपती शिवाजी महाराजांच्या राज्याभिषेकाचे हे 350 वे वर्ष असून मुलचा गौरव वाढवीत छत्रपती शिवाजी महाराज व्यापार संकुलाची निर्मिती करण्यात आली. महर्षी वाल्मिकीच्या नावाने मुख्य रस्त्यावर प्रवेशद्वार उभारण्यात आले. प्रवेशद्वाराची निर्मिती व्हावी, यासाठी भोई समाजाच्या नागरिकांची मागणी होती. सदर प्रवेशद्वारासाठी 50 लक्ष रुपये मंजूर केले. मात्र, जागेअभावी 25 लक्ष रुपये खर्च करून गेटची निर्मिती झाली. या प्रवेशद्वारातून जातांना महर्षी वाल्मिकीचे स्मरण निश्चितच होईल, असा विश्वास त्यांनी व्यक्त केला. तसेच शिल्लक 25 लक्ष रुपयात श्रद्धेय अटल बिहारी वाजपेयी यांच्या नावाने दुसरे अटल गेट उभारण्यात येणार असल्याचेही त्यांनी सांगितले.

22 जानेवारी रोजी अयोध्या येथे प्रभू श्रीरामाची प्राणप्रतिष्ठा झाली. मंदिर ट्रस्टचे सचिव श्री.चंपतराय यांनी संकलित केलेल्या पवित्र वस्तूबाबत माहिती देतांना चंद्रपूर जिल्ह्यातून पाठविण्यात आलेल्या लाकडाचा उल्लेख केला. 'सियावर रामचंद्र की जय' या अकरा अक्षरी मंत्राचा देशात पहिला विश्वविक्रम झाला. गिनेस बुक ऑफ वर्ल्ड रेकॉर्डमध्ये याची नोंद करण्यात आली. प्रभू श्रीरामचंद्रांच्या नावात चंद्र आहे, त्या चंद्रपूर जिल्ह्यानेच हा विश्वविक्रम केला. रामायणात रावणाने सीता मातेचे हरण केले तेव्हा एक जटायु होता. प्रभू रामाच्या प्राणप्रतिष्ठेच्या औचित्याने ताडोबात 10 जटायू सोडण्यात आले. त्याठिकाणी त्यांचे संवर्धन व त्यांच्या अधिवासामुळे पर्यावरणाचे संरक्षण होईल, असेही ते म्हणाले. चंद्रपुरातील मोरवा येथे फ्लाईंग क्लब सुरू करण्यात येत असून एअरपोर्ट विकसित करण्यात येत आहे. गरीब कुटुंबातील मुलगीही वैमानिक व्हावी आणि ती चंद्रपूर जिल्ह्यातील असावी, असा निश्चय केला आहे.चंद्रपूर विकासाच्या बाबतीत इतर जिल्ह्याच्या तुलनेत पुढे आहे. मात्र, मागील दोन वर्षात जिल्हा विकासाच्या बाबतीत मागे राहिला. त्यामुळे जे मागे राहिले ते पूर्ण करण्यासाठी प्रयत्नशील असल्याचेही ते म्हणाले. मुल येथे 28 तलाठी कार्यालय होत आहे. 600 कोटी रुपयांच्या एस.एन.डी.टी विद्यापीठाला मान्यता आणली व 62 कौशल्याधारीत प्रशिक्षण महिलांना देण्यात येणार आहे. उपविभागीय अधिकारी, तहसीलदार, नायब तहसीलदार व कर्मचाऱ्यांच्या निवासस्थानासाठी निधी मंजूर केला आहे. मुल पोलीस स्टेशनचे डिझाईन तयार करण्यात येत असून पोलिसांचे निवासस्थान देखील उत्तम करण्यात येईल. तसेच मुल तालुक्यातील नागरिकांचे पट्टे व घरकुलांचा प्रश्न देखील निकाली काढण्यात येईल. मुल तालुका महाराष्ट्रात सर्वोत्कृष्ट असला पाहिजे, हा संकल्प पूर्ण करण्याच्या दृष्टीने कार्य करण्यात येत असल्याचेही ते यावेळी म्हणाले.मुल नगरपरिषद क्षेत्रातील विविध विकासकामांचे लोकार्पण : 9 कोटी रुपये निधीतून 61 गाळ्याचे छत्रपती शिवाजी महाराज व्यापार संकुल उभारण्यात आले. यामध्ये तळ मजल्यावार 23 गाळे, पहिला व दुसरा मजला प्रत्येकी 19 गाळे, तसेच प्रसाधनगृह, जिना, लिफ्ट, स्ट्रक्चरल ग्लेझींग, अतंर्गत व बाह्य विद्युतीकरण व सोलर सिस्टीम आदी सुविधा करण्यात आल्या आहे.नगर परिषद मुल येथे वैशिष्ट्यपुर्ण निधीतून 25 लक्ष रु. खर्ची करुन मुख्य रस्त्यावरील वाल्मिकी नगरातील स्वागत गेटचे बाधंकाम करण्यात आले. तसेच नगर परिषदांना वैशिष्ट्यपुर्ण कामासाठी विशेष अनुदानातुन आठवडी बाजार व मटन मार्केटचे बांधकाम करण्यात आले. यामध्ये भाजी बाजारासाठी 45 आच्छादीत ओटे, मटन मार्केट साठी 8, चिकनसाठी 14 गाळे, फिश मार्केट स्लॉटरच्या इमारतीचे बांधकाम, पेव्हींग ब्लॉक, पाईप नाली, सुरक्षाभिंतीचे बांधकाम करण्यात आले.आदींचे लोकार्पण मुनगंटीवार यांच्या हस्ते करण्यात आले.



# लोणी बु.येथे शालवृक्ष धम्म महिला संघाची स्थापना; समाजाला धम्माचे ज्ञानदान करणार

आधुनिक केसरी न्यूज

**रिसोड :** तालुक्यातील लोणी बू येथे दिनाक 26 जानेवारी रोजी अर्थातच प्रजासत्ताक दिनी सकाळी 9 वाजता डॉ बाबासाहेब आंबेडकर यांच्या पुतळ्याजवळ समाज मंदिरामध्ये शालवृक्ष धम्म महिला संघाची स्थापना प्रल्हाद इंगोले,विठ्ठल मोरे,उध्दव इंगोले यांच्या प्रमुख उपस्थितीत करण्यात आली. बौद्ध धर्माची स्थापना ई स पूर्व 6 व्या शतकामध्ये तथागत भगवान गौतम बुद्धांनी केली.हा भारताच्या श्रमन परंपरेतून निर्माण झालेला एक धम्म आहे.अर्थातच जीवन जगण्याची विचारधारा आणि तत्वज्ञान आहे. या बुद्ध धर्मामध्ये चार आर्यसत्य सांगितले आहेत ते म्हणजेच दुःख आहे, दुःखांची उत्पत्ती आहे.

दुःखातून मुक्ती आहे, आणि मुक्तीमार्ग अष्टांगिक मार्ग सांगितले असून, बुद्ध तत्वज्ञानानुसार आचरण ठेवल्यास निश्चितच मानव जीवनाचे सार्थक होते. आणि याच. बुद्धांच्या धम्माचा प्रचार, प्रसार करण्यासाठी लोणी बू येथे शाल वृक्ष धम्म महिला संघाची स्थापना करण्यात आली आहे. या संघाच्या अध्यक्षस्थानी जिजाबाई इंगोले, उपाध्यक्ष शशिकला पराडे, सचिव जयश्री इंगोले, गंगा तुरेराव सह सचिव, तर सीमा इंगोले, मंदा मोरे, सुमन मोरे,लीलाबाई इंगोले, सुमन तूरेराव, अनुसया इंगोले, राधा तुरेराव,उषा सुर्वे,द्वारका कांबळे, भागुबई नरवाडे, रुख्मिणी नरवाडे आदी महिला सदस्य आहेत व त्या समाजाला धम्माचे तत्त्वज्ञानाची शिकवण देण्याचा प्रयत्न करणार असल्याचे सांगितले आहे.

# सर्वसामान्यांना विचारा शिवसेना कोणाची आहे : संजय राऊत

आधुनिक केसरी न्यूज

**अहमदनगर :** लोकसभा निवडणुकांचे वारे सध्या राजकीय मैदानात वाहू लागले आहेत. ठाकरे गटाने येणाऱ्या लोकसभा निवडणुकांच्या दृष्टीने मोर्चेबांधणी सुरू केली असून राज्यात सगळीकडे कार्यकर्ते मेळावे आणि जाहीर सभांचे कार्यक्रम पार पडत आहेत. अहमदनगर जिल्ह्याच्या दौऱ्यावर शिवसेना ठाकरे गटाचे नेते खासदार संजय राऊत आहेत. नगरमध्ये राऊत यांच्या उपस्थितीत पदाधिकारी व कार्यकर्ता मेळाव्याचा कार्यक्रम पार पडला. या मेळाव्यात व्यासपीठावरून बोलत असताना त्यांनी भाजपसह शिंदे गटावर जोरदार टीकास्त्र सोडले. अहमदनगरमध्ये माजी आमदार अनिल राठोड असताना त्यांनी शिवसेना



जिवंत ठेवली होती मात्र आता शहरात गुंडगिरी वाढली, अहमदनगरमध्ये भगवे वातावरण झाले आहे. अनिल राठोड नाहीत म्हणून कोणी संघर्ष करत नाही मग तुम्ही का रस्त्यावर उतरत नाही त्यामुळे आता आम्ही ठरवले आहे. आता मी रस्त्यावर उतरेल आमदाराविरुद्ध महाविकास आघाडीचा मोर्चा निघेल त्याचे नेतृत्व मी करेल," असे आश्वासन संजय राऊत यांनी दिले.

सर्वसामान्य जनतेसाठी बाळासाहेब ठाकरेंनी या शिवसेनेची स्थापना केली होती. निवडणूक आयोग किंवा राहुल नार्वेकर यांना विचारून स्थापन केली नव्हती. देशातल्या सर्वसामान्य जनतेला जाऊन विचारा की, शिवसेना कोणाची आहे? ते सांगतील शिवसेना उद्धव ठाकरेंची, बाळासाहेबांची, शिवसेना शिवसैनिकांची आहे, असं यावेळी बोलताना राऊत म्हणाले.संजय राऊत यावेळी पंतप्रधान मोदीवरही निशाणा साधत बोलताना म्हणाले की, "रामाबरोबर हाताला काम सुद्धा द्या. महागाईवर पंतप्रधान बोलत नाहीत त्यांना रडू कोसळते रामाची मूर्ती पाहून. मात्र पुलवामा मध्ये 40 जवान शहीद झाले तेव्हा रडले नाहीत, शेतकरी आत्महत्या करतो तेव्हा रडत नाही, काश्मीरमध्ये हजारो पंडितांचे वध होतात तेव्हा रडत नाही मात्र आता नाटक करता?" अशी टीका संजय राऊत यांनी केली.

# मराठा कुणबी विद्यार्थ्यांना मोफत संगणकीय डिप्लोमा कोर्स

आधुनिक केसरी न्यूज

**अहमदनगर :** महाराष्ट्र शासन उपक्रम अंतर्गत सारथी व महाराष्ट्र ज्ञान महामंडळ ( MKCL,PUNE) यांच्या संयुक्त विद्यमानाने मराठा व मराठा कुणबी समाजातील विद्यार्थ्यांना ६ महिने कालावधीचा निशुल्क संगणकीय डिप्लोमा कोर्स उपलब्ध केलेला आहे.

सन २०२३ पासून वरील उपक्रम अंतर्गत महाराष्ट्रातून जवळपास 40 हजार विद्यार्थ्यांनी याचा लाभ घेतलेला आहे. २०२४ यावर्षीही समाजातील विद्यार्थ्यांनी कॉम्प्युटर डिप्लोमा कोर्स करण्यासाठी लाभ घ्यावा असे आवाहन बाबासाहेब वायकर यांनी केले आहे.

ज्या विद्यार्थ्यांचे वय १८ ते ४५ वर्षाच्या दरम्यान आहे व उमेदवार दहावी उत्तीर्ण आहे व पालकांचे उत्पन्न ८ लांखपेक्षा कमी आहे, असे विद्यार्थी वरील संधीचा नोकरी मिळविण्याकरता फायदा घेऊ शकतात. संबंधित कोर्स पूर्ण केल्यानंतर विद्यार्थ्यांना प्लेसमेंट देण्याची हमीपूर्ती सारथी व एमकेसीएल मार्फत देण्यात येत आहे. CSMS-DEEP कॉम्प्युटर कोर्सची जनजागृती होण्याकरता केडगाव येथील उदयनराजे'स गिगाबाईट



गिगाबाईट कॉम्प्युटर टायपिंग या संस्थेमार्फत प्रजासत्ताक दिन व ग्रामसभेचे औचित्य साधून परिसरातील सोनेवाडी, अकोळनेर, चास,निमगाव वाघा आदी गावात व शाळेत जाऊन समाज प्रबोधन केले.

२०२३ मध्ये कोर्स पूर्ण केलेल्या माजी विद्यार्थी कुणाल रमेश कराळे (सोनेवाडी अकोळनेर), श्रीमती रूपाली संजय कार्ले यांनी चास येथे, सौ शैला सोमनाथ वाबळे यांनी निमगाव वाघा येथे , बाबासाहेब वायकर सर व रवी राऊत सर विझार्ड कॉम्प्युटर यांनी अकोळनेर येथे त्यांचे कोर्स विषयी अनुभव कथन केले व व सारथी मंडळाच्या समाजाकरता ज्या विविध योजना आहेत त्याविषयी माहिती विषद केली, वरील उपक्रम पूर्ण करण्याकरिता गिगाबाईट कॉम्प्युटरचे संचालक बाबासाहेब वायकर, महाराष्ट्र ज्ञान महामंडळ अहमदनगर जिल्हा समन्वयक गणेश आठरे , भाऊसाहेब आठरे ,शशिकांत गलबले ,संगीत सर यांनी विशेष परिश्रम घेतले.

# अभिनेत्री शिल्पा शेट्टीचे शनिदर्शन

आधुनिक केसरी न्यूज

**सोनई :** बॉलीवुड क्षेत्रतील प्रसिद्ध अभिनेत्री शिल्पा शेटी यांनी काल सकाळी 11 वाजता शनिशिंगानापुरात दाखल होऊन चौथारा वर जाऊन मनोभावे शनिदर्शन घेतले.

शेट्टी यांनी शनिदेव की जय घोषणा देत हे शनिचौथारावर जाऊन तेल, पुष्प, पूजा, शनिस्पर्शने मनोभावे दर्शन घेतले.

देवस्थानचे वतीने विश्वस्त अप्पासाहेब शेटे, दिपक दरांडले अड. पोलिस पाटील सयाराम बानकर , यांनी स्वागत केले. यावेळी तीला पहनयासाठी चाहत्यानी मोठी गर्दी केली होती.

यावेळी शिल्पा शेट्टी यांनी पासनसणाला तीर्थ प्रकल्प पाहून व विकासबाबाद समाधान वेक्त करुन यांनी दर्शन घेतल्यानंतर आत्मिक समाधान, व आनंद वाटल्याचे सांगितले.



# मृत महिलेची माहिती देणाऱ्यास ५० हजारांचे बक्षीस

## बुलढाणा पोलीस विभागाने जारी केले मृत महिलेचे स्केच

आधुनिक केसरी न्यूज

**सचिन खंडारे**

**बुलढाणा** :२३ जानेवारीला खंडेराव पाट्या जवळील चिखली ते देऊळगाव राजा रोडवर असलेल्या हॉटेल राजवाडा च्या पाठीमागे वन विभागाच्या हद्दीत १५० मीटर अंतरावर एका महिलेचे नग्न व अर्धवट जळालेल्या अवस्थेमध्ये प्रेत आढळून आले होते.



सदर महिलेचे वय अंदाजे पंचवीस ते २० वर्षाच्या आतील होते तसेच महिलेवर अत्याचार करून तिचा खून केल्याचे निष्कर्ष पोलिसांनी काढला होता .तसेच अज्ञात आरोपीने पुरावा नष्ट करण्याच्या उद्देशाने मृत महिलेचे प्रेत अर्धवट जाळले पोलिसांनी आरोपीचा तपास लागावा म्हणून कसून चौकशी सुरू केली परंतु सर्वात मोठा अडथळा असा की मृत महिलेची ओळख ६ दिवस उलटूनही पटली नसल्यामुळे तपासात फार मोठा अडथळा निर्माण झाला आहे,त्यामुळे जिल्हा पोलीस अधीक्षक सुनील कडासने यांच्या मार्गदर्शनाखाली बुलढाणा पोलिसांनी मृत महिलेचे स्केच जारी केले असून मृत मुलीची ओळख संबंधी माहिती देणाऱ्याला ५० हजार रुपयांचे रोख बक्षीस घोषित केले आहे. मृत अनोळखी महिलेचे वर्णन खालील प्रकारे,मृत महिलेचे वय अंदाजे वीस ते पंचवीस वर्षे आहे. मृत महिलेच्या उजव्या हाताच्या मनगटाच्या बाजूला लव्ह चे चिन्ह असून त्या मध्ये SK हे इंग्रजी अक्षरे गोंदलेली आहे .महिलांच्या दोन्ही कानात पिवळ्या धातूचे डिझाईन असलेले कर्णफुले व उजव्या हातात लाल पिवळ्या रंगाचा धागा,प्रेत अर्धवट जळलेले वर्णन अवस्थेत होते.

तरी नागरिकांनी मृत महिलेची गोपनीय माहिती बुलढाणा पोलिसांना द्यावी व रोख पन्नास हजार रुपयांचे बक्षीस घेऊन जावे असे आवाहन बुलढाणा पोलिसांनी प्रसिद्ध केलेल्या प्रसिद्धी पत्रकाद्वारे केली आहे. यामध्ये पोलीस स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक अशोक लांडे मो,9822057936,विकास पाटील ठाणेदार अंढेरा पो . मो .9404803336,निलेश सोळंके स्थानिक गुन्हे शाखा, मो .8888861418,स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस उपनिरीक्षक श्रीकांत जिंदमवार, मो .9420040077 व तसेच पोलीस नियंत्रण कक्ष बुलढाणा (07262 )242400या नंबर वर संपर्क साधण्याचे आवाहन सुद्धा करण्यात आले आहे.

# लोणार येथे हवेतच होत आहे मराठा सर्वेक्षण; नागरिकांच्या संभ्रमांमध्ये वाढ

आधुनिक केसरी न्यूज

**यासीन शेख**

**लोणार :** दि. २३ जानेवारी ते ३१ जानेवारी २०२४ दरम्यान घाई गडबडीत सुरू असलेल्या मराठा आरक्षणाच्या सर्वे मुळे नागरिक अगोदरच संभ्रमामध्ये असतानांच त्यामध्ये लोणार नगर परिषदेच्या सर्वे करणाऱ्या प्रगणकांमूळे अधिक भर पडल्याचे चित्र आहे.

मराठा आरक्षणाच्या सर्वे मध्ये गैरमराठा समाजाची माहिती का गोळा केली जात आहे? सर्वे मुळात मराठा आरक्षणाचा आहे, परंतु मराठा समाजाला फक्त मोजकेच ७-८ प्रश्न, मात्र गैरमराठा व खुला प्रवर्गातील समाजांना १८३ प्रश्न का विचारले जात आहे? मराठा आरक्षणाचे राजपत्र निघाल्यामुळे आता सर्वेक्षणची माहिती द्यायची की नाही? असे विविध भ्रमीत करणारे प्रश्न नागरिकांमध्ये असतांनाच आता सर्वे प्रगणकांमूळे नविन भ्रम निर्माण झाला आहे.

मराठा आरक्षणाच्या अनुषंगाने प्रगणकांद्वारे शहरातील सर्व प्रभागांमध्ये एका विशिष्ट मोबाईल ॲप्लिकेशन द्वारे सर्वे करण्याचे काम सुरू आहे. या ॲपमध्ये आरक्षित प्रवर्गातील कुटुंबाकरिता फक्त साधारणतः ७ ते ८ प्रश्न विचारले जातात व सर्वे पूर्ण होतो. मात्र खुला प्रवर्गातील कुटुंबासाठी प्राप्त माहितीनुसार १८३ प्रश्न विचारून स्वाक्षरी घ्यावी लागतो व त्याकरिता साधारणतः ३० ते ४० मिनिटे प्रती कुटुंब वेळ लागतो. मात्र 'गुलाबखॉ मोहल्ला' या प्रभागामध्ये सर्वे करणाऱ्या नगरपरिषदेच्या प्रगणकांनी खुल्या प्रवर्गातील मुस्लिम समाजाचे हवेमध्येच फक्त १-१ मिनिटांमध्ये कुटुंब प्रमुखाचे नाव विचारून जादुई सर्वे करून गेल्याची चर्चा रंगली आहे. अनेक नागरिकांनी याबाबत तक्रार केली आहे. सर्वेचे उर्वरित प्रश्न स्वतःच मनाने भरून जाली स्वाक्षरी करून सर्वे पूर्ण करतात की कसे? असा नवीन भ्रम निर्माण झाला आहे. त्यामुळे या प्रभागामध्ये सर्वे करणाऱ्यांची चौकशी करून उचित कार्यवाही करण्याची मागणी होत आहे. यावर मुख्याधिकारी व संबंधित वरिष्ठ अधिकारी काय कार्यवाही करतील याकडे सर्वांचे लक्ष लागले आहे.

# सोयगावचे एपीआय अनमोल केदार पाटोद्याचे नवनिर्वाचित ठाणेदार

आधुनिक केसरी न्यूज

**पाटोदा :** पोलीस ठाण्याचे ठाणे प्रमुख सहाय्यक पोलीस निरीक्षक सपकाळ यांची अंमळनेर येथे बदली झाली आसुन त्यांच्या जागी सहाय्यक पोलीस निरीक्षक अनमोल केदार यांच्या कडे पाटोदा पोलीस ठाण्याचा कारभार सोपविण्यात आला आहे.

सहाय्यक पोलीस निरीक्षक अनमोल केदार हे आपल्या धडाकेबाज कामांच्या माध्यमातून जिते जातील तिथे आपला दबदबा निर्माण करतात सहाय्यक पोलीस निरीक्षक केदार



यांचा शांत संयमी वेळे प्रसंगी कठोर भुमिका घेत असल्यामुळे अनमोल केदार यांना गुन्हेगारांचा कर्दनकाळ म्हणून आपली ओळख निर्माण केली असल्यामुळे त्यांच्यासमोर पाटोदा पोलीस ठाणे हद्दीत गुन्हेगारीवर वचक,चोरींच्या घटना,अवैध धंदे रोखण्याचे कडवे आव्हान नवनिर्वाचीत पाटोदा पोलीस ठाण्याचे सहाय्यक पोलीस निरीक्षक अनमोल केदार यांच्या समोर असणार आहे.

# नादरपूर येथे 75 वा प्रजासत्ताक दिन मोठ्या उत्साहात साजरा

आधुनिक केसरी न्यूज

**नादरपूर :** ता.कन्नड येथे 75 वा प्रजासत्ताक दिन मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला.

पिशोर परिसरात मागील एक महिन्यापासून चोरट्यानी धुमाकूळ घालून बऱ्याच गावात चोऱ्या केलेल्या आहेत .दिनांक 17-01-2024 रोजी मौजे नादरपूर येथे काही चोर चोरी करण्यासाठी आले असता मोठ्या शिताफीने त्यांच्यावर लक्ष ठेऊन श्री शिवाजी दादाराव निकम, सौ. मिना शिवाजी निकम,सोमीनाथ किसन निकम यांनी श्री सांडू केशव निकम यांच्या घरी चोरांनी चोरी करत असताना पकडण्यात आले. चोराकडे धारदार शस्त्र असतानाही जीवांची परवा न करता त्यांनी चोरास पकडून पोलिसांच्या स्वाधीन केले म्हणून परिसरातील गावात त्यांचे कौतुक करण्यात आले. त्यांचा सन्मानाचाच एक भाग म्हणून ग्राम पंचायत नादरपूर येथे ध्वजारोहणाचा मान श्री शिवाजी दादाराव निकम यांना देण्यात आली.तसेच छत्रपती संभाजीनगर जिल्हा मध्यवर्ती बँकेतील ध्वजारोहणाचा मान श्री सोमीनाथ किसन निकम यांना तर जि.प.प्राथमिक शाळा नादरपूर येथील ध्वजारोहणाचा मान श्री मुकेश हरिभाऊ निकम यांना देण्यात आली. याप्रसंगी ग्रामस्थ गावांत कार्यरत असलेले सर्व शासकीय विभागाचे कर्मचारी,ग्रा.पं.कार्यकारी मंडळ,तंटा मुक्ती समिती ,शालेय समिती,ग्राम पंचायत कर्मचारी,पोलीस पाटील,कोतवाल,शालेय विद्यार्थी मोठ्या संखेने उपस्तीत होते.





# जिल्हा परिषद केंद्रीय प्राथमिक शाळा इटोली येथे वार्षिक स्नेहसंमेलन उत्साहात साजरा


आधुनिक केसरी न्यूज

**जिंतूर :** २६ जानेवारी प्रजासत्ताक दिनी संध्याकाळी ०६:३० वाजता जिल्हा परिषद केंद्रीय प्राथमिक शाळा इटोली येथे दरवर्षीप्रमाणे याही वर्षी विद्यार्थ्यांच्या सुप्त कलागुणांना वाव देण्यासाठी शाळेच्यावतीने दिव्य भव्य बहारदार कलाविष्कार सादर करण्यात आले.

सांस्कृतिक कार्यक्रमाचे अध्यक्ष संगिताताई जगदिश घुगे (सरपंच) या होत्या.उपस्थित मान्यवरांच्या हस्ते क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले यांच्या प्रतिमेचे पूजन करत दिपप्रज्वलन करण्यात आले व शाळेतील विद्यार्थीनीने स्वागत गीताने उपस्थित मान्यवरांचे शब्द सुमनांने स्वागत केले. या कार्यक्रप्रसंगी प्रमुख पाहुणे म्हणून शिवाजीराव क-हाळे (केंद्रप्रमुख इटोली),आसाराम घुगे (शा. व्य.स.उपाध्यक्ष),यमुनाताई घुगे,सुर्यकांत घुगे (मा.शा.व्य.स.अध्यक्ष),अशोक मेनकुदळे(मा.शा.व्य.स.उपाध्यक्ष),रमेश दराडे(संत भगवान बाबा विद्यालयाचे प्राचार्य),किसन पुंड(मिनाताई ठाकरे विद्यालयाचे प्राचार्य),केशव घुगे (ओम शिक्षण संस्थेचे सचिव),परमेश्वर स्वामी(प्राथमिक साईबाबा शाळेचे मुख्याध्यापक),जगदिश घुगे(प्रतिष्ठीत नागरीक),कैलास ठेंग(उपक्रमशिल शिक्षक),शरदअप्पा तिळकरी,सुनिल जैस्वाल, श्रीकांतअप्पा तडकसे,संतोष कोद्रे आदि प्रमुख अतिथी मान्यवरांचे शाळेच्यावतीने सन्मान करण्यात आले तसेच या कार्यक्रमासाठी गजानन पतरवाळे,किसन साबळे,विश्वनाथ तनपुरे,नागेश वाघमारे,ज्ञानेश्वर हाके,माहुरे,बी.के.राठोड या शिक्षक बांधवांची अवर्जून उपस्थिती लाभली त्याचबरोबर ग्रामपंचायत सन्माननीय सदस्य व शाळा व्यवस्थापन समितीचे आजी माजी सन्माननीय सदस्य आणि बहुसंख्येनी महिला व ग्रामस्थ व इतर कर्मचारी,विद्यार्थी अवर्जून उपस्थित होते.

या सांस्कृतिक कार्यक्रमामध्ये खालीलप्रमाणे कार्यक्रमाची सुरुवात पयल नमन गणपती नृत्याने झाली त्यांच्या समवेत ललाटी भंडार,भारत की बेटी,पाव्हणं जेवला काय,छोटा बच्चा जानके हमको,कोळीवाल्याची शान,छम छम छम, पाटलांचा बैलगाडा,माय नेमीज लखन, छोटे छोटे सपने हो,मोबाईलचे दूष्परिणाम नाटिका,चाहो चाहे दिल्ली मुंबई आगरा, मी फक्त माझ्या भीमाला मानतो, पळसाचं पान आदिवासी नृत्य, मला प्रीतीच्या झुल्यात झुलवा, पुण्याची मैना मराठमोळी लावणी, तेरी मेरी गल्ला,गोविंदा रिमिक्स, सासें मे तेरी आणि गुलाबी शरारा राजस्थानी नृत्य आदि बहारदार कलाविष्कारांने उपस्थित प्रेक्षकांची मने जिंकली व बाल कलाकारांना टाळ्यांच्या गजराने उत्सफुर्तपणे दाद देत कौतुक केले. सांस्कृतिक कार्यक्रम यशस्वी होण्यासाठी शाळेतील शिक्षक गणेश येलाले,कौशल्या नागरगोजे, राधा कोद्रे आदिनी परिश्रम घेतले.

भास्कर चव्हाण यांनी कार्यक्रमाचे सुत्रसंचालन केले तर परमेश्वर मेनकुदळे यांनी कार्यक्रमाचे प्रास्तविक करत उपस्थित मान्यवर,प्रेक्षकांचे शाळेच्यावतीने शब्द सुमनाने शतशः आभार मानले.

हिवराळे क्लिनिक
ॲण्ड हर्बल हेल्थ केअर
9130174444
डॉ. के.बी. हिवराळे
आयुर्वेद जनरल फिजिशियन,
ॲक्युपंक्चर तज्ज्ञ
B.A.M.S., N.D.,C.M.S.& Ed(MUMBAI)
R.No.2366/12/2000
एमसीए/2022/10/बी/000839 बॉम्बे नर्सिंग होम परवाना क्र.218, औरंगाबाद
उपलब्ध सुविधा
- जुनाट सांधे दुखी (गुडघे दुखी)
- आम वात उदर रोग
- दमा व ॲलर्जी (जुनाट)
- चिकन गुनिया
- मनोकयीईक आजार
- त्वचा व गुप्त रोग
- स्त्रीयांचे आजार
- स्थूलपणा, मूळव्याध
- वंध्यत्व, संतती प्राप्ती
- कॅन्सर सल्ला, मुतखडा
- वजन वाढविणे
- वजन कमी करणे
- केसांच्या सर्व तक्रारी
- लहान मुलांची
- स्मरणशक्ती वाढविणे
पंचकर्म सुविधा (मुख्यकार्य) 1) वमन, 2) विरेचन, 3) बस्ती, 4) नस्य, 5) रक्तमोक्षन

अजिंठा रोड, सारा कॉलनी, फुलंब्री, ता. फुलंब्री, जि. औरंगाबाद

# पक्षकाराने केला वकील पती-पत्नीचा खून

## राहुरीत २० हजार रुपये वकील फीवरून वाद

आधुनिक केसरी न्यूज

**शिर्डी :** पक्षकार व वकील यांच्यात अवघ्या वीस हजार रुपयांच्या फी वरून वाद निर्माण होऊन पक्षकाराने वकील पती-पत्नीचा खून करून मृतदेह राहुरी तालुक्यातील उंबरे येथील स्मशानभूमी मध्ये असलेल्या एका विहिरीत टाकून दिल्याचे उघड झाल्याने या दुहेरी हत्याकांडाने राहुरी तालुक्यासह संपूर्ण नगर जिल्ह्यात मोठी खळबळ उडाली आहे.

वकील राजाराम जयवंत आढाव वय वर्ष ५२ तसेच वकील मनीषा राजाराम आढाव वय वर्ष ४२हे दोघेही पती-पत्नी राहुरी तालुक्यातील मानोरी येथील रहिवाशी असून ते राहुरी न्यायालयात वकिली व्यवसाय करत होते दिनांक २५जानेवारी रोजी दुपारपर्यंत राहुरी न्यायालयात कामकाज करत होते त्यानंतर ते दुपारी अहमदनगर येथे गेले असता त्यांनी एका पक्षकाराला पाठवून त्यांच्या पत्नी वकील मनीषा आढाव यांना बोलावून घेतले अशी माहिती मिळाली आहे तेव्हापासून आढाव दांपत्य बेपत्ता होते काल दिनांक २६ जानेवारी २०२४ रोजी



**खुनातील आरोपी दुशिग वर विविध गुन्हे दाखल**

किरण दुशिग वर संगमनेर पोलीस ठाण्यात दोन खुनासह वावी पुणे राहुरी वडनेर भेरव या पोलीस ठाण्यात गंभीर स्वरूपाचे मोठ्या प्रमाणावर गुन्हे दाखल आहे अशी माहिती पोलीस सुत्रांनी दिली .

पहाटे दोन वाजेच्या दरम्यान वकील राजाराम आढाव यांची फीयष्टा कंपनीची चार चाकी गाडी क्रमांक एम एच ये ई ही २३९०हि गाडी राहुरी न्यायालयाच्या परिसरात बेवारस मिळून आली पहाटे पोलीस पथक गाडी जवळ पोहोचले तेव्हा वकील आढाव यांच्या गाडीजवळ दुसरी एक डस्टर गाडी होती मात्र पोलीस गाडी पाहताच डस्टर गाडी त्या ठिकाणाहून सुसाट वेगाने निघून गेली राहुरीचे पोलीस निरीक्षक संजय ठेंगे यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस पथकांनी वकील आढाव यांची चार चाकी गाडी ताब्यात घेतली त्या गाडीची तपासणी केली असता गाडीमध्ये एक हात मोजा, दोर व एक बूट आढळून आला तपासा दरम्यान पोलीस पथकाला दुपारी १२वाजता च्या दरम्यान आढाव यांची दुचाकी गाडी क्रमांक एम एस १७ए डब्ल्यू ३२०७ही गाडी न्यायालय परिसरात बेवारस मिळून आली तसेच आढाव यांची एटीएम कार्ड राहुरी येथील आयसीसी आय बँकेसमोर बेवारस मिळून आले.

घटनेनंतर अहमदनगर येथील स्थानिक गुन्हे अन्वेषण विभाग व राहुरी पोलीस पथक आढाव दाम्पत्याचा शोध घेत होते या दरम्यान जिल्हा पोलीस प्रमुख राकेश ओला यांच्या मार्गदर्शनाखाली स्थानिक गुन्हे अन्वेषण विभाग पथकाचे पोलीस निरीक्षक दिनेश आहेर यांच्या नेतृत्वाखाली उपनिरीक्षक तुषार भाकराव व त्यांची टीम यांनी सदर डस्टर गाडीचा शोध घेऊन दोन आरोपींना ताब्यात घेतली त्यांना पोलिसांनी खाक्या दाखवताच त्यांनी घटनेची माहिती दिली आरोपींनी २५जानेवारी २०२४ रोजी दुपारी आढाव दांपत्याच्या अपहरण करून त्यांना त्यांच्या मानोरी येथील घरी येऊन गेले तेथेच दोघांचा खून करून रात्रीच्या दरम्यान त्यांचे मृतदेह दगड बांधून उंबरे येथील स्मशानभूमीत असलेल्या विहिरीमध्ये टाकून दिली काल २६ जानेवारी २०२४रोजी घटनेची उकल झाल्याने पोलीस पथक व स्थानिक नागरिकांच्या सहकाऱ्यांनी रात्री १० दरम्यान दोन्हीही मृतदेह विहिरीच्या बाहेर काढण्यात येऊन उत्तरीय तपासणीसाठी पाठवण्यात आले .

जिल्हा पोलीस अधीक्षक राकेश ओला ,श्रीरामपूर अप्पर पोलीस अधीक्षक स्वाती भोर श्रीरामपूर उपविभागीय पोलीस डॉक्टर बसवराज शिवपुजे, राहुरी पोलीस निरीक्षक संजय ठेंगे स्थानी गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक दिनेश आहेर, पोलीस उपनिरीक्षक तुषार धाकराव आदीसह एलसीबी व राहुरी पोलीस ठाण्याचे कर्मचारी उंबरे येथे उपस्थित होते. मयत आढाव याना एक मुलगा असून तो कॉलेजमध्ये बाहेरगावी शिकत असल्याचे समजते.

# कारंज्यातील मार्केटमध्ये आग

आधुनिक केसरी न्यूज

**वर्धा :** जिल्ह्यातील कारंजा घाडगे येथे आज पहाटेच्या सुमारास चार दुकानाला अचानक आग लागली. आगीचे कारण अद्याप कळू शकले नाही. या आगीत जवळपास १० ते २० लाखाचे नुकसान झाले आहे. शहरातील मुख्य मार्केट मधील नगर पंचायतच्या माजी नगरसेवकांच्या मोबाईलच्या दुकानात अचानक आग लागली. दुकानातील संपूर्ण साहित्य जळून खाक झाल्याचे दहा लाखापेक्षा जास्त नुकसान झाल्याची प्राथमिक माहिती समोर आली आहे. चार दुकानातील साहित्य जळून खाक झाले आहे. याठिकाणी मोबाईलचे दुकान, पान टपरी, स्वीट मार्ट दुकान अशी चार दुकाने आगीत जाळून खाग झाली आहेत. आग कशामुळे लागली याचे कारण मात्र कळू शकले नाही.

पहाटेपासून लागलेल्या आगीत सकाळी साडे सात वाजेपर्यंत नागरिकांनी आग विझविण्याचा आटोक्यात प्रयत्न केला. यावरून आगीचे रौद्ररूप लक्षात येते. चार दुकानात आग लागल्याचे समजताच नागरिकांची तोबा गर्दी पाहायला मिळाली. यावेळी अनेक नागरिकांनी आग विझवण्यासाठी प्रयत्न केले. आग आटोक्यात येत नसल्याने आष्टी वरून अग्निशमन दल घटनास्थळी दाखल झाले त्यावेळी चार दुकाने जळून खाक झाली होती. आग विझवण्यासाठी स्थानिक नागरिकांकडून मदतकार्य सुरू होते . घटनास्थळी कारंजा पोलीस दाखल झाले होते.

# विवाहसंस्था टिकून राहिली तरच भारतीय संस्कृती टिकेल : आ.जोरगेवार

## महाराष्ट्र विश्वकर्मामय सुतार (झाडे) समाज महासंघाच्या वतीने उपवर - उपवधू परिचय मेळाव्याचे आयोजन

आधुनिक केसरी न्यूज

**चंद्रपूर :** रितिरिवाजाने होना-या विवाह पद्धतीवर बाहेरच्या परदेशी संस्कृतीचे आक्रमण होत आहे. अशा वेळी भारतीय संस्कृतीचे जतन करण्यासाठी परिचय मेळाव्यांची गरज आहे. सुतार (झाडे) समाजाच्या वतीने आपण दरवर्षी उपवर - उपवधू परिचय मेळाव्याचे आयोजन करत आहात. ही समाज प्रबोधनासाठीही आवश्यक बाब असुन अशा विवाह संस्था टिकून राहल्या तरच समाजव्यवस्था व भारतीय संस्कृती टिकेल असे प्रतिपादन आमदार किशोर जोरगेवार यांनी केले.

महाराष्ट्र विश्वकर्मामय सुतार (झाडे) समाज महासंघाच्य वतीने पडोली येथे उपवर - उपवधू परिचय मेळाव्याचे आयोजन केले होते. या कार्यक्रमात ते बोलत होते. यावेळी ज्ञानेश्वर राखुंडे, राज वांढरे, आनंदराव बुरडकर, राजेश रासेकर, सुनिता पिंपळकर, डॉ. ज्योती राखुंडे, सतीश माणुसमारे, माधुरी शास्त्रकार, ज्योती झाडे, अरुना झाडे, रविंद्र बुरडकर, राहुल नवघरे, पराग झाडे, विशाल कायरकर, मिना माणुसमारे, गौरव मामीडवार, महादेव वाढई, गुणवंत राजुरकर रामदास नवघरे आदी मान्यवरांची उपस्थिती होती.

यावेळी पुढे बोलतांना आ. जोरगेवार म्हणाले की, सामाजिक कार्यक्रमातून समाज एकत्र येत असतो. त्यामुळे अशा आयोजनांची गरज आहे. यात सातत्य असल पाहिजे. विशेषतः अशा आयोजनात समाजातील युवा वर्ग मोठ्या संख्येने सहभागी होत असतो. त्यामुळे समाजाचे विचार या माध्यमातुन युवकांपर्यंत पोहचविण्याचेही मोठे मंच असे आयोजन ठरु शकतात. यातून युवकांना दिशा मिळू शकते. समाजातील यशस्वी व्यक्तींचा जिवनप्रवास आपण अशा आयोजनातून युवकांना सांगीतला पाहिजे. समाजाला नवी दिशा देण्यासाठी युवाकांच्या कल्पना, संकल्पना आपण विचारात घेतल्या पाहिजे असे ते यावेळी म्हणाले.



छोट समाज हे सेवेकरी समाज आहे. मात्र दुस-यांची सेवा करताना आपण मागे राहिलो ही सत्य स्थिती नाकारली जाऊ शकत नाही. त्यामुळे आता ही परिस्थिती बदलविण्याची गरज आहे. सरकारी नौकरीच्या शोधात राहण्यापेक्षा आपण आपल्या पांरपारिक व्यवसायकडे वळले पाहिजे. आपल्या हाताला परमेश्वराने कला दिली आहे. याचा योग्य उपयोग करुन पारंपारिक व्यवसायाला तंत्रज्ञानाची जोड देत रोजगार देणा-यांच्या भुमीकेत आपण येण्याची गरज असल्याचे यावेळी आमदार किशोर जोरगेवार म्हणाले. या कार्यक्रमात अनेकांना आपला आयुष्यभराचा जोडीदार मिळणार आहे. याबदलही आमदार किशोर जोरगेवार यांनी उपवर आणि उपवधुंना शुभेच्छा दिल्यात. सदर कार्यक्रमात समाजबांधवांनी मोठ्या संख्येने उपस्थिती होती.



# टिटवी -पळसखेडा येथे प्रजासत्ताकदिन उत्साहात

आधुनिक केसरी न्यूज

**सोयगाव :** तालुक्यातील टिटवी -पळसखेडा येथील जिल्हा परिषद प्राथमिक शाळेत व ग्रामपंचायत कार्यालयात दि.२६ जानेवारी शुक्रवार रोजी जिल्हा परिषद प्राथमिक शाळेचे मुख्याध्यापक अरुण गवळी व सरपंच संध्याताई भागवत जाधव यांच्या हस्ते भारतीय राज्यघटनेचे शिल्पकार डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले आणि जिल्हा परिषद उच्च प्राथमिक शाळा टिटवी,प्रजासत्ताक दिन मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला! शाळेच्या शालेय व्यवस्थापन समिती अध्यक्षा श्रीमती चैताली दीपक गौलखेडे यांच्या हस्ते ध्वजारोहण करण्यात आले! या वेळी गावच्या सरपंच ताई संध्याताई भागवत जाधव व उपसरंच लहू राठोड हे प्रमुख अतिथी म्हणून उपस्थित होते, शाळेचे मुख्याध्यापक श्री अरुण गवळी यांनी संविधानाच्या उद्देशिकेचे सामूहिक वाचन घेतले, यावेळी सरपंच पती श्री भागवत जाधव, ग्रामपंचायत सदस्य, दिलीप जाधव, कयूम तडवी, शालेय व्यवस्थापन समिती चे सर्व सदस्य, पोलीस पाटील डी टी राठोड,माजी सरपंच अज्ञानसिंग राठोड, ताराचंद राठोड, प्रमोद पाटील, पोलीस पाटील मधुकर पाटील, विनोद जाधव, शांताराम राठोड, निनाजी जाधव, शिक्षणप्रेमी संदीप जाधव, युवराज राठोड, विष्णू राठोड शाळेचे वरिष्ठ शिक्षक श्री मुकुंद मेमाणे सर, श्री गोपाल चांदणे सर, श्री नितीन मोरे सर, श्री रमाकांत जाधव सर, श्री डी आर मख सर, श्री दीपक सैतवाल सर, अंगणवाडी सेविका, मदतनीस, आशा वर्कर, मोठ्या संख्येने नागरिक व विद्यार्थी सहभागी झाले होते.

गुप्तरोगाबाबत
काहीही लपवू नका



(रविवारी मोफत तपासणी)



डॉ. शेख ए.एच.

या अशा अडचणी असतात ज्या कोणाला सांगता येत नाहीत व न सांगितल्याने त्या वाढत जातात पण काळजी करू नका डॉक्टरपासून काहीही लपवू नये, ते आपले सर्व प्रश्न सहज सोडवितात. डॉ. शेख आजपर्यंत 200 पेक्षा अधिक पुरस्काराने सन्मानित, प्रचंड अनुभवी व अत्यंत माफक खर्चात इलाज करतात, आजपर्यंत लाखों पेशंटनी याचा अनुभव घेतलाय, आपली माहिती अत्यंत गुप्त ठेवली जाते, आयुर्वेदाने सर्व रोग नष्ट होतात, (रविवारी मोफत तपासणी).
आपल्या सर्व चिंताचा एकमेव उपाय म्हणजे डॉ. शेख यांचे नवजीवन आयुर्वेदीक डीस्पेंसरी. आजच भेट द्या व खात्री करा.

नवजीवन आयुर्वेदिक डिस्पेन्सरी

सेंट्रल बसस्टँड समोर, हॉटेल मिर्झा जवळ, औरंगाबाद.
फोन : (0240) 2350042, मो. : 9021111549 www.drshaikhah.in



# प्रजासत्ताक दिनी ग्रामस्थांनी घेतली व्यसनमुक्तीची शपथ

आधुनिक केसरी न्यूज

**श्रीक्षेत्र राजूर :** येथून जवळच असलेल्या साखरवाडी येथील ग्रामस्थांनी 26 जानेवारी रोजी प्रजासत्ताक दिनाचे औचित्य साधून व्यसनमुक्तीची शपथ घेतली.बिडी, तंबाखू, सिगारेट, दारू व इतर जीवघेणी व कुटुंब उध्वस्त करणारे पदार्थ सेवन करणारं नाहीत असा निर्धार केला. साखरवाडी येथे ध्वजारोहण निमित्त ग्रामस्थ एकत्र जमले होते.सर्वप्रथम मान्यवरांच्या हस्ते ध्वजारोहण पार पडले.येथील जिल्हा परिषद प्राथमिक शाळेत प्रजासत्ताक दिनानिमित्त सांस्कृतिक कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. सर्वप्रथम महापुरुषांच्या प्रतिमेचे पूजन केले.यावेळी शाळेतील विद्यार्थ्यांनी विविध देशभक्तीपर गीते, नृत्य, पोवाडे, भारूडे सादर करून वाहवा मिळवली.नाटकाच्या माध्यमातून राष्ट्रीय एकात्मतेचा संदेश दिला.यावेळी माजी सरपंच सुरेश औताडे, माजी उपसरपंच शिवाजी औताडे, शाळा व्यवस्थापन समिती अध्यक्ष राजू सावंत, मुख्याध्यापक शिवाजी लेंडे, राजेश्वर नाईक, संदीप होळे, शशिकांत बाम्हणे,श्रीमती कुशीवर्ता औताडे यांच्यासह ग्रामस्थांची उपस्थिती होती.यावेळी ग्रामस्थांनी आपला गाव व्यसनमुक्त करण्याची शपथ घेतली.



# भेलके महाविद्यालयाच्या श्रमसंस्कार शिबिराची सांगता

आधुनिक केसरी न्यूज

**पुणे :** सावित्रीबाई फुले विद्यापीठ व पुणे जिल्हा शिक्षण मंडळाचे शंकरराव भेलके महाविद्यालय नसरापूर यांच्या वतीने आयोजित केलेले राष्ट्रीय सेवा योजना विशेष श्रमसंस्कार शिबिर गुरुवार दिनांक १६ जानेवारी २०२४ ते २२ जानेवारी २०२४ रोजी पासली येथील जिल्हा परिषद शाळा परिसरात संपन्न झाले.

कार्यक्रमाचे अध्यक्षस्थानी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ तुषार शितोळे सर तर प्रमुख अतिथी म्हणून सरपंच सौ शीतल तुपे, मा. सरपंच अंकुश तुपे उपस्थित होते. त्याचबरोबर पासली गावचे ग्रामस्थ उपस्थित होते.

या विशेष श्रमसंस्कार शिबिरात सुमारे पंच्याऐंशी विद्यार्थी स्वयंसेवकांनी सहभाग नोंदवला. त्यामध्ये मुलींचा सहभाग मोठ्या प्रमाणात होता. या शिबिरात स्वयंसेवक विद्यार्थ्यांनी श्रमदान व लोक प्रबोधनात्मक अशी अनेक समाज उपयोगी कामे केली. गावातील श्रीराम मंदिर परिसरात व सभोवतीच्या जागेमध्ये उगवलेले गवत काढून तसेच अस्ताव्यस्त पडलेला प्लास्टिक कचरा या स्वयंसेवकांनी एकत्र करून जाळून नष्ट केला. मंदिराकडे जाणारा रस्ता व मंदिर परिसर स्वच्छ झाल्याने एकादशीच्या दिवशी आलेल्या भाविकांनी व नागरिकांनी विद्यार्थ्यांचे विशेष कौतुक केले. पर्यावरण व वृक्षसंवर्धन, गड संवर्धन अभियानाचा भाग म्हणून या विद्यार्थ्यांनी पासली पंचक्रोशीती पर्यटकांचे श्रद्धास्थान असणाऱ्या रायलिंग पठारावर जाऊन स्वच्छता केली. तसेच विद्यार्थ्यांना किल्ले लिंगाणा ची ऐतिहासिक माहिती दिली. तसेच श्रीराम मंदिर परिसरात व प्राथमिक शाळा परिसरात सभोवतालच्या झाडांना आळी तयार करून त्यांना पाणी देऊन जीवदान दिले.

शिबिर काळात या विद्यार्थ्यांनी रॅली व पथनाट्य यांच्या माध्यमातून मतदार जागृती, पर्यावरण संवर्धन, लोकसंख्या नियंत्रण, मोबाईलचे दुष्परिणाम इ विषयांवर पथनाट्य घेण्यात आली. जाधववाडी , माझगाव, पासली गावात घरोघरी जाऊन सामाजिक आर्थिक सर्वेक्षण करीत साक्षर निरक्षर लोकांची माहिती गोळा केली. तिचा उपयोग ग्रामपंचायतसाठी नजीकच्याभविष्यकाळात निश्चितच होणार आहे.या सोबतचा गावातील नोकरी व व्यवसाय करणाऱ्या युवकांचा सर्व्हे देखील करण्यात आला. शिबीर काळात आयोजित करणारे आलेल्या व्याख्यानमालेमध्ये प्रा. संजय लांडगे, शिवव्याख्याते डॉ . प्रमोदकुमार हिरे, ट्रेकिंग अभ्यासक डॉ विजय कदम, मा . रामचंद्र मोरे यांची व्याख्याने व शिवव्याख्याते डॉ प्रमोदकुमार हिरे यांचे जोशपूर्ण शिवव्याख्यान झाले. समारंभाचे अध्यक्ष डॉ तुषार शितोळे यांनी राष्ट्रीय सेवा योजना ही विद्यार्थ्यांच्या व्यक्तिमत्व विकासात अत्यंत महत्त्वाची भूमिका बजावत असल्याचे नमूद करून विद्यार्थ्यांनी केलेल्या विविध उपक्रमांचे कौतुक केले. यावेळी पासली गावचे सरपंच सौ शीतल तुपे यांनी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. तुषार शितोळे यांचा सत्कार केला. राष्ट्रीय सेवा योजना कार्यक्रमाधिकारी प्रा.डॉ. जगदीश शेवते , कार्यक्रम अधिकारी प्रा. जाधवर डी. एस. महिला कार्यक्रम अधिकारी प्रा. साळुंखे ऋतुजा यांचा सत्कार गावकरी व माजी सरपंच अंकुश तुपे यांच्याकडून करण्यात आला. या कार्यक्रमाचे बहारदार सूत्रसंचालन स्वयंसेवक कुणाल मोझर व आरती कोळपे यांनी केले. प्रास्ताविक राष्ट्रीय सेवा योजना कार्यक्रमाधिकारी प्रा डॉ. जगदीश शेवते यांनी केले तर महिला कार्यक्रम अधिकारी प्रा. ऋतुजा साळुंखे यांनी आभार मानले.

शिबिर यशस्वी होण्यासाठी , प्रा. डॉ. राजेंद्र सरोदे, प्रा. सहदेव रोडे, प्रा. भगवान गावित, प्रा. पौर्णिमा कारळे, डॉ. सचिन घाडगे, प्रा. ऐश्वर्या धुमाळ, प्रा. वर्षा तनपुरे, प्रा . पोमन कोमल, प्रा माऊली कोंडे, प्रा महेश कोळपे, कार्यालय अधीक्षक श्री. विकास ताकवले, वरीष्ठ लिपिक श्री. आशिष परमार विद्यार्थी प्रतिनिधी कु. तेजस पायगुडे, शिपाई अभिषेक मोरे यांनी विशेष कष्ट घेतले...

# स्वतःच्या व्यवसायातून उज्ज्वल भविष्याकडे वळा : श्याम हेडाऊ

आधुनिक केसरी न्यूज

**चंद्रपूर :** देशात कोणतेही सरकार येऊ दे , ते प्रत्येकाच्या हाताला नोकरी देऊ शकत नाही. त्यामुळे तरुणांनी कौशल्य विकास योजनेच्या माध्यमातून किंवा मिळेल तिथून वेगवेगळे प्रशिक्षण घेऊन स्वतःमध्ये व्यावसायिक दृष्टिकोन निर्माण केल्यास स्वतःच्या व्यवसायातून उज्वल भविष्य निर्माण करता येऊ शकते त्यामुळे तरुणांनी नोकरीच्या मागे न लागता स्वतःच्या व्यवसाय निर्मितीकडे वळण्याचा प्रयत्न करावा असे आवाहन प्राध्यापक शाम हेडाऊ यांनी केले. मिटकॉन कन्सल्टन्सी अँड इंजीनियरिंग सर्विसेस लिमिटेड पुणे द्वारा आयोजित आणि उद्योग संचालनालय , महाराष्ट्र शासन , मुंबई द्वारा प्रायोजित भारतरत्न डॉक्टर बाबासाहेब आंबेडकर विशेष सामुदायिक प्रोत्साहन योजनेअंतर्गत अनुसूचित जाती प्रवर्गातील सुशिक्षित बेरोजगार युवक युवतींसाठी आयोजित निवासी उद्योजकता विकास कार्यक्रमांमध्ये ते बोलत होते. स्थानिक विकास केंद्र येथे आयोजित या कार्यक्रमांमध्ये मिटकॉन कन्सल्टन्सी चे चंद्रपूर जिल्हा समन्वयक संतोष लंके, कार्यक्रम समन्वयक लक्ष्मी खोब्रागडे, गुणवंत वाटेकर आदींची उपस्थिती होती. व्यवसायातील मनुष्यबळ व्यवस्थापन, वित्तीय व्यवस्थापन आणि कच्च्या मालाचे व्यवस्थापन या विषयावर बोलत असताना हेडाऊ यांनी व्यवसायातून निर्माण झालेला पैसा हा अनुत्पादक बाबींवर खर्च न करता तो पुन्हा व्यवसायातच गुंतविल्यास निश्चित यश मिळत असते. तसेच मनुष्यबळ व्यवस्थापनासाठी डोक्यावर बर्फ, तोंडात साखर व पायाला भिंगरी असावी लागते. आणि कच्च्या मालाच्या नियोजनासाठी सुद्धा संबंधित क्षेत्रातील विविध घटकांसोबत आपले संबंध आपण कसे निर्माण करतो यावर व्यवसायाचे यश अपयश अवलंबून असते असे प्रतिपादन केले. समन्वयक लक्ष्मी खोबराकडे यांनी या 18 दिवसीय कार्यक्रमाच्या आयोजनामागची भूमिका विशद केली. तर गुणवंत वाटेकर यांनी प्रमुख वक्ते शाम हेडाऊ यांचा परिचय करून देत त्यांच्या मार्गदर्शनातून तरुणांनी व्यवसायिक दिशा जोपासावी असे आवाहन केले.



# मोतीबाग कार्यालयात ध्वजारोहण उत्साहात

आधुनिक केसरी न्यूज

**पुणे :** भारतीय संस्कृती संवर्धक संस्था -राष्ट्रीय स्वयंसेवक संघाच्या पश्चिम प्रांत कार्यालय असलेल्या मोतीबाग येथे ७५ व्या प्रजासत्ताक दिनानिमित्त बांधकाम व्यावसायिक लोटस कन्स्ट्रक्शनचे आदित्य महाराज सिंह यांचे हस्ते २६ जानेवारी रोजी सकाळी ठीक ७.४५ वाजता ध्वजारोहण करण्यात आले. कार्यक्रमाच्या सुरवातीला प्रमुख पाहुणे आदित्य महाराज सिंह यांचे हस्ते भारत मातेचे पूजन करण्यात आले.

त्यांनी आपल्या मनोगतात संघाच्या कामाबाबत कौतुक करीत उपस्थितांना प्रजासत्ताक दिनानिमित्त शुभेच्छा दिल्या. याप्रसंगी भारतीय संस्कृती संवर्धन संस्थेचे कार्यवाह प्रसाद खेडकर, कसबा भागाचे संघचालक ॲड. प्रशांत यादव यांची यावेळी प्रमुख उपस्थिती होती.



# विद्यार्थ्यांमध्ये मूल्यसंस्कार रुजविणे काळाची गरज

## प्रा. बोराडे : भोकरदन येथे किड्स प्लॅनेट इंटरनॅशनल स्कूलमध्ये प्रजासत्ताक दिन उत्साहात

आधुनिक केसरी न्यूज

**भोकरदन :** सध्याच्या स्पर्धेच्या युगातील शिक्षणाचे महत्त्व लक्षात घेता प्रत्येक पालक आपल्या पाल्याला दर्जेदार शिक्षण देण्याचा प्रयत्न करत आहे. तंत्रज्ञानाच्या साह्याने आधुनिक शिक्षणाची कास धरत आहे. परंतु बालकांच्या व्यक्तिमत्वाचा सर्वांगीण विकास साधायचा असेल तर आधुनिक शिक्षणाबरोबरच विद्यार्थीदशेत बालमनावर नैतिक मूल्यसंस्कार रुजवणे काळाची गरज आहे असे प्रतिपादन प्रा.बाळासाहेब बोराडे यांनी केले. भोकरदन येथील किड्स प्लॅनेट इंटरनॅशनल स्कुलमध्ये प्रजासत्ताक दिनानिमित्त आयोजित कार्यक्रमात विद्यार्थी व पालकांना मार्गदर्शन करतांना ते बोलत होते. सर्वप्रथम मान्यवरांच्या हस्ते राष्ट्रपिता महात्मा गांधीजींच्या प्रतिमेचे पूजन करून पुष्पहार अर्पण करून ध्वजारोहण करण्यात आले.या कार्यक्रमास प्रमुख अतिथी म्हणुन प्रा.बाळासाहेब बोराडे, बालाजी पतसंस्थेचे सचिव मदन सर,लिपिक-सोन्नी सर,गणेश आफसेटचे संचालक गणेश सहाने पाटील,संत गजानन



हॉस्पिटलचे संचालक डॉ.प्रशांत बावस्कर,पोलीस कर्मचारी समाधान जगताप, भिंगारे सर, आमदार संतोष पाटील दानवे यांचे स्वीय सहाय्यक शांताराम गव्हाणे,अनिल सोनुने,उमेश दळवी, विलास जाधव, सचिन चोरमारे, पंचायत समिती लिपिक योगेश दळवी आदी मान्यवर उपस्थित होते. पुढे बोलताना प्रा.बोराडे म्हणाले की, मुलांमधील चांगल्या गुणांचे कौतुक व्हायला हवे.मोबाईलच्याअतिवापरामुळे अनेक समस्या निर्माण होताहेत.मुलांना यापासून वेळीच रोखायला पाहिजे. फास्टफूडच्या बदल्यात सकस आहार दिल्यास बालकांचे आरोग्य सुदृढ राहण्यास मदत होते. प्रेरणादायी गोष्टीतून नैतिक मूल्यांची जोपासना होत असते. अभ्यासाबरोबरच विद्यार्थ्यांचे मन,मनगट आणि मस्तक मजबूत राहिले तरच तो भविष्याचा सामना करू शकेल असेही प्रा.बोराडे म्हणाले. यावेळी शाळेच्या वतीने घेण्यात आलेल्या वार्षिक क्रिडा स्पर्धांचे बक्षीस वितरण करण्यात आले.प्रथम,द्वितीय,तृतीय क्रमांक पटकावून विशेष कामगिरी करणाऱ्या विद्यार्थ्यांना मान्यवरांच्या हस्ते मेडल्स व सन्मानपत्र देऊन गौरविण्यात आले.यावेळी विद्यार्थ्यांना शालेय साहित्य व मिठाईचे वाटप करण्यात आले.या कार्यक्रमास शाळेच्या मुख्याध्यापिका चंद्रकला बनकर,शिक्षीका कोमल तराळ ,रविता लुटे,शितल कुदर,निर्मळ ताई तसेच पालक व विद्यार्थी उपस्थित होते. कार्यक्रम यशस्वी होण्यासाठी शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचाऱ्यांनी प्रयत्न केले.



# जैन वाचनालय व महिला मंडळाच्या वतीने हळदी-कुंकवाचा कार्यक्रम

आधुनिक केसरी न्यूज

**नेमीनाथ जैन**


**बोरी :** मकर संक्रांति व भारतीय प्रजासत्ताक दिनाचे औचित्य साधून येथील श्री 1008 आदिनाथ दिगंबर जैन मंदिरात २६ जानेवारी रोजी कै. जयकुमार जैन सार्वजनिक वाचनालय व जैन महिला मंडळ यांच्या वतीने हळदी कुंकवाचा कार्यक्रम आयोजित करण्यात आला होता. दुपारी तीन ते रात्री आठ वाजेपर्यंत आयोजित केलेल्या या हळदीकुंकवाच्या कार्यक्रमास गावातील महिलांनी मोठ्या प्रमाणावर उपस्थिती लावली होती. यानिमित्य विविध सजावट करण्यात आली होती. नुकताच श्रीराम प्रतिष्ठापनेचा कार्यक्रम झाल्यामुळे भगवान श्रीरामाचे चित्र लावण्यात आले होते .विविध रंगाची फुगे, फुले यांनी या प्रतिमेची सजावट केली होती. त्यानंतर पणत्या लावून दीपोत्सव साजरा करण्यात आला.

हळदी कुंकवाच्या निमित्ताने गुलाबाच्या फुलांची काढलेली रांगोळी सर्व महिलांचे लक्ष वेधत होती .अनेकांनी ही रांगोळी आपल्या मोबाईलमध्ये टिपली. जैन वाचनालयाच्या अध्यक्षा सौ.मिना जैन ,जैन महिला मंडळाच्या सौ जयश्री लांडगे ,सौ निशा लांडगे ,सौ दिपाली बोरचाटे, अर्चना भागवत ,सौ मेघा चवडे, सौ उन्नती पुंड ,सौ सुजाता चोभे, सौ रुपाली बुलबुले यांनी या कार्यक्रमाचे नियोजन केले होते.

# कवी अय्युब पठाण लोहगावकर यांचा सत्कार

आधुनिक केसरी न्यूज

**छत्रपती संभाजीनगर :** गीताई इन्सीटयुट ऑफ मॅनेजमेंट बिडकीन ता. पैठण या शैक्षणिक संस्थेमध्ये नुकतेच मराठी भाषा संवर्धन पंधरवाडा निमित्ताने, " कवी आपल्या भेटीला " हा उपक्रम अय्युब पठाण लोहगांवकर यांनी यशस्वीपणे सादर करून सर्व विद्यार्थी आणि विद्यार्थीनी तसेच प्राध्यापकवर्ग यांचे मनोरंजन केल्याबद्दल गीताई इन्सीटयुट ऑफ मॅनेजमेंटचे संचालक डॉ. किर्तिकुमार एखंडे यांनी कवी अय्युब पठाण लोहगावकर यांचा सन्मानपत्र, स्मृतिचिन्ह,व शाल-श्रीफळ देऊन यथोचीत सत्कार केला. याप्रसंगी प्रा. राहूल पाटील, प्रा. शारदा कोकाटे, प्रा. जया थोरात, आणि विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.





# बाजार सावंगीत नवीन प्रवेशद्वाराचे भूमिपूजन

आधुनिक केसरी न्यूज

**बाजार सावंगी :** खुलताबाद तालुक्यातील बाजार सावंगी येथील नवीन वेश प्रवाशद्वाराचे दि.२६ माजी जिल्हा परिषद सदस्या तथा ग्रामपंचायत सदस्या सौ शोभाताई भिमराव नलावडे व पदाधिकारी मान्यवरांच्या हस्ते भुमिपुजन करण्यात आले. येथील जुने ग्रामपंचायत कार्यालय इमारत जिर्ण झाली व गावात प्रवास करताना वहानांना ये-जा करताना त्रासदायक ठरत असल्याने ग्रामपंचायत पदाधिकारी व मान्यवरांच्या अनेक दिवसांपासून नवीन वेश प्रवादद्वार करण्याचे मानस होते. यात मा आमदार सतिष भाऊ चव्हाण पाटील यांनी निधी उपलब्ध करून दिल्याने चालना मिळाली व प्रजासत्ताक दिनाचे औचित्य साधून दि.२६रोजी माजी जिल्हा परिषद सदस्या तथा ग्रामपंचायत सदस्या सौ शोभाताई भिमराव नलावडे यांच्या हस्ते व इतर मान्यवरांच्या हस्ते नवीन वेश प्रवाशद्वाराचे भुमिपुजन करण्यात आले.यावेळी मा सरपंच आप्पाराव पाटील नलावडे, उपसरपंच कारभारी नलावडे,माजी सरपंच भिमराव नलावडे,ग्रापं सदस्य बबन पुंड,अनिल भाऊ नलावडे,संजय शेठ, बाबुराव शेठ,अशोक नलावडे, ग्रामविकास अधिकारी एबी बनसोड,बबन नलावडे,अप्पाराव नलावडे सह पदाधिकारी व मान्यवर नागरिक उपस्थित होते.नवीन वेश प्रवादद्वार तथा इमारत येथे उभारण्यात येत असल्याने नागरिकांतून आनंद व्यक्त करण्यात येत आहे.



# छत्रपती शाहू अभियांत्रिकी महाविद्यालयाच्या विद्यार्थ्यांना दोन लाख रुपयांचे अर्थसाहाय्य

आधुनिक केसरी न्यूज

**छत्रपती संभाजीनगर :** महाराष्ट्र राज्यातील विद्यार्थ्यांच्या मूर्त कलागुणांना स्वरूप देण्यासाठी महाराष्ट्र राज्य नाविन्यता महाराष्ट्र स्टुडंट इनोव्हेशन चॅलेंजचे आयोजन करण्यात आले होते .राज्यातील विद्यार्थ्यांच्या अंगभूत कलागुण विकसित करून नवउद्योजकतेचे स्वप्न साकार करण्यासाठी योग्य ते पाठबळ पुरवणे. हे या उपक्रमाचे मुख्य उद्दिष्ट होते. या उपक्रमाचे अनावरण दि. १५ जुलै २०२३ रोजी मंत्री, कौशल्य, रोजगार, महाराष्ट्र राज्य यांच्या हस्ते करण्यात आले होते.

या अंतर्गत जिल्हास्तरिय सादरीकरणाचा टप्पा CSMSS छत्रपती शाहू अभियांत्रिकी महाविद्यालयात दि. १५ डिसेम्बर २०२३ रोजी घेण्यात आला होता. यात एकूण शासकीय व खासगी असलेल्या शैक्षणिक संस्था तसेच औद्योगिक प्रशिक्षण संस्थांना अशा एकूण २,१७२ संस्थानी सहभाग घेतला होता. त्यात CSMSS छत्रपती




शाहू अभियांत्रिकी महाविद्यालयतील दोन विजेत्यांना प्रत्येकी एक लाख व बीज भांडवल प्रमाणपत्र जिल्ह्याचे पालकमंत्री संदीपान भुमरे पाटील व विरोधी पक्षनेते अंबादास दानवे यांच्या हस्ते २६ जानेवारी २०२४ प्रजासत्ताक दिनी सन्मानित करण्यात आले. या विद्यार्थ्यांना अगदी कमी खर्चात उत्कृष्ट दर्जाचे स्वयंचलित पालेभाजी लागवड यंत्र व स्वयंचलित बियाणे पेरणी यंत्र विकसित करून सामान्य शेतकऱ्यांसाठी हे उपकरण उपलब्ध करून दिले आहे. यात टोमॅटो, मिरची आणि वांगी यांसारख्या वनस्पतींची लागवड स्वयंचलित भाजीपाला लागवड यंत्राद्वारे करता येते. ही यंत्रणा कमीत कमी मनुष्यबळ आणि कमी वेळेत अधिक भाजीपाल्याची रोपे लावू शकते. यंत्रामुळे दोन रोपांमधील अंतरही कमी होते, त्यामुळे कमी जागेत जास्त उत्पादन मिळते. ट्रेमधुन रोप उचलुन हे आपोआप जमिनीत लावले जाते. यंत्र विकसित करण्यासाठी महाविद्यालयाच्या टीममध्ये गणेश जंढे, राणी राठोड, (पॉवर ट्रान्समिशन) रोहन मुरदारे, अनिकेत गाडे, पवन कर्पे, श्रीनाथ पाटील, नितीन ताठे, अनिकेत साळुंके, अर्जुन मटने, ओंकार हुगेवार (मॅनुफॅकच्युरींग), जान्हवी पाटील, मयुरी जामदार, रिया धूत, जान्हवी बैरागी, आरती मोहन (मार्केटिंग), निकिता राठोड, अल्ताफ शेख (ऍक्चुएटर अँड लॉजिक प्रोग्रामिंग सिस्टिम), प्रमोद भंडारे, स्नेहा शिंदे, अभिषेक शिंदे, केतन अरसुले, फॅकल्टी ऍड वाईझर प्रा. सचिन लहाने, प्रा युवराज नरवडे, सहाय्यक मार्गदर्शक मेकॅनिकल विभागप्रमुख डॉ. आर.एच. शिंदे, आयक्यूएसी हेड डॉ. आर. पी. चोपडे, प्रा. संजय कुलकर्णी (ट्रैनिंग अँड प्लेसमेंट सेल), डॉ. मनोज मते, अंकिता ऍग्रो इंजिनीरिंग डायरेक्टर एस. एन. पाटील, विष्णू खडप, श्री. सुनिल जाधव, श्री. दीपक पवार, श्री. अनिल मालकर व शेती अभ्यासक श्री. जनार्धन कांबळे यांचे सहकार्य लाभले. विद्यार्थ्यांच्या यशाबद्दल संस्थेचे अध्यक्ष श्री. रणजित मुळे, सचिव श्री. पद्माकर मुळे, प्रशासकीय अधिकारी डॉ. श्रीकांत देशमुख, प्राचार्य डॉ. उल्हास शिंदे, कौशल्य रोजगार सहाय्यक आयुक्त श्री. सुरेश वराडे, उपप्राचार्य डॉ. देवेंद्र भुयार, संस्थेचे एच. आर. ऑफिसर अशोक आहेर, जनसंपर्क अधिकारी संजय अंबादास पाटील यांनी अभिनंदन केले आहे.



## ज्योतीनगर शिवसेना महिला आघाडीच्या वतीने हळदी - कुंकवाचा कार्यक्रम

आधुनिक केसरी न्यूज

**छत्रपती संभाजीनगर :** २६ जानेवारी रोजी श्री ज्योती मंदिर सभागृह ज्योतिनगर येथे हळदी कुंकवाचा कार्यक्रम घेण्यात आला. या प्रसंगी महिला आघाडीच्या संपर्क प्रमुख सुनिताताई आऊलवार, जिल्हा संघटीका प्रतिभाताई जगताप, वैजयंतीताई खैरे, शहर संघटीका आशाताई दातार, उपशहर संघटीका अरुणा भाटी, नलिनी महाजन उपसंघटिका मनीषा ठाकरे यांच्या हस्ते स्व. सौ. मीनाताई ठाकरे यांच्या प्रतिमेचे पूजन करून व पुष्पहार अर्पण करून कार्यक्रमाची सुरवात करण्यात आली. या प्रसंगी शुभांगी जहागीरदार,दीपा देशपांडे, छाया अशर, शुभांगी गव्हाणे,माया लोद,ज्योती भारती, ॲड. अंजली कुलकर्णी, ज्योती मिसाळ राजेश्री मगर, शिला जावळे, उतरा आष्टेकर, मीनाक्षी कंकाळ, रेखा पाटिल इत्यादींची उपस्थिती होती त्याचप्रमाणे प्रभागातील महिलांची मोठ्या संख्येने उपस्थिती होती. कार्यक्रमाच्या यशस्वीतेकरिता उपविभाग प्रमुख अमोल निकाळजे ,युवासेना सरचिटणीस देविदास रत्नपारखी, गिरीश चपळगावकर,पंकज शर्मा, चोपडे मामा, अशोक चिमखडे मनोज खोचे, दिनेश तिवारी इत्यादींनी सहकार्य केले.

## शहरातील नारायणा इंटरनॅशनल स्कूल लोहा विद्यालयाच्या प्रांगणात प्रजासत्ताक दिन

आधुनिक केसरी न्यूज

**लोहा :** शहरातील नारायणा इंटरनॅशनल स्कूल लोहा विद्यालयाच्या प्रांगणात प्रजासत्ताक दिन मोठ्या थाटात साजरा करण्यात आला. या कार्यक्रमाला प्रमुख पाहुणे म्हणून संस्था चालक श्री नारायणराव मुंडे सर व भागवत मुंडे सर उपस्थित होते. त्याच बरोबर शाळेचे मुख्याध्यापक श्री शिवाजी केंद्रे सर, श्री कुलकर्णी सर,शालेय परिसरातील प्रतिष्ठित नागरिक व सर्व शिक्षकवृंध उपस्थित होते.दिप प्रज्वलन करून प्रमुख पाहुण्यांच्या हस्ते ध्वजारोहण करण्यात आले . ध्वजारोहणाच्या कार्यक्रमानंतर भारत मातेची सेवा बजावत असलेल्या आजी माजी सैनिकांचा, जवानाचा सत्कार करण्यात आला व नारायणा शाळेतील चिमुकल्या बालकांनी आपले मनोगत व्यक्त केले.देश भक्ती पर गीत गायले. प्रमुख पाहुण्यांच्या हस्ते क्रिडापुरस्काराचे वितरण करण्यात आले. विद्यार्थ्यांना खाऊचे वाटप करून कार्यक्रमाची सांगता करण्यात आली.





## लोहा पोलिसांनी पकडला सव्वा 5 लाखांचा बनावट तंबाखू व गुटखा

आधुनिक केसरी न्यूज

**लोहा :** दि.28 जानेवारी रोजी लोहा पोलिसांनी टाटा एस वाहनांमध्ये 5.25 लाख रुपयाचा बनावट सूर्य छाप जर्दा तंबाखू व गुटखा जप्त केला. यात दोन आरोपींना अटक केली असून लोहा पोलिसात त्यांच्यावर गुन्हे दाखल करण्यात आले आहेत. लोहाचे पोलीस निरीक्षक चिंचोलकर साहेब यांना गुप्त बातमीदारामार्फत बातमी मिळाली की नांदेड कडून लोहा कडे बनावट तंबाखू व गुटखा वाहतूक होत आहे. या माहितीच्या आधारे तात्काळ एक टीम तयार करून नांदेड कडे जाणाऱ्या रोडवर टीम रवाना करण्यात आली. दोन वेगवेगळ्या ठिकाणी टीम थांबून होत्या. तेव्हा नांदेड कडून एक टाटा एस चार चाकी गाडी येत असताना पोलिसांनी तिला अडवून पकडले त्या 35 बॉक्स बनावट सूर्य छाप जर्दा तंबाखू मिळून आला. तर त्याच गाडीमध्ये विमल,ए-1,आदत/ए ए ए नावाचा गुटखा ही मिळून आला. सदर वाहनातील संपूर्ण मुद्देमाल पोलिसांनी जप्त करून जागीच सदर गाडीतील दोन्ही आरोपींना अटक केली.

पकडलेल्या टाटा एस गाडीचा क्रमांक MH 04 FP 0910 असा असून या वाहणा बाबत पोलीस पुढील तपास करत आहे.

यातील आरोपी हे नांदेड येथील असून त्यांची नावे शेख समेर शेख आयुनोदीन वय 21 वर्ष, नुरी चौक गोविंद नगर नांदेड, सय्यद अमेर सय्यद महमद अली वय 22 वर्ष खुदबेनगर चौरस्ता, नांदेड अशी आहेत. पोलीस हवालदार नारायण कदम यांच्या तक्रारीवरून लोहा पोलीस स्टेशन येथे गुरक्र 27/2024 भादवी कलम 420,328,34 व कोटपा अधिनियम कलम 5,7,8,20,22 प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आला आहे. सदर गुन्ह्याचा पुढील तपास सपोनि चन्ना साहेब हे करत आहेत.

सदर आरोपीताना कस्टडी मध्ये घेऊन लोहा पोलीस पुढील तपास करत आहेत. आरोपी यांनी सदरचा माल कुठून आणला, सदरचा बनावट माल कोण्या ठिकाणी बनवण्यात आला, सदर माला मागील मुख्य सूत्रधार कोण आहे,सदरचा माल बाहेर राज्यातून बनवून आणला की नांदेडमध्ये बनला याचा पुढील तपास लोहा पोलीस करत आहेत. सदरची कार्यवाही ही पोलीस निरीक्षक चिंचोलकर यांच्या मार्गदर्शनाखाली सपोनि चन्ना, पोहवा नारायण कदम, निवृत्ती मुलमवाड, संजय मेकलवड,नामदेव ईजुळकंठे,वामन राठोड यांनी केली.

## शिवसेनेच्या शहरप्रमुखपदी खंडू पाटील पवार

आधुनिक केसरी न्यूज



**लोहा :** शिवसेना (उध्दव बाळासाहेब ठाकरे) पक्षप्रमुख उद्धव ठाकरे यांच्या आदेशानुसार शिवसेना लोहा तालुक्यातील नियुक्त्या जाहीर करण्यात आल्या आहेत. लोहा शहरप्रमुखपदी खंडू पाटील पवार यांची नियुक्ती करण्यात आली आहे. वंदनीय हृदयसम्राट शिवसेनाप्रमुख स्वर्गीय बाळासाहेब ठाकरे यांचा हिंदुत्वाचा विचार तळागाळातील लोकांपर्यंत पोहोचवण्यासाठी व समाज उपयोगी केलेल्या कार्याची दखल घेत आपली शिवसेना (उध्दव बाळासाहेब ठाकरे) पक्षाच्या शहरप्रमुखपदी नियुक्ती करण्यात आली आहे. या निवडीबद्दल राज्य संघटक एकनाथ दादा पवार, नांदेड जिल्हा संपर्कप्रमुख बबनराव थोरात, सह-संपर्कप्रमुख मुक्तेश्वर धोंडगे, जिल्हाप्रमुख माधवराव पावडे, लोहा विधानसभा प्रमुख साहेबराव काळे, विधानसभा समन्वयक सुरेश पाटील हिलाल, मा.जि.प.सदस्य विठ्ठलराव शेटकर, बालाजी परदेशी, सरपंच बालाजी पाटील पवार हिप्परगेकर, राम पाटील पवार, गजानन मोरे, पंडित पाटील फाजगे, पांडुरंग लोंढे, आदीनी अभिनंदन करून शुभेच्छा दिल्या.

# राम नाम सत्य है!

आधुनिक केसरी

लहान असतांना गावात कुणी मेलं तर घरची वडील धारी घरातील लहान मुलांना कळु देत नव्हते. घरा बाहेर डोकावायची मुभा नसायची किंवा भीती तरी वाटायची. सर्वत्र भेसूर वातावरण असायच. अधुन- मधुन रडण्याचा आवाज यायचा आणि भीतीन पोटात गोळा उठायचा. मग केंव्हा तरी काही वेळा नंतर डफडयावर काडीचा आवाज पडयाचा, डंग - डंग करीत डफडयावाला पुढे चालायचा व मागे चालणारे हळुच 'राम नाम सत्य है' चा नारा देत मढया बरोबर चालायचे.



विष्णुपंत भुतेकर
9420708989

तीच भीती तोच दर्प आज प्रत्येक शेतकऱ्यांच्या घरातुन यायला लागला. वर- वर दिसणाऱ्या गाडया, घोडया, बडेजाव, लग्न, लग्नसमारंभा निमित्ताने होणाऱ्या जेवणावळी, हातातील ॲनराइड मोबाईल हे सगळ- सगळच जणु भेसुरता वाढवत आसल्याचा दर्प येतो. वास्तवा पासुन कोसो दुर नेणारी समाज रचना शेतकऱ्यांच्या अत्महत्येसाठी साहयभुत ठरत आहे. रोज शेतकऱ्यांच्या आत्महत्या होत आहेत. शेतकऱ्यांच् औदासीन्य संपायच नाव घेत नाही. व्यवस्थेने शेतकऱ्यांची गुलामगिरीतून सुटका करण्या एवजी भिकारी करणाकडे वाटचाल सुरू केली. अन्नासाठी ज्या शेतकऱ्यांवर बारा बलुतेदार , आलुतेदार, गावकुसातील निराश्रित आवलंबुन आसायचे तो शेतकरी आता स्वस्त धान्य दुकानाचा आश्रीत झाला. शेतीला वीज, पाणी, शेत रस्ते, खते, बि- बियाणे, पीकाला रास्त भाव, शेतकऱ्यांच्या मुलाबाळांना शिक्षण, आरोग्याच्या सोयी देण्या एवजी सरकार तीन महिन्यांला दोन हजार देवुन भीकेचा कटोरा हातात देत आहे. ह्या भिकारी प्रवृत्तीवर घाव घालण्या एवजी शेतकऱ्यांनी हा बदल स्विकारायला सुरुवात केली हे शेतकरी समाजाचे मोठे दुर्दैव आहे.

राम जन्म भुमीच्या ठिकाणी 'राम' असावे हि प्रत्येक भारतीय माणसांची भावना होती. त्यासाठी प्रत्येक न्याय प्रीय नागरिकांकडून काहीन काही योगदान दिले गेले. 'राम' हा विचार आहे. संघर्ष, त्याग, समर्पण आणि निष्ठा यांचे मुर्तीमंत रूप म्हणजे 'राम', तो प्रत्येकालाच हवा होता. मंदिर झाले उद्घाटन झाले. परंतु कृषी प्रधान आसनार्या देशातील शेतकऱ्यांच्या जीवनात 'राम" राहला आहे का? राम मंदिर बघुन आनंद आश्रु ढाळणारांना याची जाणीव कधी होणार हा खरा प्रश्न आहे.

सातत्याने शेतमालाचे पडत आसलेले दर आणि शेतमालाचे भाव पाडण्यासाठी सरकारचे धोरण शेतकऱ्यांच्या जीवावर उठले आहे. व्यवस्थेने शेतकऱ्यांना उद्योग वादाकडुन दैववादी बनवायला सुरुवात केली. शेतकरी समाजाची क्रय शक्ती कमी करण्यासाठी व्यवस्था प्रत्येक पाऊल टाकीत असल्याचे पदो पदि जाणवते. व्यवस्थाने शेतकऱ्यांना आधी गुलाम बनवले त्यातुन प्रवृत्ती भिकारी बनवली आसुन व्यवस्था शेतकऱ्यांना पुर्ण पणे भिकारी बनवु पाहत आहे. शेतकऱ्यांनी रामाचा आदर्श घेऊन लढले पाहीजे. राम सीतेसाठी आणि अधर्मावर घाव घालण्यासाठी लढले. शेतकऱ्यांनी त्यांच्या जीवनात 'राम' असावा आसे वाटत असेल तर आता लढले पाहीजे. जात, धर्म, पक्ष, बाजुला ठेवुन मातीसाठी लढले पाहीजे.

खरीपातील मुख्य आणि नगदी पीक म्हणून ज्या पीकाकडे पाहले जाते त्या सोयाबीनचे दर चार हजारावर येवुन टेकले. आधिच नैसर्गिक आपत्तीमुळे सोयाबीनच्या उत्पादनात घट आली. हातात आलेल्या पिकातून लागलेला खर्च सुध्दा वसुल होवु शकत नाही. क्विंटल ला दोन हजार रुपयांपर्यंत शेतकऱ्यांना घाटा सहन करावा लागत आहे. केंद्र सरकारने आयात होणार्या कच्यातेलावरील आणि रिफाइन्ड तेलावरील आयात कर कमी करून पुढील एक वर्षाची मुदतवाढ देण्याचा निर्णय घेतला, कारण 2024/ 25 हे निवडकीचे वर्ष आहे. येणार्या निवडणुकीत शेतकऱ्यांचा बळी देऊन सरकार ला निवडणुका जिंकायच्या आहेत. देशात लाखो शेतकऱ्यांनी आत्महत्या केल्या एकाही पत्रकारच्या डोळ्यात आश्रु दिसले नाही. शेतकऱ्यांच्या जीवनातील अंधार 'राम नाम सत्य है' शिवाय संपनारच नसेल तर शेतकऱ्यांच्या जीवनात 'राम' आहे कुठे. **(लेखक हे भूमिपुत्र शेतकरी संघटना संस्थापक अध्यक्ष आहेत.)**





# घामातून मोती फुलले 'श्रमदेव' गावी अवतरले

## नागापूरला सूंदर गाव जिल्हास्तरीय प्रथम पुरस्कार

आधुनिक केसरी न्यूज

**भोकर :** नागापुर (ता.भोकर) येथील ग्रामस्थांनी एकसंघ होवून गावचा कायापालट करण्याचा संकल्प केला आहे.विविध विधायक बाबीना प्राधान्य देवून "स्वच्छते कडुन समृध्दी कडे " वाटचाल केली आहे. याची दखल घेवून जिल्हा परिषदेच्या वतीने जिल्हा स्तरावरील "सूदंरगाव" म्हणून प्रथम पुरस्कार आणि रोख पन्नास लाख रुपये जाहीर केले आहे.जिद्द,चिकाटी आणि श्रमदानातून गावाला वैभव प्राप्त करून दिलं आहे.घामातुन मोती फुलले.. श्रमदेव जणू गावी अवतरले..अस म्हंटल तर वावगे ठरणार नाही. प्रारंभी लोकसंख्या कमी असल्याने गावोगावी स्वच्छता असायची परिणामी गंभीर आजाराचे प्रमाण कमी होते.कालातंराने लोकसंख्या वाढत गेली आणि विविध गंभीर आजाराची मालीका सूरू झाली. पूर्वी संत गाडगेबाबा यानी स्वच्छतेच्या बाबतीत ग्रामीण भागात प्रबोधन करून स्वच्छतेचं महत्त्व पटवून सांगितले आज तोच कित्ता शासनाला गिरवावा लागतो आहे.यातुन मुक्ती मिळवायची असेल तर स्वच्छता राखणं गरजेचं आहे



हे सिद्ध झाल्याने शासनस्तरावर संत गाडगेबाबा स्वच्छता अभियान आणि तुकडोजी महाराज ग्रामस्वच्छता अभियान राबविण्याचा निर्णय घेतला.तालुक्यात यापूर्वी हळदा,हाडोळी गावाने अभियानात बाजी मारली.आता स्मार्ट व्हिलेज स्पर्धेत नागापूर (ता. भोकर) जिल्ह्यात अव्वलस्थानी आहे.

नागपूर येथील सरपंच दत्ता व्यवहारे, उपसरपंच बालाजी शानमवाड,ग्रामसेवक नरेंद्र काळे यांनी ग्रामस्थांना स्वच्छतेचे महत्त्व पटवून दिल्याने गाव स्वच्छ सुंदर करण्याचा एकमुखी ठराव घेण्यात आला.ग्रामस्थांनी स्वताह श्रमदानातून गावात नंदनवन फुलवले आहे.

यात प्रामुख्याने रस्ते,नाले सफाई, बंदिस्त नाली, शोषखड्डे, सिमेंट रस्ते, वृक्षारोपण,शिवपाणंद रस्ता,शाळा, अंगणवाडी डिजीटल, प्रत्येक घरावर मूलीच्या नावाची पाटी, जागोजागी सीसीटिव्ही कॅमेरे, स्वयंचलित सेंसार लाईट,वॉशबेसींग, प्रत्येक घरी शूध्द पाण्याचे नळ जोडणी,शासन आपल्या दारी उपक्रम, सरपंच परिषदेचे आयोजन, कचराकुंडी आणि शासनाच्या प्रत्येक योजनेत सहभागी होवून योजना यशस्वी होण्यासाठी सतत प्रयत्नशील.

येथील गावकऱ्यांनी मेहनत घेऊन स्मार्ट व्हिलेज स्पर्धेत सहभाग घेतला मान्यवरांची गावचे परीक्षण केले आणि २०२१-२२ साठी आर.आर.आबा सूंदरगाव स्पर्धेत जिल्हा स्तरावर प्रथम क्रमांक पटकावला आहे. रोख पन्नास हजार रुपये , प्रशस्तीपत्र देऊन मागील शूक्रवारी ( ता. २६) प्रजासत्ताक दिनाच्या निमित्ताने जिल्हा परिषदेच्या मुख्य कार्यकारी अधिकारी मिनल करणवाल यांनी सरपंच दत्ता व्यवहारे व ग्रामसेवक नरेंद्र काळे यांचा गौरव केला.

# मुस्लिम समाजाला आरक्षण कधी मिळणार?

## खासदार इम्तियाज जलील यांचे प्रतिपादन

आधुनिक केसरी न्यूज

भोकर :राजकारणात मुस्लिम समाजाला केवळ मते मिळवण्यासाठी वापर केला जातो.गटातटात गुंतुन न राहता तुम्ही एकसंघ होवून लढा दिल्याशिवाय हक्काच्या मागण्या पदरात पडणार नाहीत. मराठा आरक्षणासाठी मनोज जंरागे पाटलानी मेहनत घेतल्याने यश मिळाले आहे त्या व्यक्तीचा मला अभिमान आहे.मुस्लिम समाजाच्या आरक्षणाचा प्रश्न कधी निकाली काढणार असा सवाल खासदार इम्तियाज जलील यांनी शनिवारी व्यक्त केला आहे.मोंढा परिसरात एमआयएम पक्षाच्या वतीने जाहीर सभा घेण्यात आली त्यावेळी ते बोलत होते. व्यासपीठावर मराठवाडा अध्यक्ष फेरोज लाला, जिल्हा अध्यक्ष मिर्झा अमजत बेग, ईरफान ताऊ, उमरखेड,हैदर पटेल, नांदेड, रिझवान निजामबादकर,अमिन साहब निर्मल,माजीत बशीर साहब, सरवर खॉन, शेख निरोद्दिन, मूर्तुजा साहब,जाकेरभाई देगलूरकर, हूसेनभाई मूदखेडकर, अनवरखॉन हिमायतनगर, अमजत चाऊस हदगावकर याची उपस्थिती होती. श्री. जलील म्हणाले की,लोकसभेत मुस्लीम समाजाचा एकमेव खासदार असल्याने जनतेच्या हिताचे प्रश्न उपस्थित केल्याने विरोध केला जातो. ओवेशी पण आवाज उठवतात आता त्यांच्या साथीला मी आलो आहे. तेव्हा घाबरण्याचे काम नाही. भाजप हा पक्ष मुस्लिम बांधवांच्या विरोधात आहे. निवडणूकीत केवळ मतांसाठी गोंजारल जात ऐरवी मात्र लक्ष देत नाहीत असे सांगितले आहे. प्रास्ताविक संयोजक बाबाखॉन यांनी केले. तर सूत्रसंचालन नजीर अतिक उमरखेडकर यांनी केले. कार्यक्रमासाठी बाबाखॉन सय्यद, जूनेद पटेल, करीम बाबा करखेलीकर, शेख सुलेमान ईर्शातखॉन यांनी परिश्रम घेतले.

**तुमची मालमत्ता नाही** : येथील मागच्या नगर पालीका निवडणुकीत काहि अडचणींमुळे एमआयएम पक्षानचे उमेदवार नव्हते .यावेळी मात्र आमच स्वतंत्र पॅनल ऊभे करणार आणि आमचाच झेंडा फडकणार आहे असा विश्वास व्यक्त करून भोकर तालुका हा हा कॉंग्रेस पक्षाची मालमत्ता नाही असे ठणकावले आहे .

**हिन्दूस्तान माझा आहे** : येथील माझी सभा घेण्यास काहींनी विरोध केला आहे अशी मला माहिती मिळाली आहे .विरोधकाना सांगू इच्छितो की भोकरच काय संपूर्ण हिंदुस्थानात माझ आहे .मला कुणीही रोखू शकत अशांना मी घाबरत नाही कारण मी कुणाचा गूलाम नाही असे सांगितले .

**कचरा नाही . .पण झाडु हातात** : पंतप्रधान यांचा एक व्हिडिओ बघीतला आहे त्यात त्यांच्या हातात झाडू बघीतला पण तीथे कचरा दिसला नाही हा खटाटोप कशासाठी होता हे मात्र समजू शकलं नाही .आता येणाऱ्या निवडणुकीत तो झाडु निघेल आणि आपला मुळ व्यवसाय करणं भाग पडेल .त्यांना अच्छे दिन यावेत अशी खोपरखळी लगावली आहे .

**कायदा सर्वांसाठी एकच** : मागील २२ तारखेला सर्वत्र आंनदोत्सव साजरा झाला त्यावेळी भाजपच्या आमदार गीता जैन यांनी पाच मिनिटे मला ढिल द्या . .मी काय करते ते पहा असे आवाहन केलं आहे .तुम्हाला जमत ते मी पण करू शकतो जर माझ्यावर गून्हा दाखल केला तर जैन वर हि दाखल करा कारण कायदा सर्वांसाठी एकच आहे . असे सांगितले आहे .



# बाजार सावंगी महसूल मंडळात नवीन पूल

आधुनिक केसरी न्यूज

**बाजार सावंगी :** खुलताबाद तालुक्यातील बाजार सावंगी महसूल मंडळ मधे ठिकठिकाणी नवीन पुले व रस्ते कामे सुरु आहे. तर काही कामे अपुर्ण स्थीतीत पडून असल्याचे चित्र आहे. तालुक्यातील लोणी धामणी व अन्य एक ठिकाणी नवीन दोन पुलांची कामे सुरु आहेत.तर बाजार सावंगी ताजनपूर शिरोडी रस्ता नवीन पुल काम, ताजनापूर चौफुली नवीन पुल काम, सावंगी शेखपूर मधील रस्ता काम, सुलतानपूर महसूल मंडळ मधे सुलतानपूर खांडी पिंपळगाव रस्ता दोन ठिकाणी पुल काम,तर कानडगाव मंहमदपूर फाटा ते टाकळीराजेराय रस्ता खडीकरण मजबुतीकरण डांबरीकरण काम, व टाकळी रा रा मुख्य रस्ता ते देवळाना बुद्रुक मातीकरण रस्ता काम आदि अनेक पुल रस्ते कामे सुरु असून तर अनेक ठिकाणी सुलतानपूर- बाजार सावंगी महसूल मंडळ मधे अनेक ठिकाणी पुले करण्यात आले त्यांची रंगरंगोटी पुल दरम्यान सपाटीकरण डांबरीकरण कामे अपुर्ण स्थीतीत पडून आहे. या संदर्भात अनेक वेळा दैनिकांच्या माध्यमातून व निवेदन तक्रार द्वारे वरिष्ठां पर्यंत आवगत करण्यात आले मात्र यंत्रणा अंदाज पत्रक प्रमाणे कामे करवून घेण्यास इच्छुक दिसून येत नाही उलट कामांचे बील देण्यास मात्र सतर्क दिसून येत नाही. हे सर्व कामे अंदाज पत्रकात समावेष्ट असताना ठेकेदारांना सुट देण्याचे गौडबंगाल काय? आहे.याची वरिष्ठ स्तरावरुन चौकशी करून कारवाई करण्याची मागणी नागरिकांतून होत आहे.

# माढ्याच्या ओबीसी सभेला तरडगावकरांची हजेरी

## ओबीसी एकजुटीतून दिसून आले शक्तिप्रदर्शन

आधुनिक केसरी न्यूज

**सुशिल गायकवाड**

**तरडगांव :** राज्यात ओबीसी आणि मराठा आरक्षणावरून मोठा संघर्ष होताना दिसुन येत आहे. दोन्ही समाज बांधवांमध्ये होत असलेले वादंग हे अगदी विकोपाला जाऊन पोहचलेले आहेत. आरोप प्रत्यारोप,टीका टिप्पणी हे सगळंच पाहायला मिळत आहे.जसा मराठा समाज हा आरक्षण मिळविण्यासाठी एकवटलेला आहे.तसाच ओबीसी समाज सुद्धा आमच्या आरक्षणात कुणी वाटेकरी नको म्हणून संघटित झालेला आहे.

गावोगावी ओबीसी बांधवांचे संघटन होऊ लागले आहे.फलटण तालुक्यातील तरडगाव सह पंचक्रोशीतून सुद्धा ओबीसी बांधवांची संघटन बांधणी मोठ्या प्रमाणात झालेली पाहायला मिळत आहे.

सोलापूर जिल्ह्यातील माढा येथे संपन्न झालेल्या ओबीसी सभेला तरडगाव मधील ओबीसी समाज बांधवांनीच नव्हे तर अनुसूचित जातीतील समाज घटकांनी सुद्धा विशेष हजेरी दाखविली.ही कमाल काही दिवस तरडगाव मध्ये चाललेल्या बैठकांमुळे शक्य झालेले आहे. बैठकांमधून आरक्षणा बाबत जागृती करण्यात येत असल्याने "एकच पर्व,बहुजन सर्व" असा नारा सुद्धा सभेला जात असताना समाज बांधवांकडून देण्यात आला.तरडगावांतून निघत असताना आमदार दीपक चव्हाण यांच्या हस्ते गाडी समोर नारळ फोडण्यात आला.महापुरूषांच्या विजय असोच्या घोषणा देण्यात आल्या.तसेच ओबीसीं संघटनेचा विजय असो असा जयघोष ही करण्यात आला.तद्नंतर माढयाच्या दिशेने प्रस्थान करण्यात आले.माढा येथील सभेला संबोधित करण्यासाठी प्रकाश आंबेडकर,प्रकाश शेडगे,लक्ष्मण गायकवाड यांच्या सह अनेकजण उपस्थित होते.या सभेसाठी फलटण तालुक्यातूनच नव्हे तर सातारा जिल्ह्यातून ओबीसी समाज बांधव हे मोठ्या संख्येने तरडगाव मधून गेल्याचे दिसून आले.शिवाय तरडगांवच्या ओबीसी एकजुटीचे जणू शक्तिप्रदर्शनच दिसून आले.ओबीसी समाज बांधवांसोबत अनुसूचित जातीतील समाज घटकांचा सुध्दा पाठिंबा मिळत आहे.या एकजुटी बद्दल ओबीसी समाज बांधवांमधून विशेष समाधान सुध्दा व्यक्त केले जात आहे.

तरडगावमधील या ओबीसी एकजुटीचे अनेकांनी कौतुक केलेले आहे. तरडगावांत ओबीसी बांधवांच्या वारंवार होत असलेल्या बैठकांमुळे ही एकजूट भक्कमपणे तयार झालेली आहे.असे ओबीसी समाज बांधव म्हणत आहेत. ही एकजुट कायम अशीच




ठेवून आपण आपल्या न्याय हक्कासाठी एकजुटीने लढले पाहिजे.असा आशावाद सुद्धा व्यक्त केला जात आहे.गेली काही दिवसांपासून राज्यात मराठा आणि ओबीसी मध्ये जे वातावरण निर्माण झालेले आहे,त्याच्या मुळे गावा गावात सुद्धा मोठ्या प्रमाणात संघटन होऊ लागले आहे. तरडगांव ता.फलटण येथे ओबीसी बांधव एकत्र येऊन एक मोट बांधताना दिसत आहे.गेल्या आठवड्यात तरडगाव मध्ये ठिकठिकाणी बैठका घेत ओबीसी आरक्षणा वरून विचार मंथन घडवून आणण्यात आले.विविध समाज घटकांतील लोकं या बैठकांमध्यें सहभागी होत स्वतःची मते परखडपणे मांडत आहेत.आपलं आरक्षण टिकले पाहिजे.

यासाठी एकत्रित आलेला तरडगाव सह पंचक्रोशीतील ओबीसी समाज आज ओबीसी आरक्षणाच्या समर्थनार्थ घेण्यात आलेल्या सभेच्या ठिकाणी मोठ्या संख्येने जाऊ लागला आहे.

माढा येथे घेण्यात आलेल्या सभेला सुद्धा तरडगाव सह पंचक्रोशीतील ओबीसी बांधवांनी उपस्थिती दाखवली. माढा येथे सर्वजण दाखल होताच गाडी पार्किंगच्या जागेतच सर्व महापुरुषांच्या नावाचा जयघोष करण्यात आला. तसेच रॅलीचे स्वरूप देत सभा ठिकाण स्थळा पर्यंत जाताना घोषणाबाजी करण्यात आली. यावेळी सर्वांकडून डोक्यावर पिवळ्या रंगाच्या टोप्या घालण्यात आल्या होत्या. माळी, मातंग, चर्मकार, सुतार, कुंभार, रामोशी, धनगर, जोशी, कैकाडी, नाभिक, बौद्ध, बेलदार, महादेव कोळी, तेली, परिट, वडार, लिंगायत वाणी आदी समाज बांधव उपस्थित होते.



# ममुराबाद जिल्हा परिषद शाळेत प्रजासत्ताक दिनानिमित्त विविध कार्यक्रमांचे आयोजन

आधुनिक केसरी न्यूज

**खुलताबाद :** तालुक्यातील ममुराबाद येथील जिल्हा परिषद शाळेत प्रजासत्ताक दिवस साजरा करण्यात आला शाळे कमिटी अध्यक्ष ताहेर पटेल यांच्या हस्ते साडेसात वाजता ध्वजारोहण करण्यात आला. शाळेमध्ये लेझीम डंबेल्स घेण्यात आला. अनेक विद्यार्थ्यांनी भाषणे घेतली व विविध कार्यक्रम घेण्यात आला. याप्रसंगी एस वाय खान, पी. व्ही. जाधव, एस. पी. गुजर, ताराबाई नागे, सोनाबाई आदमाने, शोभाबाई आदमाने, कमलबाई आदमाने, पोलीस पाटील आजिनाथ वेताळ, लोकमत समाचार पत्रकार अफसर शेख, सोसायटीचे सचिव अफजल शेख जावेद, पटेल नाजेर, पटेल दाऊद, जनार्दन वेताळ, विविध कार्यकारी सोसायटी सदस्य शिवाजीराव जेठे, ज्ञानेश्वर बापू वेताळ, आधुनिक केसरी जिल्हा प्रतिनिधी सुधाकर जेठे, माजी ग्रामपंचायत सदस्य पंडितराव जेठे आदी उपस्थित होते.



# वंचित बहुजन आघाडीतर्फे पोलीस निरीक्षक धनंजय रामराव फराटे यांचा सत्कार

आधुनिक केसरी न्यूज

**खुलताबाद :** दिनांक 29 जानेवारी रोजी वंचित बहुजन आघाडी खुलताबाद तालुका येथे नवनिर्वाचित पोलीस निरीक्षक धनंजय रामराव फराटे व सहाय्यक उपनिरीक्षक मनोहर पुंगळे, सहाय्यक उपनिरीक्षक रत्तन वारे, हेड कॉ. पो. कृष्णा गवळी, यांचे फुल गुच्छ व शाल देऊन पोलीस ठाणे खुलताबाद या ठिकाणी मोठ्या उत्साहात सत्कार करुन पुढच्या वाटचालीस शुभेच्छा व अभिनंदन करण्यात आले. व पोलीस निरीक्षक साहेब धनंजय रामराव फराटे यांनी सर्वांचे आभार व्यक्त केले. यावेळी तालुका अध्यक्ष मुक्तार भाई सय्यद, तालुका उपाध्यक्ष राज बनकर, तालुका संपर्कप्रमुख शेख अकबर, तालुका सदस्य संतोष बनकर, बाबासाहेब मगरे, RPIDतालुका अध्यक्ष सुभाष गायकवाड, वंचित बहुजन आघाडी चालक-मालक संघटनेचे अध्यक्ष शेख समीउद्दीन, शेख परवेज उपाध्यक्ष, शेख मेराज उपाध्यक्ष, शेख अतिक महासचिव व इतर पदाधिकारी व कार्यकर्ते उपस्थित होते.

# शिक्षकांच्या कमतरतेमुळे विद्यार्थ्यांचे भविष्य टांगणीला

## उर्दू शाळेत आठ वर्गांसाठी फक्त चारच शिक्षक

आधुनिक केसरी न्यूज

**सुधाकर जेठे**

**फुलंब्री :** फुलंब्री शहरातील जिल्हा परिषद प्राथमिक व माध्यमिक शाळेतील गरिब असलेल्या विद्यार्थ्यांना शिकविण्यासाठी शिक्षकांची कमतरता असल्याने सर्व सामान्य नागरिकांच्या मुलांचा भविष्य खुटीला टांगण्यात आल्याचे दिसून येत आहे. सदर या प्रकरणी आपल्या दैनिक आधुनिक केसरी फुलंब्री प्रतिनिधी यांनी काल दिनांक 24 जानेवारी रोजी फुलंब्री जिल्हा परिषद शाळेत जाऊन चौकशी केली असता तर माहिती समोर आली की, सध्या जिल्हा परिषद शाळेत विद्यार्थी संख्या कमी आहे, यातच कमी विद्यार्थी असताना शिक्षकांची कमतरता आहे. एकीकडे शासन म्हणते प्रत्येकांना मोफत शिक्षण मिळावे यासाठी शासन स्तरावर विविध उपाययोजना करण्यात येत आहे. शासन आपल्या दारी हा कार्यक्रम राज्य सरकार राबवत आहे परंतु गरीब नागरिकांच्या पोरांना शिक्षणासाठी शिक्षक कधी मिळणार. जिल्हा परिषद शाळेतील मराठी माध्यम व उर्दू माध्यमात विद्यार्थीची संख्या कमी होत चालली आहे.

शासन शिक्षणासाठी कोट्यवधी रुपये खर्च करत आहे तरी ते काही उपयोग होत नाही. फुलंब्री जिल्हा परिषद शाळेतील गरिब विद्यार्थ्यांना शिकविण्यासाठी शिक्षकांची कमतरता असल्याने औरंगाबाद जिल्हाधिकारी, औरंगाबाद जिल्हा शिक्षणाधिकारी, गटशिक्षणाधिकारी व संबंधित विभागाच्या अधिकाऱ्यांनी लक्ष देत शिक्षकांची रिक्त असलेल्या जागा भरावे अशी मागणी पालक वर्गातुन होत आहे.

शिक्षणाचा बाजारीकरण, विद्यार्थी पळवण्याचा प्रयत्न सुरूच शासन शिक्षणासाठी विविध उपाययोजना करते तसेच गोरगरीब असलेल्या नागरिकांच्या पोरांना मोफत शिक्षण मिळावे यासाठी सरकार आपल्या परीने उपक्रम राबवतात.

परंतु ग्रामीण व शहरी भागातील नेते मंडळींनी आपापल्या माध्यमातून संस्थेच्या नावाने शाळा कॉलेज उघडुन ठेवले आहे, आणि याच धर्तीवर शिक्षणाचा बाजारीकरण सुरू केले आहे.

**शिक्षकांची रिक्त जागा भरावे विद्यार्थ्यांचा शैक्षणिक नुकसान टाळावे**
फुलंब्री शहरातील जिल्हा परिषद शाळेतील गरिब विद्यार्थ्यांना शिकविण्यासाठी शिक्षकांची कमतरता असल्याने दिसुन येत आहे या साठी शासनाने लक्ष देत शिक्षकांची रिक्त असलेल्या जागा भरावे व विद्यार्थी संख्या वाढावी .
**अजय मधुकर गंगावणे** – रिपब्लिकन पार्टी ऑफ इंडिया डेमोक्रॅटिक तालुका अध्यक्ष फुलंब्री जिल्हा औरंगाबाद



यात ग्रामीण भागातील पालकांना विविध प्रलोभने दाखवून विद्यार्थी संख्या वाढवण्यासाठी विद्यार्थीची पळवा पळवी सुरू आहे. यात मराठी माध्यमात विद्यार्थीची संख्या कमी होत आहे. मराठी माध्यमात इयत्ता पाचवी ते बारावी पर्यंत 504 विद्यार्थी आहे, या विद्यार्थ्यांना शिकविण्यासाठी 21 शिक्षकांची संख्या आहे. यात मराठी माध्यमात सुध्दा शिक्षकांची कमतरता असल्याचे दिसून येत आहे. यात वरिष्ठ अधिकार्यांनी लक्ष देत विद्यार्थ्यांचा भविष्य वाचवावे अशी अपेक्षा पालक वर्गातुन होत आहे. या प्रकरणी सविस्तर माहिती घेण्याचा प्रयत्न केला असता तर संबंधित मुख्याध्यापकांनी नाव न छापता सांगितले की, सध्या जिल्हा परिषद शाळेत विद्यार्थी संख्या कमी होत चालली आहे शिक्षकांची कमतरता असल्याने आम्ही काही करू शकत नाही शासनाने लक्ष देत हा प्रश्न निकाली काढावा.

# शहरातील काही भागात खुल्या प्रवर्गातील समाजाची माहिती न भरता सर्वे

आधुनिक केसरी न्यूज

**लोणार :** मागासवर्गीय आयोगाकडून मराठा आरक्षणासाठी सर्वे केला जात आहे माहिती गोळा केली जात आहे.यात खुला प्रवर्गातील समाजांना १८३ प्रश्नाचे उत्तर विचारले जाते.

त्याअनुषंगाने प्रगणकांद्वारे शहरातील सर्व प्रभागांमध्ये एका विशिष्ट मोबाईल ॲप्लिकेशन द्वारे सर्वे करण्याचे काम सुरू आहे. या ॲपमध्ये आरक्षित प्रवर्गातील कुटुंबाकरिता साधारणतः ७ ते ८ प्रश्न विचारले जातात व सर्वे पूर्ण होतो. मात्र खुला प्रवर्गातील कुटुंबासाठी प्राप्त माहितीनुसार १८३ प्रश्न विचारून स्वाक्षरी घ्यावी लागतो व त्याकरिता साधारणतः ३० ते ४० मिनिटे प्रती कुटुंब वेळ लागतो. मात्र 'गुलाबखॉ मोहल्ला' या प्रभागामध्ये सर्वे करणाऱ्या नगरपरिषदेच्या प्रगणकांनी खुल्या प्रवर्गातील मुस्लिम समाजाचे हवेमध्येच फक्त १-१ मिनिटांमध्ये कुटुंब प्रमुखाचे नाव विचारून जादुई सर्वे करून गेल्याची चर्चा रंगली आहे. अनेक नागरिकांनी याबाबत तक्रार केली आहे. सर्वेचे उर्वरित प्रश्न स्वतःच मनाने भरून जाली स्वाक्षरी करून सर्वे पूर्ण करतात की कसे? असा नवीन भ्रम निर्माण झाला आहे. त्यामुळे या प्रभागामध्ये सर्वे करणाऱ्यांची चौकशी करून उचित कार्यवाही करण्याची मागणी होत आहे. यावर मुख्याधिकारी व संबंधित वरिष्ठ अधिकारी काय कार्यवाही करतील याकडे सर्वांचे लक्ष लागले आहे.

# मोटरसायकल चोरी करणारे गुन्हे शाखेच्या ताब्यात

## लाखो रुपये किमतीच्या दहा मोटरसायकली जप्त

आधुनिक केसरी न्यूज

**धुळे :** सिव्हील हॉस्पीटल परिसरातुन मोटर सायकल चोरी करणारे स्थानिक गुन्हे शाखेने ट्रैप लायुन आरोपी ताब्यात घेतले आहे सदर कारवाहीत चार लाख तीस हजार रुपये किमतीच्या एकूण दहा मोटरसायकली ताब्यात घेण्यात आले आहेत.
तक्रारदार श्री. रविंद्र देवीदास मराठे यांनी धुळे शहर पोलीस ठाण्यात येवून तक्रार दिली हिरे मेडोकल कॉलेज, धुळे येथुन त्यांची हिरो कंपनीची मोटरसायकल अज्ञात इसमाने चोरुन नेलेली आहे बाबत दिलेल्या तक्रारीवरुन धुळे शहर पोलीस ठाणे येथे गुन्हा दाखल आहे. मा.पोलीस अधीक्षक, धुळे यांनी सिव्हील हॉस्पोटल, धुळे परिसरात होणारे मोटार सायकल चोरीचे गुन्हे ट्रैप लावुन उघडकीस आणणेकरिता स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक दत्तात्रय शिंदे व त्यांचे पथकास योग्य त्या सूचना व मार्गदर्शन करुन निर्देश दिले होते. त्याअनुषंगाने स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक दत्तात्रय शिंदे यांनी त्यांचे पथकास सिव्हील हॉस्पोटल परिसरात वेळोवेळी ट्रेप लावून तेथे फिरणारे संशयीत तरुणांवर लक्ष ठेवणे बाबत सुचना दिल्या होत्या त्यानुसार मिळालेल्या गुप्त बातमीव्दारे



मार्फत बातमी मिळाली की, दिनांक २८ रोजी सदर गुन्हयातील संशयीत इसम नामे कफिल अहमद शकील अहमद अन्सारी याने व त्याचा साथीदार नामे तौसिफ शेख गुलाम मोहम्मद याचे मदतीने केला असून त्यांनी चोरी केलेलो मोटर सायकल क्र. एम.एच. १८ अं.ई. ५७९२ सह बडजाई रोड चौफुली सना मॅरेज हॉलजवळ उभे असल्याबाबत माहिती प्राप्त झाल्याने मा.पो.निरी-श्श्री. दत्तात्रय शिंदे यांनी लागलीच त्यांच्या पथकास बातमोची खात्री करुन पुटोल कारवाई करणे बाबत आदेशीत केले.
सदर पथकाने वडजाई रोड चौफुली जवळील सना मॅरेज हॉल जवळ गेले असता तेथे इसम नामे १) कफिल अहमद शकील अहमद अन्सारी वय २० व्यवसाय मजुरी रा. मौलवीगंज, कलंदर चौक, एकबाल रोड, धुळे २) तौसिफ शेख गुलाम मोहम्मद वय ३२ व्यवसाय मजुरी रा. तिरंगा चोक, अन्सार नगर, मशिद जवळ, धुळे असे त्यांचे ताब्यातील मोटर सायकल क्र. एम. एच. १८ जे.ई. ५७९२ सह मिळून आल्याने त्यांना ताब्यात घेतले.
सदर इसमांना त्यांचे ताब्यातील मोटर सायकल बाबत विचारपुस करता त्यांनी सदर मोटर सायकल सिव्हील हॉस्पीटल, (हिरे मेडीकल कॉलेज) धुळे येथुन चोरी केली असल्याबावत सांगितले.
आरोपी नामे कफिल अहमद शकील अहमद अन्सारी हा रेकॉर्डवरील गुन्हेगार असल्याने त्यास विश्वासात घेवून अधिक विचारपुस करता, त्याने तौसिफ शेख गुलाम मोहम्मद व ३) अनिस ऊर्फ अनिस फारकेट अकबर मन्यार रा. दिलदार नगर, धुळे व त्याचे साथीदार यांच्या मदतीने हिरे मेडीकल कॉलेज व धुळे शहरातुन यापूर्वी मोटर सायकली चोरी केल्या असून त्यात स्प्लेंडर,फॅशन प्रो, हिरो होंडा, हिरो, होंडा, बजाज अशा कंपनीच्या एकूण 10 मोटरसायकली जप्त करण्यात आले आहेत त्यांची एकूण किंमत 4,30,000 आहे.
सदरची कारवाई श्रीकांत धिवरे सारे, पोलीस अधीक्षक, चुळे, किशोर काळे, अपर पोलीस अधीक्षक धुळे, यांचे मार्गदर्शनाखाली स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक दत्तात्रय शिंदे, पोसई अमरजित मोरे, पोसई/प्रकाश पाटील, पोसई कैलास दामोदर, असई संजय पाटील, श्याम निकम, पोहेको मच्छिद्र पाटील, संदीप सरग, हेमंत बोरसे, संतोष हिरे, संदीप पाटील, योगेश चव्हाण, अशोक पाटील, प्रकाश सोनार, प्रल्हाद वाघ, तुषार सुर्यवंशी, योगेश साळवे, गुणवंत पाटील, सुशिल शेंडे अशांनी सदरची कारवाई केलेली आहे.
पोलीस अधीक्षक श्री. श्रीकांत धिवरे सो, यांनी ज्यांच्या मोटार सायकल चोरीस गेलेल्या आहेत त्यांनी प्रभारी अधिकारी, धुळे शहर पोलीस स्टेशन यांचेशी संपर्क साधावा चाबत नागरीकांना शवाहन केलेले आहे

# बल्लारपूर पोलीस ठाण्यात संविधान जागर

आधुनिक केसरी न्यूज

**बल्लारपूर :** बल्लारपूर पोलीस स्टेशन चा प्रांगणात २८ जानेवारी रविवार रोजी संविधान जागर चा कार्यक्रम घेण्यात आले.
सहाय्यक पोलीस निरीक्षक प्रवीण तडी यांच्या अध्यक्षतेखाली संपन्न झालेल्या या कार्यक्रमात शंकरराव वेलेकर, इंजी. शेषराव सहारे, सौ. गायत्री रामटेके,पोलीस उपनिरीक्षक वर्षा नैताम तसेच संविधान जागर चे मुख्य प्रवर्तक अशोक घोटेकर यांची प्रमुख उपस्थिती होती.
कार्यक्रमात सहाय्यक पोलीस निरीक्षक प्रवीण तडी, शंकरराव वेलेकर सर, इंजी. शेषराव सहारे, सौ. गायत्री रामटेके, मुख्य प्रवर्तक अशोक घोटेकर यांनी संविधान विषयी माहिती दिलीण् पोलीस उपनिरीक्षक वर्षा नैताम यांनी एक सुरेख गीत गायिले. संविधान जागर चे एक हजार कार्यक्रम करण्याचे मानस असून बल्लारपूर पोलीस स्टेशन येथील १३७ वा कार्यक्रम होता. तसेच १ लाख पुस्तक वाटणार आहेत. कार्यक्रमाला शहरातील नागरिक तसेच पोलीस कर्मचाऱ्यांची उपस्थितीत होती.
कार्यक्रमाचे संचालन व आभारप्रदर्शन पोलीस उपनिरीक्षक वर्षा नैताम यांनी केले.





# क्रीडा संकुल येथे राष्ट्रीय मतदार दिवस साजरा

आधुनिक केसरी न्यूज

**कन्नड :** येथे तालुका क्रीडा संकुल कन्नड या ठिकाणी राष्ट्रीय मतदार दिवस साजरा करण्यात आला .सदर कार्यक्रमासाठी कन्नड तालुक्याचे मतदान नोंदणी अधिकारी तथा उपविभागीय अधिकारी संतोष गोरड व तसेच सहाय्यक मतदार नोंदणी अधिकारी तथा तहसीलदार विद्याचरण कडवकर उपस्थित होते . उपस्थितीत शहरातील सर्व जिल्हा परिषद व खाजगी शाळेतील विद्यार्थी व शिक्षक यांना राष्ट्रीय मतदार दिवसाचे महत्व,मतदानाचे महत्व समजावून सांगितले.सर्व उपस्थितांना राष्ट्रीय मतदार दिनानिमित्त शपथ देण्यात आली.
तसेच उपस्थित महाविद्यालयीन विद्यार्थ्यांना EVM VVPAT बाबत ची माहिती दिली. या निमित्ताने प्रातिनिधिक स्वरूपात मतदान कार्डचे वाटप करण्यात आले. कार्यक्रमासाठी निवडणूक विभागाचे प्रभाकर मनगटे , चंद्रशेखर सौंदाणकर , भगवान शिसोदे अ. का व शहरातील BLO व पर्यवेक्षक हजर होते.

# दिवसाढवळ्या दानपेटी फोडली

आधुनिक केसरी न्यूज

**जामनेर :** फत्तेपूर येथे भुरट्या चोरट्यांच्या मुजोरी पुढे पोलीस यंत्रणा हतबल झाल्याचे चित्र दिसून येत आहे. येथील भर चौकात असणाऱ्या हनुमान मंदीरातील दानपेटी चोरट्यांनी दिवसा फोडून ऐवज लंपास केल्याची घटना उघडकीस आली. २६ जानेवारी दुपारच्या दोन वाजेपर्यंत सुरक्षीत असल्याचे राम भक्त सांगतात. त्यानंतर- ३ ते ५ वाजेदरम्यान दिवसा चोरट्यांनी ही दानपेटी फोडून त्यातील असलेला ऐवज लंपास केलेला आहेया समितीच्या पदाधिकाऱ्यांनी येथील पोलीसांकडे तक्रारी अर्ज दिलेला आहे. चोरट्यांचा त्वरीत छडा न लावल्यास समितीच्या माध्यमातुन तिव्र आदोलन छेडले जाईल. यांची दखल पोलीस अधिक्षक जळगांव यांनी घावी असा इशारा श्रीराम जन्मोत्सव समितीचे अध्यक्ष कमलेश चौधरी, उपा- ध्यक्ष मंगेश सरोदे, शुभम तेजकर, योगेश पाटील, ज्ञानेश्वर सोनार, अभय चौधरी, रोहीत तेजकर, पवन चौधरी आदीनी दिलेला आहे.

# तहसीलदारांच्या वाहनाला अचानक आग; जिंतूर तहसील कार्यालयातील घटना

आधुनिक केसरी न्यूज

**जिंतूर :** परभणी येथून पोलीस पाटील परीक्षेचे काम आटोपून तहसीलदार राजेश सरवदे हे कर्मचाऱ्या सोबत परत जिंतूर तहसील कार्यालयात आले असता उभ्या असलेल्या सरकारी वाहनाला अचानक आग लागून मोठे नुकसान झाले ही घटना रविवार दि 28 जानेवारी रोजी सायंकाळी 7:30 वाजण्याच्या सूमारास घडली. वाहनाला आग लागल्याचे वृत्त समजताच तलाठी मोहसीन पठाण,रवी कारंजकर चालक इफ्फत पठाण यांनी आग विझवण्याचा प्रयत्न केला.
या बाबत अधिक माहिती अशी की परभणी येथे पोलीस पाटील भरतीची परीक्षा असल्याने व त्यात तहसीलदार राजेश सरवदे यांची भरारी पथकात नियुक्ती झाल्याने ते सरकारी वाहन क्रमांक एम एच 22 डी 1011चे चालक इफ्फत पठाण,तलाठी अनिल राठोड,शिपाई नय्युम अतार यांच्या सह परभणी येथे सकाळी अकरा वाजता गेले होते तिथं कर्तव्य बजावून ते सायंकाळी सहाच्या सुमारास जिंतूरला परत आले सदरील वाहन



**वाहनांचे आयुष्य संपले होते :** सदरील वाहन निर्लेखीत होऊन एक वर्ष पूर्ण झाले होते परंतु नवीन वाहन उपलब्ध झाले नसल्याने निर्लेखीत झालेल्या वाहनाला डागडुजी करून आम्ही वापरत होतो अशी माहिती वाहनाचे चालक इफ्फत पठाण यांनी दिली .

तहसील कार्यालयाच्या आवारात लावून चालक व सर्व अधिकारी घरी गेले असता सात वाजण्याच्या सुमारास अचानक वाहनाने पेट घेतला ही घटना शिपाई माधव खरात यांनी पाहताच त्यांनी वरिष्ठांना या बाबत माहिती दिली तलाठी मोहसीन पठाण,, रवी कारंजकर,चालक इफ्फत पठाण यांनी घटनास्थळी धाव घेत आग विझवण्याचा प्रयत्न केला आग वाढत जाऊन तहसील कार्यलयाच्या भिंतीला लावलेल्या बॅनर ने पेट घेतला पंधरा मिनिटांनी अग्निशामक दलाच्या जवानांनी येऊन आग विझवली त्यामुळे पुढील अनर्थ टळला. वाहनाला नेमकी आग कशामुळे लागली हे मात्र समजू शकले नाही.

# रेल्वे पुलाचे बांधकाम तातडीने पूर्ण करा; अन्यथा रेल्वे रोको

आधुनिक केसरी न्यूज

**बल्लारपुर :** रेल्वे विभागात द्वारे बल्लारपूर येथील गोल पुलिया रेल्वे लाईन दुरुस्तीसाठी दि. १६/१/२०२४ ते२६/१/२०२४ पर्यंत गोल पुलीया हा बंद ठेवण्याचे आवाहन केले होते.ती मर्यादा संपली असून विभागांद्वारे रेल्वे दुरुस्तीचे काम अत्यंत मंदगतीने सुरू आहे.सदरहु कामामुळे बल्लारपूर शहरवासीयांना वस्ती विभागात शाळा शिकणाऱ्या शाळाकरी विद्यार्थ्यांना त्रास सहन करावा लागत आहे .तसेच स्मशान भूमी कडे जाणाऱ्या अंतिम यात्रेला व ग्रामीण रुग्णालय बल्लारपूरला जाण्याकरिता ज्येष्ठ नागरिकांना बराच त्रास सहन करावा लागत आहे. सर्व नागरिकांचा विचार लक्षात घेता दुरुस्तीचे काम हे लवकरात लवकर पूर्ण करून २९/१/२०२४ सुरू करण्यात यावे. सदरहु काम हे लवकर पूर्ण न झाल्यास रेल्वे विभागा विरोधात दि.१/२/२०२४ पासून रेल्वे रोको आंदोलन करण्यात येईल . व या आंदोलनास सर्वस्व रेल्वे विभाग जबाबदार राहील. असे कांग्रेस प्रदेश सहसचिव चेतन गेडाम म्हणाले. यावेळी जिल्हा महासचिव शंकर महाकाली, युवक कांग्रेस बल्लारपुर विधानसभा अध्यक्षअरबाज सिद्दीकी, संजीव सुददाला, जीशान सिद्दीकी, रोशन ढेगळे,सोनू आमटे, राजा केशकर, रवि जैसवाल व युवक कांग्रेस कार्यकर्ते उपस्थिति होते.

